CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




सोलापूर | सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २८० | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



इतर सगळ्या गोष्टींचा विचार करीत असताना, आर्थिक व्यवस्थेबरोबरच कार्यकर्त्यांच्या समाधानाचाही विचार करणे आवश्यक आहे. कार्यकर्त्याने स्वतःला कधीही उपेक्षित समजू नये.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**

रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# दिल्लीत वसतिगृह कोसळले; चार विद्यार्थ्यांचा मृत्यू

### । पाच गंभीर जखमी । इमारत ५० वर्षांपूर्वीची । घरमालक फरार

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण परिसराजवळील सत्य निकेतन भागातील एका अरुंद गल्लीत, मुलांचे वसतिगृह असलेली सुमारे ५० वर्षे जुनी पाच मजली इमारत रविवारी दुपारी कोसळली. या दुर्घटनेत चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, मलब्याखाली अनेक जण अडकल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आतापर्यंत ढिगाऱ्याखालून आठ जणांना बाहेर काढण्यात आले. त्यापैकी एकाला रुग्णालयात मृतावस्थेत आणण्यात आले, तर अन्य तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पाच जणांची प्रकृती गंभीर आहे आणि जखमी झालेल्या एका बचावकर्त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे, असे पोलिसांनी सांगितले. तळघर आणि वरच्या पाच मजल्यांचा समावेश असलेल्या त्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अजूनही सुमारे ४० ते ५० लोक अडकले आहेत, असा दावा स्थानिकांनी केला. 'पेईंग गेस्ट' (पीजी) निवासस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या या इमारतीच्या तळघरात दुरुस्तीचे काम सुरू असताना दुपारी दीडच्या सुमारास ती कोसळली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

दुर्घटनेची माहिती मिळताच, दिल्ली पोलिस, एनडीआरएफ, दिल्ली अग्निशमन दल आणि डीडीएमएची पथके, तसेच अग्निशमन विभागाच्या गाड्या आणि कॅट्स रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. हा परिसर अरुंद आणि गजबजलेल्या गल्ल्यांचा ओळखला जातो. इथे खानावळी आणि 'पीजी' वसलेले आहेत. ही वास्तू जवळपास ५० वर्षे जुनी असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. दाटीवाटीने उभी असलेली इमारतींची रचना आणि विद्यार्थ्यांची मोठी गर्दी यामुळे तिथे हालचालीसाठी फारशी जागा उरत नाही.

बचाव पथके ढिगाऱ्यात काम करीत असतानाच, स्थानिक नागरिकही या बचावकार्यात सहभागी झाले. त्यांनी आपल्या हातांनी आणि हाती लागलेल्या कोणत्याही साधनांचा वापर करून ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. एकूण सहा जणांची सुटका करून त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे, तर एकाला मृत अवस्थेत आणण्यात आले होते. ◂ (वृत्तसंस्था)



इमारत कोसळल्यानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले

### इमारतीच्या मालकाचा शोध

ही इमारत 'होस्टेल डेझ' नावाने ओळखली जायची. त्याचा मालक गुरुग्राममधील आहे. मलब्याखाली किती जण दबले याची नेमकी माहिती नाही. या प्रकरणी एफआयआर दाखल केला असून, इमारतीच्या मालकाचा शोध घेतला जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## महत्त्वाचे

### राजनाथसिंह श्रीलंका दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** द्विपक्षीय संरक्षण आणि लष्करी संबंध अधिक दृढ करण्याच्या मार्गांचा शोध घेण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथसिंह मंगळवारपासून श्रीलंकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले उच्च-स्तरीय शिष्टमंडळ राजनाथसिंह यांच्यासोबत असेल, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. ते श्रीलंकेच्या नेतृत्वाशी अनेक मुद्द्यांवर सल्लामसलत करतील आणि कोलंबोमधील भारतीयांशी संवाद साधतील.

## अंतरवाली सराटीत ओबीसींचेही आंदोलन

**जालना, ६ सप्टेंबर**

अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू असताना आता ओबीसी समाजानेही आक्रमक भूमिका घेत अंतरवाली सराटीच्या वेशीवर उपोषण सुरू केले आहे. ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाणे, विठ्ठल तळेकर आणि सतीश कुलाल उपोषणाला बसले आहेत. ओबीसींच्या हक्कांसाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे सांगत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीमुळे ओबीसींच्या आरक्षणावर परिणाम होण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली आहे. ओबीसी समाजात होणारी घुसखोरी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही ससाणे यांनी दिला आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या मागण्या संवैधानिक नसल्याचा दावाही ससाणेंनी केला. ◂ (वृत्तसंस्था)

# न्या. महेश चंद्र त्रिपाठी मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती

### आठ न्यायमूर्तींच्या नियुक्तीचे आदेश जारी

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

महाराष्ट्रासह छत्तीसगड, अलाहाबाद, पंजाब आणि हरियाणा, ओडिशा, गुजरात आणि राजस्थान उच्च न्यायालयांमधील मुख्य न्यायमूर्तींच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची पदोन्नतीवर कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, तर अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने याबाबत केलेल्या शिफारशीला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली.



सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमच्या शिफारशीनुसार, केंद्र सरकारने आठ उच्च न्यायालयांच्या नव्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, दिल्ली उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश न्या. वल्लुरी कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी, तर छत्तीसगड उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# 'जेएनयू'मध्ये लैंगिक छळ

### १० विद्यार्थ्यांचा प्राध्यापकावर आरोप

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

राजधानी दिल्लीतील प्रतिष्ठित जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) पुन्हा एकदा वादात सापडले आहे. अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी एका प्राध्यापकावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. हे प्रकरण समोर आल्यापासून संपूर्ण कॅम्पसमध्ये खळबळ उडाली आहे. सध्या, विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती (आयसीसी) सखोल चौकशी करत आहे.

सूत्रांनुसार, सुमारे एक महिन्यापूर्वी आयसीसीला प्राध्यापकाविरुद्ध १० विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींमध्ये प्राध्यापकावर अनेक धक्कादायक आरोप आहेत. सुरुवातीला १० तक्रारी दाखल झाल्यानंतर हे प्रकरण अधिकच चिघळले आहे. आता इतर अनेक वरिष्ठ विद्यार्थी पुढे आले आहेत. त्यांनी प्राध्यापकांवर असेच आरोप करत तक्रारी दाखल केल्या आहेत. विद्यापीठात प्रचंड गदारोळ आणि गंभीर आरोप होऊनही कोणत्याही विद्यार्थ्याने औपचारिक तक्रार केली नाही. ◂ (वृत्तसंस्था)

### वर्गातही बेशिस्त वर्तन

विद्यार्थ्यांचा मुख्य आरोप आहे की, प्राध्यापक त्यांना बैठका किंवा मेळाव्यांच्या बहाण्याने कॅम्पसमधील त्यांच्या अधिकृत निवासस्थानी वारंवार बोलावत असत. तिथे त्यांनी त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. इतर काही तक्रारींमध्ये प्राध्यापकाचे वर्तन वर्गातही बेशिस्त होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी अश्लील व अनुचित टिप्पणी केली, असा दावा करण्यात आला आहे.

नेपाळ - तिबेट बॉर्डरवरील पूरग्रस्त भागात प्राण गमावलेल्या सर्वांना केसरी टूर्सतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी "पूरग्रस्त तिबेट बॉर्डर परिसर सोडून उरलेला संपूर्ण नेपाळ सुरक्षित असून" तिथे पर्यटनासाठी येण्याचे आवाहन केले आहे.
या आवाहनानुसार केसरीच्या सप्टेंबरपासूनच्या सर्व नेपाळ टूर्स सुरू राहतील. या टूर्सच्या कॉस्टमधील काही रक्कम केसरीतर्फे नेपाळ पूरग्रस्त मदत निधीसाठी देण्यात येईल. याबद्दल पर्यटकांचे शतश: आभार !




नेपाळमधील पर्यटन आणि प्रमुख पर्यटनस्थळे सुरू आहेत.
हिमालयाचे भव्य दर्शन, काठमांडूची संस्कृती, पोखराचे निसर्गसौंदर्य, चितवनचे जंगल आणि नेपाळची आपुलकी. चला, नेपाळला भेट देऊया – सुरक्षितपणे, संवेदनशीलतेने आणि विश्वासाने.

| ईझी व्हिसा टूर्स starts ₹83,000* | साऊथ ईस्ट एशिया टूर्स starts ₹95,000* | इंटरनॅशनल टूर्स starts ₹2,07,000* | छोटा ब्रेक टूर्स starts ₹38,000* | भारतीय टूर्स starts ₹41,000* | मारीगोल्ड यात्रा starts ₹42,000* |
|---|---|---|---|---|---|
| नेपाळ भूतान | बाली छोटा ब्रेक | बेस्ट ऑफ जपान | इंदूर उज्जैन मांडू | शिमला मनाली | नेपाळ मुक्तिनाथ |
| थायलँड | सिंगापूर छोटा ब्रेक | इसेन्शिअल युरोप | अमृतसर | भाऊबीज फॅमिली स्पेशल क्रूझ टूर सोनाली कुलकर्णीसोबत | गिरनार सोमनाथ |
| फु क्वॉक बँकॉक छोटा ब्रेक | लंगकावी छोटा ब्रेक | मोरोक्को जॉर्डन | पुरी भुवनेश्वर चिलिका | काश्मीर वैष्णोदेवी | कृष्णलीला |
| बेस्ट ऑफ बाकू | हाँगकाँग शेन्झेन मकाओ | ताश्कंद समरकंद बुखारा अल्माटी | अयोध्या प्रयागराज वाराणसी | राजस्थान मारवाड | मदुराई रामेश्वरम कन्याकुमारी |
| मॉरिशस | लेगोलँड सिंगापूर मलेशिया | साऊथ कोरिया | पुद्दुचेरी महाबलीपुरम | दार्जिलिंग गंगटोक | पीठापूरम कुरवपूर श्रीशैलम |
| श्रीलंका रामायण ट्रेल | बाली गिली आयलँड नुसा पेनिडा | स्कँडिनेव्हिया | मैसूर ऊटी | डलहौसी धरमशाला अमृतसर | जगन्नाथ पुरी कोलकाता गंगासागर |
| श्रीलंका याला नॅशनल पार्क | सिंगापूर मलेशिया गेंटिंग ड्रीम क्रूझ | स्प्लेंडिड चायना | मुन्नार अलेप्पी | केरळ कन्याकुमारी | साऊथ इंडिया टेंपल टूर |
| फिलिपिन्स पालावान | व्हिएतनाम फु क्वॉक | युएसए ईस्ट अँड वेस्ट कोस्ट विथ शिकागो | गुजरात रण उत्सव | ऑल ऑफ मेघालय | त्रिस्थळ दर्शन अयोध्या |
| चियांग माई लँटर्न फेस्टिव्हल फुकेत क्राबी बँकॉक | सिंगापूर थायलँड मलेशिया | साऊथ आफ्रिका केनिया विथ व्हिक्टोरिया फॉल्स | हंपी बदामी | मिस्टीकल नॉर्थ ईस्ट | सौराष्ट्र स्टॅच्यू ऑफ युनिटी |
| अझरबैजान जॉर्जिया | व्हिएतनाम कंबोडिया | ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड | स्टॅच्यू ऑफ युनिटी नडाबेट अहमदाबाद | संपूर्ण मध्य प्रदेश | इंडियन रामायण ट्रेल जनकपूर |

ऑफर्स* | मॉन्सून ऑफर* सप्टेंबरपर्यंतच्या टूर्सवर 5,000 पर्यंत ॲडिशनल डिस्काऊंट | ॲडव्हान्स बुकिंग डिस्काऊंट* 50,000 पर्यंत | फुल पेमेंट डिस्काऊंट* टूरच्या 90 दिवस आधी | एक्स गेस्ट डिस्काऊंट* | 8+ ग्रुप डिस्काऊंट* | लास्ट मिनीट डिल्स* | 0% EMI*

EZ 08 युरोप ख्रिसमस मार्केट स्पेशल 10 डिसेंबर 2026
FL 08 तैवान लँटर्न फेस्टीव्हल रेनबो व्हिलेज 18 फेब्रुवारी 2027
JB 09 जपान फॉल कलर स्पेशल सगानो सिनीक ट्रेन 13 नोव्हेंबर 2026
EO 09 नॉर्दर्न लाईट्स आईस ब्रेकर क्रूझ 16 जानेवारी 2027, 2 फेब्रुवारी 2027
UB 20 रिओ कार्निव्हल साऊथ अमेरिका 4 फेब्रुवारी 2027
UZ 13 अंटार्क्टिका 8 मार्च 2027
*T & C Apply

9167 835 071 | 1800 266 1100
सोमवार ते शनिवार सकाळी 9:30 ते संध्याकाळी 7
पुणे 020-66465555 | पुणे 8657991083 | बाणेर 020-69101234 | मुंबई 022-61744100
ठाणे 022-69721100 | वाशी 022-69462222 | नागपूर 0712-6921717 | कोल्हापूर 0231-2533222
निगडी 9890941767 | औंध 9011948181 | भोसरी 9922151222 | हडपसर 9569300300
पिंपळे सौदागर 9049989533 | सातारा रोड 7028012434 | सोलापूर 9689913325 | सोलापूर 9890186186
अहिल्यानगर 7350553131 | अहिल्यानगर 9823140901 | बारामती 9822848988 | सातारा 9922992382 | सांगली 9421128340
KESARI.in

केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स | HONEYMOON | marigold Yatra to Spiritual Places | MY FAIR LADY | SECOND INNINGS | chota break
KESARI MICE CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122
KESARI SELECT CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850
Foreign EXchange
Shop travel-curated products. www.shop.kesari.in

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### बांगलादेश सीमेवर १७ कोटींचे सोने जप्त

**कोलकाता :** भारत-बांगलादेश सीमेवर तैनात सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी तस्करीविरोधात मोठे यश मिळवले आहे. पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यात सीमेवर गस्त घालत असताना जवानांनी एका बांगलादेशी नागरिकाला मोठ्या प्रमाणात सोन्यासह रंगेहाथ पकडले. आरोपी मोठ्या प्रमाणात सोन्याची तस्करी करून भारतीय हद्दीत शिरण्याचा प्रयत्नात होता. मात्र, जवानांच्या सतर्कतेमुळे तस्करीचा प्रयत्न अयशस्वी ठरला. बीएसएफ अधिकाऱ्यांनुसार, ही कारवाई नादिया जिल्ह्यातील हलदरपारा सीमा चौकीजवळ शनिवारी सायंकाळी करण्यात आली. या भागाच्या सुरक्षेची जबाबदारी बीएसएफच्या ३२ व्या बटालियनवर आहे. जवानांनी बांगलादेशी नागरिकाला घेरून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ८९ सोन्याची बिस्किटे जप्त करण्यात आली.

### कोंडागावमध्ये नक्षल्यांचे साहित्य केले जप्त

**कोंडागाव :** कोंडागाव जिल्ह्यात नक्षलविरोधी कारवाईत आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी एक ९ मिमी पिस्तूल, ३० किलो स्फोटकांसह मोठ्या प्रमाणात नक्षली साहित्य जप्त केले. ही कारवाई मर्दापाल पोलिस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. पोलिसांनुसार, ५ सप्टेंबरला मिळालेल्या माहितीच्या आधारे नक्षल सेल, डीआरजी/बस्तर फायटर्स आणि बीडीएस यांचे एक संयुक्त पथक पुष्पल मोखमारी येथील कोरमेल गावाच्या जंगलमय आणि डोंगराळ भागाकडे रवाना झाले. या पथकाने परिसराला घेराव घालून शोध मोहीम राबवली. जप्त केलेल्या साहित्यामध्ये ३ टिफिन बॉम्ब, जिलेटीन, विविध प्रकारचे डेटोनेटर्स, ६ वॉकी-टॉकी, इलेक्ट्रिक वायर, सेफ्टी फ्यूज, ३० किलोग्रॅम जिलेटीन, एक ९ एमएम पिस्तूल, कमर्शियल डेटोनेटर्स, कार्डेक्स वायर, लोखंडी पाईप आणि इतर वस्तूंचा समावेश आहे.

### चेन्नईत टीव्हीके नेत्याची हत्या

**चेन्नई :** तामिळनाडूची राजधानी चेन्नईमध्ये शनिवारी रात्री सत्ताधारी टीव्हीके पक्षाचे पदाधिकारी कन्नन यांची बेसंत नगर परिसरात धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली. या घटनेचे एक धक्कादायक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत. हल्लेखोर त्यांचा रस्त्यावरून पाठलाग करून त्यांच्यावर हल्ला करताना दिसत आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणात पाच आरोपींना अटक केली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, या हत्येचा संबंध जुन्या वैमनस्य आणि टोळीयुद्धाशी असू शकतो. मृत कन्नन हे सराईत गुन्हेगार होता.

# देश मादक पदार्थमुक्त करण्यासाठी कृती आराखडा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची माहिती



**पणजी, ६ सप्टेंबर**

मादक पदार्थमुक्त युवाशक्तीच्या बळावर २०४७ मध्ये विकसित भारत घडवणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे उद्दिष्ट आहे. २०२९ पर्यंत देशाला मादक पदार्थमुक्त करण्यासाठी केंद्र सरकारने एक कृती आराखडा तयार केला आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी दिली.

नक्षलवाद आणि दहशतवादाचा धोका संपवण्यासाठी जसे काम केले तसेच विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशाला मादक पदार्थमुक्त करण्यास मोदी सरकार कटिबद्ध आहे, असे शाह म्हणाले. २०२९ पर्यंत मादक पदार्थमुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने, मादक पदार्थांची तस्करी आणि त्यासाठी होणारा वित्तपुरवठ्यापासून ते पुनर्वसनापर्यंतचे संपूर्ण मादक पदार्थविरोधी जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी केंद्र सरकारने एक समन्वित आणि देशव्यापी धोरण स्वीकारले आहे, असे अमित शाह यांनी सांगितले.

मादक पदार्थमुक्त युवाशक्तीच्या बळावरच २०४७ मध्ये विकसित भारत साकार होईल, हे नरेंद्र मोदींचे उद्दिष्ट आहे, असे अमित शाह यांनी सांगितले. मादक पदार्थांच्या समस्येबाबत आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीचे अध्यक्षपद भूषवल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते; या बैठकीला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

२०१४ पूर्वी मादक पदार्थांविरुद्धचा लढा मोठ्या प्रमाणावर छोट्या तुकड्यांमार्फत आणि स्वतंत्रपणे लढला जात होता. किरकोळ आरोपींना पकडण्यातच यंत्रणा अनेकदा समाधानी असत. आमचे सरकार या लढ्याला राष्ट्रीय सुरक्षेचे प्राधान्य देत आहे, असे ते म्हणाले. मादकपदार्थांच्या मोठ्या जाळ्यांविरुद्ध तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि कार्यपद्धतीतील त्रुटींच्या संदर्भात केंद्रीय संस्था व राज्य सरकारांना संयुक्त निर्णय घेता यावेत, यासाठी २०१९ मध्ये एका संयुक्त समन्वय समितीची स्थापना करण्यात आली होती, असे शाह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### तस्करीला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय समन्वय समिती

**मादकपदार्थांच्या तस्करीच्या समस्येविरुद्ध समन्वित कारवाई सुनिश्चित करण्यासाठी, २०१९ मध्ये कार्यकारी, राज्य आणि जिल्हा स्तरांवर मादकपदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय समन्वय समिती ही चार-स्तरीय यंत्रणा स्थापन करण्यात आली, असे अमित शाह म्हणाले. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अंमली पदार्थ विरोधी विशेष कृती दले स्थापन करण्यात आली आहेत आणि स्थानिक पोलिसांना राष्ट्रीय धोरणाशी जोडण्यात आले आहे, असे शाह म्हणाले.**

### हनुमानजी झाले मतदार, यादीत जोडला फोटो

**कोटा, ६ सप्टेंबर**

कोटामध्ये निवडणूक आयोगाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोटा शहरातील वॉर्ड क्रमांक २९ च्या मतदार यादीत एका नावापुढे चक्क भगवान हनुमानजींचा फोटो जोडण्यात आला आहे. मतदार यादीतील त्या मतदाराचे नाव जगदीश, असे नमूद आहे. त्याचे घरही प्रेमनगर परिसरात नोंदवलेले आहे. मात्र, १० दिवस लोटूनही स्थानिक बीएलओला जगदीश सापडलेला नाही. बीएलओचा दावा आहे की, त्यांनी जगदीशचे नाव यादीत जोडलेले नाही. ही चूक होती की हेतुपुरस्सर, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. बीएलओच्या परवानगीशिवाय मतदार यादीत कोणतेही नाव जोडले किंवा काढले जात नाही, तर एवढी मोठी चूक कशी झाली?, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. बीएलओ राजेश गुप्ता यांनी सांगितले की, मतदार यादीनुसार रामचंद्र यांचा मुलगा जगदीश याचे नाव वॉर्ड क्रमांक २९ च्या भाग १२ मध्ये अनुक्रमांक १२९४ वर आहे. तो ३५ वर्षांचा असून प्रेम नगर सेकंड, कंसुआ परिसरात राहतो. (वृत्तसंस्था)

# जम्मू-काश्मीर, लडाख आमच्या नकाशानुसार दिसावे

## जगाच्या नवीन नकाशावर भारताची भूमिका

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

जगाच्या नवीन नकाशात जम्मू-काश्मीर आणि लडाखसह भारताचा संपूर्ण प्रदेश भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दिसला पाहिजे. भारताचा प्रदेश चुकीच्या किंवा दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने दाखवणे अमान्य असल्याचे भारताने म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्रांने जगाच्या नवीन नकाशा स्वीकारण्याला मंजुरी दिल्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने रविवारी अधिकृत निवेदन जारी केले. त्यात म्हटले की, जगाच्या नकाशावर कोणत्याही देश किंवा खंडाचे वास्तविक क्षेत्रफळ बदलणार नाही याची काळजी घ्यावी. नकाशावर प्रदेशाचा आकार पूर्वीपेक्षा काहीसा लहान किंवा मोठा असण्यावर आमचा आक्षेप नाही, तथापि पूर्वीच्या नकाशात भारताचा जो भूभाग आहे, त्याला चुकीच्या पद्धतीने दर्शवल्यास त्यावर आक्षेप असेल. संयुक्त राष्ट्र महासभेत पारित झालेला प्रस्ताव कोणत्याही विशिष्ट नकाशाला, नकाशा तयार करण्याच्या पद्धतीला किंवा देशांच्या सीमांना मान्यता देत नाही. त्यामुळे जम्मू-काश्मीर आणि लडाखसह भारताचा संपूर्ण सार्वभौम प्रदेश भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दर्शविला जावा. भारताच्या प्रदेशाचे कोणतेही चुकीचे किंवा दिशाभूल करणारे चित्रण स्वीकारले जाणार नाही.

**खंडांचा आकार प्रत्यक्षापेक्षा वेगळा**

नवीन नकाशात भारत काहीसा मोठा दिसू शकतो, तर आफ्रिका जुन्या नकाशाच्या तुलनेत मोठा दिसेल. समुद्रातील जहाजांचे मार्ग आणि दिशा समजून घेणे सोपे करणे हा नवीन नकाशा जारी करण्याचा उद्देश आहे. संपूर्ण गोल पृथ्वी सपाट नकाशावर दाखवल्यामुळे, त्यात देश आणि खंडांचा आकार प्रत्यक्षापेक्षा वेगळा दिसण्याची शक्यता आहे. आफ्रिकन देश टोगोचे परराष्ट्रमंत्री रॉबर्ट डुसे म्हणाले की, नकाशे केवळ भूगोल समजून घेण्याचे साधन नाहीत, तर ते शिक्षण आणि लोकांच्या विचारांवरही परिणाम करतात. हा प्रस्ताव टोगोने मांडला होता आणि त्याला आफ्रिकन संघाचा पाठिंबा मिळाला. (वृत्तसंस्था)

# मृतकांचा आकडा १३८९ वर




**काठमांडू, ६ सप्टेंबर**

नेपाळमधील विनाशकारी पुराला जवळपास दोन आठवडे उलटूनही, मदत आणि शोधकार्य अजूनही सुरू आहे. या आपत्तीत मोठ्या संख्येने लोकांनी आपले प्राण गमावले असून, हजारो लोक अद्याप बेपत्ता आहेत. रविवारपर्यंत मृतकांचा आकडा १३८९ वर पोहोचला असून जवळपास ५,००० लोक अजूनही बेपत्ता आहेत. आतापर्यंत १३,१०० हून अधिक लोकांना वाचविण्यात आले आहे.

दुर्गम भागातून सापडलेल्या मृतदेहांची आणि मानवी अवशेषांची ओळख पटवणे हे प्रशासनापुढील एक मोठे आव्हान बनले आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, पोलिसांनी बेपत्ता लोकांच्या नातेवाईकांकडून डीएनए नमुने गोळा करण्यास सुरुवात केली आहे. पुरात उत्तर आणि मध्य नेपाळमधील अनेक वस्त्या उद्ध्वस्त झाल्या. घरे, वाहने, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्प वाहून गेले. या घटनेत चीनमध्ये ३१ लोकांचा मृत्यू झाला, तर तिबेटमध्ये ५०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मते, चितवन जिल्ह्यात सर्वाधिक ३६२ मृतदेह सापडले आहेत. नवलपरासी पूर्व, नवलपरासी पश्चिम, नुवाकोट, रसुवा, गोरखा, धादिंग आणि तनहुन जिल्ह्यांमध्येही मृतदेह सापडले आहेत. आतापर्यंत केवळ ९८ मृतदेहांची ओळख पटवून ते त्यांच्या कुटुंबीयांकडे परत करण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

# आठ आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

## राम मंदिर देणगी अपहार प्रकरण

**अयोध्या, ६ सप्टेंबर**

राम मंदिरातील देणग्यांच्या कथित अनियमिततांप्रकरणी अटक करण्यात आलेल्या सर्व आठ आरोपींची न्यायालयीन कोठडी येथील न्यायालयाने शनिवारी १८ सप्टेंबरपर्यंत वाढवली, अशी माहिती त्यांच्या वकिलांनी दिली.

राज्य सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालाच्या आधारे २५ जून रोजी एफआयआर दाखल करण्यात आल्यानंतर, मंदिरातील देणगी मोजण्याच्या प्रक्रियेशी संबंधित असलेल्या आठ आरोपींना अटक करण्यात आली. ते सध्या कारागृहात आहेत. सर्व आरोपींची न्यायालयीन कोठडी १८ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली, असे आरोपींचे प्रतिनिधित्व करणारे वकील कुल शेखर सिंह यांनी सांगितले.

हा आदेश अयोध्येतील लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालयाचे विशेष न्यायाधीश रजत वर्मा यांनी दिला. अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लव कुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, राम शंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव आणि रमाशंकर उर्फ टिन्नू यादव अशी अटक करण्यात आलेल्या आठ आरोपींची नावे आहेत. आपल्या जामीन अर्जात श्रीवास्तव यांनी न्यायालयाला देणगी मोजण्याच्या प्रक्रियेबद्दल माहिती दिली आणि आपल्याला या प्रकरणात खोट्या आरोपाखाली गोवण्यात आल्याचा दावा केला, असे वकिलांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### मातीचे घर कोसळून चौघांचा मृत्यू

**कानपूर :** कानपूरच्या भितरगावमध्ये रविवारी सकाळी १०:३० वाजता एक भीषण अपघात झाला. एक मातीचे घर अचानक कोसळले. घरमालक मुकेश सिंग आणि त्यांच्या तीन मुली ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. यात वडिलांसह तीन मुलींचा मृत्यू झाला तर एक मुलगी गंभीर जखमी आहे. घर कोसळताच किंकाळ्या आणि आक्रोश सुरू झाला.



नेपाळ-तिबेट सीमेवरील हे ते ठिकाण आहे जेथे २६ ऑगस्टच्या महाप्रलयापूर्वी चीनने बांधलेली चार मजली इमिग्रेशन सेंटरची इमारत दिमाखात उभी होती. येथूनच कैलास मानसरोवर आणि चीनला रस्तामार्गे जात येत असे. इमारत पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहे. आता फक्त खिंड आणि त्यातून वाहणारा भोटेकोशी नदीचा प्रवाह दिसत आहे.

# देशात दंगली घडवल्या जाण्याची शक्यता : राज

**मुंबई, ६ सप्टेंबर**

आता गणपतीचे दिवस आहेत. या दिवसांमध्ये दंगली घडवल्या जाण्याची शक्यता आहे. देशभरात हेच सुरू आहे, जेणेकरून तुम्ही त्यामध्येच अडकले पाहिजे. लोकांना धर्मांध करून मूळ प्रश्नांवरून लक्ष भरकटवण्याचे प्रयत्न होत आहेत. मुंबईत याची झलक दिसली आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले.

देवावरची श्रद्धा, धर्माबद्दलचा अभिमान इतके आपण समजू शकतो.



पण माणसांनी धर्मांध असू नये. आपल्या धर्मांचा आपल्याला अभिमान असला पाहिजे, पण तुमच्यामध्ये राग निर्माण केला जात असून तुमचे लक्ष दुसरीकडे जाऊ नये, यासाठीच हे प्रयत्न केले जात आहेत, असेही राज ठाकरे यांनी नमूद केले.

२०२१ मध्ये भारतात ज्या विदेशी कंपन्या आल्या होत्या. त्यामधील ५०० कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे. यातून किती नोकऱ्या गेल्या याचा अंदाज बांधला पाहिजे. हा केंद्र सरकारचा डेटा आहे, मी तयार केलेला नाही. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे, असा दावाही त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

### भारत- बेल्जियम मैत्रीचा इंडिया गेटरुपी चॉकलेट केक

**आंतरराष्ट्रीय** पातळीवर सध्या चॉकलेट डिप्लोमसी जोरात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना सदिच्छा भेट म्हणून मेलोडी चॉकलेट दिले होते. ही चॉकलेट डिप्लोमसी तेव्हा खूप चर्चेचा विषय झाली होती. आता नुकतेच भारताच्या दौऱ्यावर येऊन गेलेले बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेवर यांनी पंतप्रधान मोदींसाठी अतिविशेष असे चॉकलेट आणले होते. पण हे चॉकलेट नेहमीसारखे नव्हते, तर इंडिया गेटच्या प्रतिकृतीच्या रुपात होते. मात्र हे चॉकलेट मोदी यांना भेट म्हणून देण्याची वेवर यांची इच्छा पूर्ण झाली नाही. राजधानी दिल्लीतील गरमीमुळे आणताआणताच हा इंडिया गेटरुपी चॉकलेट केक प्रवासात विरघळून गेला. पंतप्रधान मोदींना इंडिया गेटरुपी चॉकलेट केक द्यायची माझी इच्छा होती, पण ती पूर्ण होऊ शकली नाही, असे वेवर म्हणाले. खरा इंडिया गेट एका शतकापासून राजधानी दिल्लीत




भक्कमपणे उभा आहे, पण चॉकलेटची इंडिया गेटची प्रतिकृती बेल्जियमवरुन आणताआणता प्रवासातच विरघळून गेली, असे ते म्हणाले. चॉकलेट हे कुटनीतीसाठी चांगले असते, पण कुटनीतीच्या प्रवासासाठी तितके चांगले नसते, अशी मार्मिक प्रतिक्रियाही वेवर यांनी हसतहसत व्यक्त केली. बेल्जियमच्या चॉकलेटने बनवलेली इंडिया गेटची दुसरी प्रतिकृती बेल्जियममध्ये आहे, अधिक काळजी घेत ती भारतात पाठवली जाईल आणि पंतप्रधान मोदींना दिली जाईल, असा विश्वासही वेवर यांनी व्यक्त केला.

भारत बेल्जियम द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी जाणिवपूर्वक इंडिया गेटची प्रतिकृती निवडण्यात आली, याकडे वेवर यांनी लक्ष वेधवे. जवळपास शंभर वर्षापूर्वी भारतीय सैनिक बेल्जियमच्या भूमीवर लढण्यासाठी गेले होते. या सैनिकांनी बेल्जियमच्या रक्षणासाठी केलेला पराक्रम आणि त्यांचे बलिदात बेल्जियम कधीच विसरणार नाही, चॉकलेटच्या इंडिया गेटच्या प्रतिकृतीत भारतीय सैनिकांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा गौरवपूर्ण उल्लेख होता, याकडे वेवर यांनी लक्ष वेधले. हा चॉकलेटरुपी केक भारत बेल्जियमचा संयुक्त गौरवशाली वारसा आणि भविष्यातील वाटचालीची साक्ष देणारा आहे, असे ते म्हणाले.

### सतीश पुनिया यांच्या कार्यालयावरील पाटी

**भाजपाचे** राज्यसभा सदस्य सतीश पुनिया यांचा राष्ट्रीय महासचिव म्हणून भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत समावेश झाला आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन एवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी पुनिया यांच्याकडे विधानसभा निवडणूक होणार असलेल्या पंजाबचे प्रभारी म्हणूनही जबाबदारी सोपवली आहे. पुनिया यांनी भाजपाचे राष्ट्रीय महासचिव म्हणून भाजपा मुख्यालयात पदभार सांभाळला आहे. भाजपा मुख्यालयातील त्यांच्या दालनात भेटायला येणार्यांची दररोज गर्दी असते. येणारे मोठेमोठे पुष्पगुच्छ आणि भेटी घेऊन येत असतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पुनिया यांनी आपल्या कार्यालयाच्या दाराबाहेर पाटी एक लावली आहे. या पाटीवर माझ्या कार्यालयात तुमचे स्वागत आहे, पण येतांना पुष्पगुच्छ वा कोणतीही भेटवस्तु घेऊन येऊ नका, असे आवाहन केले आहे. तुम्हाला आणायचेच असेल तर फक्त एखादे फुल वा पुस्तक घेऊन या, तुमचे प्रेम आणि शुभेच्छा याच माझ्यासाठी सर्वात मोठी भेटवस्तु आहे, असे पुनिया यांनी म्हटले आहे. आपल्या अशा आचरणातून सतीश पुनिया यांनी एक चांगला संदेश कार्यकर्त्यांना दिला आहे.

सतीश पुनिया यांनी राजस्थान भाजपाचे अध्यक्षपद भूषवले आहे. याआधी भाजपाने पुनिया यांना हरयाणाचे प्रभारी बनवले होते, हरयाणात भाजपाला सलग तिसर्यांदा सत्तेवर आणण्यात पुनिया यांचे मोठे योगदान मानले जाते. त्यांच्या याच अनुभवाचा फायदा घेण्यासाठी भाजपाने त्यांच्याकडे शेजारच्या पंजाब या राज्याची जबाबदारी दिली आहे. भाजपासाठी यावेळी पंजाब विधानसभेची निवडणूक अतिशय महत्वाची आहे.

### जलशक्ती मंत्र्यासोबत पंतप्रधान मोदी यांची भेट

**राजधानी** दिल्लीत दररोजच कोणत्या न कोणत्या मंत्रालयाच्या बैठकी सुरू असतात. या बैठकींसाठी राज्यातील संबंधित खात्यांचे मंत्री आणि सचिवांनाही आमंत्रित केले जात असते. राजधानीत मागील आठवड्यात जलशक्ती मंत्रालयाने सर्व राज्याच्या पाणीपुरवठा मंत्र्याच्या एका परिषेदेचे आयोजन केले होते, या परिषदेला २३ राज्याचे पाणीपुरवठा मंत्री उपस्थित होते. परिषदेसाठी दिल्लीत आलेल्या मंत्र्यांना एक वेगळीच भेट मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्व मंत्र्यांना आपल्या निवासस्थानी न्याहारी बैठकीसाठी बोलावले. या बैठकीचे नियोजन भाजपाच्या सुशासन आणि धोरण संशोधन विभागाचे प्रमुख आणि माजी राज्यसभा सदस्य डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी केले होते. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनीही या सर्व मंत्र्यांना आपल्या निवासस्थानी स्नेहभोजनासाठी आमंत्रित केले होते.

पंतप्रधान मोदी यांनी संवाद अभियान सुरु केले आहे, मोदी केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्याशी नियमित संवाद साधतात, लोकसभा तसेच राज्यसभेच्या खासदारांना आपल्या निवासस्थानी गटगटाने भेटतात, महिला मंत्री आणि महिला खासदारांशीही मोदी संवाद साधत त्यांचा उत्साह वाढवत असतात. याच मालिकेत विविध राज्यांचे मुख्यमंत्री, प्रदेश अध्यक्ष, विविध राज्यातील मंत्र्यांनाही भेटण्याचेही मोदी यांचे नियोजन आहे. त्याच मालिकेत यावेळी राज्याच्या पाणीपुरवठा मंत्र्यांची मोदी यांनी भेट घेतली, आणि त्यांना कामाच्या दृष्टीने अपयुक्त टिप दिल्या. २०२९ ची लोकसभा निवडणूक तसेच विविध राज्यात होणार्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने भाजपाचे हे नियोजन आहे. पंतप्रधान मोदी यांच्याशी होणारी भेट ही भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी मग तो आमदार असो, खासदार असो की मंत्री, मुख्यमंत्री आणि प्रदेशअध्यक्ष सर्वांसाठी उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी असते. ज्यांना पंतप्रधान मोदींसोबतच्या अशा भेटीचे निमंत्रण मिळते, ते स्वतःला भाग्यवान समजतात.

● दिल्लीवाला

# फ्रान्समधील मंदिर भाविकांसाठी खुले

**४० देशांतील संत-नागरिकांची उपस्थिती**

## प्राणप्रतिष्ठा सोहळा दिमाखात साजरा

**पॅरिस, ६ सप्टेंबर**

फ्रान्सची राजधानी पॅरिस फॅशनसाठी जगप्रसिद्ध असली तरी, आज ती तिच्या हिंदू मंदिरामुळे चर्चेत आली आहे. पॅरिसमधील बुसी-सेंट-जॉर्जेस येथे बीएपीएस स्वामिनारायण हिंदू मंदिराचा लोकार्पण सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. याप्रसंगी युरोप, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, आफ्रिका आणि आशियासह ४० देशातून मोठ्या संख्येने संत आणि भक्त उपस्थित होते.मंदिराचे उद्घाटन आणि प्रतिष्ठापना महंत स्वामी महाराजांच्या हस्ते पार पडला.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी, पॅरिसमध्ये संगीत, कला आणि भक्तीपूर्ण कार्यक्रमांचे प्रदर्शन करणारी एक भव्य शहर मिरवणूक आयोजित करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील कलाकारांनी भारताच्या कलात्मक आणि आध्यात्मिक परंपरांना जिवंत केले. हिंदू मंदिरामुळे फ्रान्समधील भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्म यांच्यातील प्रेम आणि सलोख्याच्या भावनेत एका नवीन अध्यायाची सुरुवात झाली आहे.



पॅरिसमधील बुसी-सेंट-जॉर्जेस येथे बीएपीएस स्वामिनारायण हिंदू मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात उपस्थित संत

मंदिराचा भूमिपूजन सोहळा २०२१ मध्ये संतांच्या उपस्थितीत पार पडला आणि २०२२ मध्ये पायाभरणी समारंभ झाला. हे मंदिर ५,००० चौरस मीटर परिसरात पसरलेले आहे. वरच्या मजल्यावर एक पारंपरिक मंदिर आहे आणि तळमजल्यावर एक सुंदर वाडा आहे. याच्या बांधकामात ग्वाल्हेरच्या वाळूच्या दगडासोबतच भारत, इटली, ग्रीस आणि व्हिएतनाममधील संगमरवराचा वापर करण्यात आला.

**भारतीय वास्तुकला, अभियांत्रिकीचा सुंदर मिलाफ**

हे भव्य मंदिर पारंपरिक भारतीय वास्तुकला आणि आधुनिक फ्रेंच अभियांत्रिकी यांचे एक अद्वितीय उदाहरण आहे. वरच्या मजल्यावर एक पारंपरिक मंदिर आहे, तर खालच्या मजल्यावर 'मरू गुर्जर' शैलीत बांधलेली एक भव्य सांस्कृतिक वास्तू आहे. या संकुलात पाच भव्य शिखरे, दहा मोठे घुमट, २० कलाकुसर केलेले स्तंभ, १२० कोरीव खिडक्या, ४९ शिल्पपट यांचा समावेश आहे. भारतातील कुशल कारागिरांनी दगड हाताने कोरले, नंतर ते फ्रान्सला पाठवले आणि मंदिरात स्थापित केले. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अमेरिकेच्या युद्धनौकेवर इराणचा हल्ला

## तेलवाहू जहाजांवरील हल्ल्याचा घेतला सूड; होर्मुझमध्ये तणाव वाढला

**दुबई, ६ सप्टेंबर**

आखातात इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्ष एका धोकादायक वळणावर पोहोचला आहे. अमेरिकेच्या सैन्याने शनिवारी खार्ग बेटाजवळ तीन तेलवाहू जहाजांना लक्ष्य केल्यानंतर इराणने हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देत होर्मुझमध्ये तैनात अमेरिकेच्या युद्धनौकेवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यात अमेरिकेच्या झालेल्या नुकसानीची माहिती समोर आली नाही.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, त्यांनी अमेरिकेच्या नौदलाच्या विमानवाहू जहाजाला आणि विनाशिकेला लक्ष्य करून अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे अमेरिकेच्या जहाजांचे मोठे नुकसान झाले, ज्यामुळे त्यांना भीतीने त्या भागातून पळून जावे लागले.अमेरिकेच्या लष्कराने इराणचे दावे पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की त्यांच्या विमानवाहू जहाजाने आणि विनाशिकेने इराणी हल्ले परतवून लावले. या घटनेत अमेरिकेचा कोणताही सैनिक जखमी झाला नाही. आमच्या दोन जहाजांवर हल्ला केला, तर आम्ही मोठी आर्थिक किंमत वसूल करू आणि तुमची तीन जहाजे बुडवू," अशी ठाम भूमिका घेतली, तेव्हा हा वाद आणखी वाढला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इशारा देताना म्हटले की, युद्धनौकांना पोहोचवण्याचा प्रयत्न झाल्यास इराणला मोठी किंमत चुकवावी लागेल, त्यांना विनाशापासून कोणीही वाचवू शकणार नाही. (वृत्तसंस्था)



होर्मुझ जलमार्गात तैनात अमेरिकेच्या युद्धनौकांवर हल्ले करताना इराणी सैन्य

### सर्व तेलवाहू जहाजे समुद्रात बुडवू : हेगसेथ

अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी म्हटले की, इराणने रविवारी पहाटे होर्मुझ जलमार्गात गस्त घालणाऱ्या युद्धनौकांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. हवाई संरक्षण प्रणालीने इराणचे हल्ले उधळून लावले. यापुढे इराणने हल्ल्याचा प्रयत्न केल्यास त्यांची सर्व तेलवाहू जहाजे समुद्रात बुडवली जातील. अडमिरल कूपर यांनी अमेरिकेच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आणि हे स्पष्ट केले की, वॉशिंग्टन आपल्या लष्करी दलांचे संरक्षण करण्यासाठी कोणत्याही थराला जाईल आणि गरज पडल्यास इराणच्या संपूर्ण तेलवाहू जहाजांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यास अजिबात मागेपुढे पाहणार नाही. ■

### आम्ही पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली

अमेरिकेच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून, इराणने इशारा दिला की ते होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या अनधिकृत आणि अमेरिकेशी संबंधित जहाजांवरील हल्ले तीव्र करतील. जर अमेरिकेने आपली आक्रमक कारवाई सुरूच ठेवली, तर त्यांनी इराणी सशस्त्र दलांकडून होणाऱ्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आणि गंभीर हल्ल्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी. आम्ही पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. वाढता आर्थिक दबाव कमी करण्यासाठी इराणने निर्बंध आणि अमेरिकेची नाकाबंदी टाळण्यासाठी इतर मार्ग शोधले आहेत. त्यामुळे त्यांच्या नाकाबंदीचा आमच्यावर परिणाम होणार नाही. ■




# डीएनए चाचणी हीच शेवटची आशा

## आप्तांची ओळख पटविण्याचा उरला एकमेव पर्याय


डीएनए नमुना संकलन केंद्रात नातेवाईकांची गर्दी

**काठमांडू, ६ सप्टेंबर**

२६ ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेजवळ बर्फ व खडकांच्या दरडी कोसळल्यामुळे अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळच्या उत्तर व मध्य भागातील शहरे व गावांचे प्रचंड नुकसान झाले. या पुरानंतर सापडलेल्या शेकडो मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी व बेपत्ता नातेवाईकांचा शोध घेण्यास कुटुंबांना मदत करण्यासाठी प्रशासन आता डीएनए चाचणीवर अवलंबून आहे. बेपत्ता आप्तांचा शोध घेणाऱ्या कुटुंबांसाठी डीएनए चाचणी हीच शेवटची आशा आहे.

आपत्तीत १,३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर सुमारे ५,००० लोक अजूनही बेपत्ता आहेत. ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी आतापर्यंत २,२७२ डीएनए नमुने गोळा केले आहेत; यात १,२६० नमुने मृतदेहांकडून आणि १,०१२ नमुने नातेवाईकांकडून घेण्यात आले आहेत. डीएनए नमुने गोळा केल्यानंतर आणि ओळख पटवण्याची इतर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १,०३० मृतदेह दफन करण्यात आले आहेत, यामध्ये २२२ महिला, ३५५ पुरुष आणि ४५३ अशा मृतदेहांचा समावेश आहे, ज्यांचे लिंग निश्चित करता आले नाही, अशी माहिती प्रशासनाने दिली. ओळख पटल्यानंतर आतापर्यंत केवळ ९६ मृतदेह कुटुंबांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

'द काठमांडू पोस्ट' या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, दियाली यांचा पुतण्या अविनाश याने त्या तुटलेल्या हाताचा फोटो त्यांना पाठवला व सांगितले की, 'मला एक हात सापडला आहे जो अगद काकांच्या हातासारखा दिसतो. दियाली यांच्यासाठी ही घटना आश व भीती अशा दोन्ही भावना घेऊ आली. आता तो मृतदेह त्यांच्य भावाचाच आहे की नाही, हे जाणू घेण्यासाठी डीएनए चाचणी हा त्यांच्या कुटुंबासमोरील एकमेव पर्या उरला आहे. मृत व्यक्तींची ओळख पटविणे हे एक मोठे आव्हान बनल आहे. प्रवाहाबरोबर वाहून गेलेल्य मृतदेहांची अवस्था अत्यंत खरा झाली. (वृत्तसंस्था

# मणिपूरमध्ये चकमक; दोन बंडखोर ठार


चुराचंदपूर जिल्ह्यात सुरक्षा दलाने राबवलेल्या शोधमोहिमेवेळी जप्त करण्यात आलेली शस्त्रे

**इम्फाळ, ६ सप्टेंबर**

मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यात बीएसएफ आणि आसाम रायफल्सच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम राबवली, यावेळी युनायटेड कुकी नॅशनल आर्मीच्या (यूकेएनए) बंडखोरांसोबत चकमक झाली. यात दोघांचा मृत्यू झाला, तर दोन जखमी आहे. कारवाईवेळी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी चुराचंदपूर जिल्ह्यातील हेंगलेप उपविभागातील फाबोंग गावात शोधमोहीम राबवली. यावेळी लपून असलेल्या प्रतिबंधित यूकेएनएच्या सदस्यांनी पथकावर गोळीबार केला. प्रत्युत्तरात संघटनेचे दोन सदस्य ठार झाले, तर दोन जखमी आहे. इतर पसार होण्यात यशस्वी झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. घटनास्थळावरून शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. शोधमोहीमेत प्रतिबंधित संघटनेचा छुपा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला. कारवाईत दोन एमए रायफल्स, एक एके-५६ रायफल, एक लाठोड बंदूक, सात लाठोड ग्रेनेड, १५ एके मॅगझिन्स, ३७१ एके-५६ काडतुसे, ६०१ एमए रायफल काडतुसे आणि १७२ एसएलआर काडतुसे जप्त करण्यात आली. याव्यतिरिक्त, १५ लढाऊ गणवेश आणि सात दारूगोळ्याच्या पिशव्याही सापडल्या. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानी पंजाबला शेजारी प्रांतांचा मोठा धोका : मरियम नवाझ

**लाहोर, ६ सप्टेंबर**

आमच्या प्रांताला शेजारी देशांपेक्षा जास्त धोका शेजारच्या प्रांतांकडून आहे, असा दावा पाकिस्तानातील पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाझ यांनी केला. गेल्या काही वर्षांत पाकिस्तानात, विशेषतः पंजाबला लागून असलेल्या खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान या प्रांतांमध्ये दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली आहे. पंजाबची सीमा भारतालाही लागून आहे.



पंजाबमध्ये प्रांतीय सीमांमधून दहशतवाद प्रवेश करतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, १३ कोटी लोकसंख्या असलेल्या पंजाबला शेजारील देशांपेक्षा शेजारील प्रांतांकडूनच अधिक धोका निर्माण झाला आहे, असे मरियम नवाझ यांनी शनिवारी लाहोरमधील एका कार्यक्रमात सांगितले. खैबर पख्तुनख्वा प्रांतातूनच दहशतवाद पंजाबमध्ये प्रवेश करतो. सर्वांचे लक्ष पंजाबकडे असते, पण सुदैवाने पंजाब सुरक्षित आहे, असे त्या म्हणाल्या. मरियम नवाझ यांचे वक्तव्य अपमानजनक आहे, अशी टीका खैबर पख्तुनख्वा प्रांतातील सरकारचे नेतृत्व करणाऱ्या पाकिस्ता तेहरिक-ए-इन्साफ या विरोधी पक्षाच्य नेत्याने मरियम नवाझ यांच्या वक्तव्याव केली. मरियम नवाझ यांनी केलेल अपमानजनक विधाने अत्यंत लज्जास्प आहेत, असे पीटीआयचे ज्येष्ठ नेते अस कैसर यांनी म्हटले. खैबर पख्तुनख्वा लोक तिच्या काकांच्या नेतृत्वाखाली सध्याच्या संघीय सरकार तसेच नवाझ शरीफ यांच्या आधीच्या सरकारां राबवलेल्या सदोष आणि अयशस्व धोरणांचे परिणाम भोगत आहेत, असे त्यां एका निवेदनात म्हटले. (वृत्तसंस्था

# महिला वृत्तनिवेदिकेसह बारा जणांना मृत्युदंड

## इजिप्तच्या न्यायालयाचा निर्णय

**कॅरिओ, ६ सप्टेंबर**

मादकपदार्थ तस्करीशी संबंधित एका प्रकरणात इजिप्तच्या एका कनिष्ठ न्यायालयाने वृत्तनिवेदिका सारा खलिफासह १२ जणांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. दोषी ठरवलेले सर्व एका गुन्हेगारी टोळीचा भाग असून, ही टोळी परदेशातून मादकपदार्थ बनवण्यासाठी लागणारे साहित्य आयात करून मादकपदार्थांची निर्मिती करायचे आणि त्याची देशात तस्करी करत असल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. आरोपींकडून बेकायदेशीर शस्त्रे आणि दारुगोळा देखील जप्त करण्यात आला.


सारा खलिफा

इजिप्तमध्ये मृत्युदंडाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाला देशाच्या ग्रँड मुफ्तींचा धार्मिक सल्ला घेणे आवश्यक असते. ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निर्णय दिला आहे. पोलिसांनी एका घरावर छापा टाकून ७५० किलोग्रॅमपेक्षा जास्त मादकपदार्थ जप्त केले होते. याव्यतिरिक्त, उत्पादनासाठी परदेशातून आयात केलेला कच्चा मालही जप्त करण्यात आला. या प्रकरणातील वीस साक्षीदारांनी सरकारी वकिलासमोर आपले जबाब नोंदवले. तपासादरम्यान मिळालेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्यांमध्ये रेकॉर्ड केलेली संभाषणे आणि व्हिडीओ क्लिप्सचा समावेश होता. दरम्यान ३९ वर्षीय सारा खलिफा ही एक इजिप्शियन टीव्ही निवेदिका आहे. तिने तिच्यावरील सर्व आरोप नाकारले आहेत. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या २०२५ च्या अहवालानुसार इजिप्तच्या न्यायालयांनी ४९२ लोकांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आणि २३ जणांना फाशी देण्यात आली. (वृत्तसंस्था)


# लग्नसमारंभात भीषण आग, २२ जणांचा होरपळून मृत्यू

### इमारतीच्या अरुंद कॉरिडॉरमध्ये अडकले पाहुणे

**किंशासा, ६ सप्टेंबर**

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगोची राजधानी असलेल्या किंशासा येथील लिंगवाला भागात एका विवाह समारंभादरम्यान भीषण आग लागली. या आगीत २२ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी आहेत.

लग्न समारंभ असल्याने सर्व लोक आनंदात होते. मात्र या आनंदाच्या वातावरणातच अचानक लागलेल्या आगीमुळे इमारतीत एकच धावपळ उडाली. मात्र, इमारतीतील रस्ते आणि बाहेर पडण्याचे मार्ग अत्यंत अरुंद असल्याने पाहुण्यांना वेळेत बाहेर पडता आले नाही. शनिवारी रात्री उशिरा एका बहुमजली इमारतीला आग लागली. आगीची माहिती मिळताच स्थानिकांनी धाव घेतली आणि जीवाची पर्वा न करता अनेकांना बाहेर काढले.


आगीत राख झालेला लग्नातील हॉल

दरम्यान जखमींना रस्त्याच्या कडेला हलवण्यात आले; मात्र काहींचा जागीच तर काहींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. लिंगवालाचे महापौर नॉर्बर्ट मुशिंगा यांनी २२ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. तसेच, हा आकडा आणखी वाढण्याची शक्यताही वर्तवली आहे. अद्याप आगीचे स्पष्ट कारण समजू शकले नाही. गृहमंत्री जॅकमिन शाबानी यांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे. महत्वाचे म्हणजे, कांगोमध्ये कोरड्या हवामानामुळे अशा आगीच्या घटना वारंवार घडतात. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता



### नीम करोली बाबांची कथा जगभर पोहोचणार

**मुंबई :** निम करोली बाबांचे नाव घेताच भक्तांच्या मनात महावीर हनुमानांची आठवण जागी होते. या महान संतांची जीवनकथा भारतीय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्यांनतर आता ती जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. नीम करोली बाबा हे भारतातील एक महान आध्यात्मिक संत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विचारांनी आणि आध्यात्मिक प्रभावाने स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग आणि ज्युलिया रॉबर्ट्स यांसारख्या जगप्रसिद्ध व्यक्तींनाही प्रेरणा मिळाली होती. भारतीय चित्रपटगृहांमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर हिंदी भक्तिपर चित्रपट 'हनुमान अंश' आता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाच्या आंतरराष्ट्रीय वितरणाची जबाबदारी होम्बले फिल्म्सने स्वीकारली असून, ११ सप्टेंबर २०२६ रोजी हा चित्रपट जगभरात प्रदर्शित केला जाणार आहे. दमदार कथानकाला मिळालेल्या सकारात्मक तोंडी प्रसिद्धीमुळे चित्रपटाविषयीची प्रेक्षकांची उत्सुकता सातत्याने वाढत आहे. ■

### 'जीडीएन'चा चौथा आठवडाही दमदार

**मुंबई :** आर. माधवन हा आपल्या वैविध्यपूर्ण भूमिकांमुळे सातत्या चर्चेत असलेला अभिनेता. भारतीय सिनेमातील सर्वाधिक टिकाऊ पॅन इंडिया कलाकारांपैकी एक असल्याचे त्याने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे दिग्गज संशोधक जी. डी. नायडू यांच्या जीवनावर आधारित त्याच महत्त्वाकांक्षी आणि हृदयस्पर्शी चित्रपट 'जीडीएन' सध्या प्रदर्शनाच्या चौथ्य आठवड्यातही बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत आहे. ७ ऑगस रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली असून सातत्याने दर्जेदार काम करणारा अभिनेता म्हणून माधवनच्या कारकिर्दीलाह या चित्रपटाच्या यशाची नवी किनार लाभली आहे. चित्रपटात माधवन केवळ दूरदर्शी संशोधक जी. डी. नायडू यांची व्यक्तिरेखा साकारलेली नाही तर सह-निर्माता म्हणूनही त्याने या प्रकल्पाचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे य चित्रपटाचे यश त्याच्यासाठी विशेष वैयक्तिक महत्त्वाचे ठरले आहे. ■

### प्रियांका चोप्राचा पॅरिसमध्ये जलवा



**पॅरिस :** पॅरिस आणखी एका भव्य फॅशन सोहळ्यासाठी सज्ज होत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय असलेली अभिनेत्री प्रियांका चोप्रा जोनस या सोहळ्याच्या केंद्रस्थानी असणार आहे. यंदाच्या प्रतिष्ठित एलव्हीएमएच पुरस्कार सोहळ्यात प्रियांका चोप्रा मानाचा कार्ल लागरफेल्ड पुरस्कार प्रदान करणार आहे. विशेष म्हणजे, हॉलिवूड अभिनेत्री जेनिफर लॉरेन्स आणि थायलंडची अभिनेत्री उरासाया 'याया' स्परबुंड यांच्यासोबत प्रियांका पुरस्कार सोहळ्याच्या सादरकर्त्यांमध्ये सहभागी होणार आहे. फोंदासिओं लुई व्हुइटन येथे होणाऱ्या या सोहळ्यात डिओरच्या सदिच्छादूत जेनिफर लॉरेन्स आणि प्रियांका चोप्रा जोनस यांच्यासह लुई व्हुइटनची प्रतिनिधी असलेली उरासाया सहभागी होणार आहे. फॅशन क्षेत्रातील नव्या पिढीतील प्रतिभावंतांचा गौरव करणाऱ्या या सोहळ्यात यंदा नऊ उदयोन्मुख व नव्या दमाचे वस्त्ररचनाकार तीन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी स्पर्धा करणार आहेत. ■

# पाडलेल्या मशिदीखाली सापडली विहीर

**साहरनपूर, ६ सप्टेंबर**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील एका मशिदीच्या रचनेवरून वाद सुरू असतानाच, रविवारी त्या मशिदीच्या ढिगाऱ्याखाली सुमारे २० फूट खोल आणि दीड मीटर रुंद विहीर आढळून आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.




शनिवारी जवळपास १६ तास चाललेल्या मोहिमेत बुलडोझरचा वापर करून मशीद पाडल्यानंतर, दुसऱ्या दिवशी त्या जागेवरील ढिगारा हटवला जात असताना ही विहीर आढळून आली. रविवारी सकाळी ढिगारा हटवताना एक स्लॅब आढळून आला. कटरच्या साहाय्याने तो स्लॅब कापल्यानंतर, त्याच्या खाली विहीर असल्याचे दिसून आले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. ही बाब उघडकीस आल्यानंतर काही वेळातच सहारनपूरचे उपविभागीय दंडाधिकारी सुबोध कुमार घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी त्या विहिरीचा प्राचीनत्व व इतिहास जाणून घेण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला सूचित केले.

ती विहीर साधारणपणे शंभर वर्षे जुनी असावी असे दिसते; मात्र, तिचे नेमके वय आणि ऐतिहासिक महत्त्व पुरातत्व तज्ज्ञांच्या तपासणीनंतरच निश्चित होईल. पूर्वीच्या काळी, जेव्हा नळाद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध नव्हता, तेव्हा विहिरी हा लोकांसाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत होता. धार्मिक विधींसाठी आणि अंघोळीसाठी लागणाऱ्या पाण्याकरिताही पारंपरिकरीत्या विहिरींचा वापर केला जात असे; आजही अनेक जुन्या मशिदींच्या परिसरात विहिरी पाहायला मिळतात. विहिरीत माती आणि कचरा पडू नये म्हणून सध्या ती लोखंडी पत्र्याने झाकून ठेवण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेली एक मशीद शनिवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात पाडण्यात आली. (वृत्तसंस्था)

### बजरंग दलाने दाखल केली होती याचिका

२०२५ मध्ये, बजरंग दलाचे प्रादेशिक संयोजक विकास त्यागी यांनी शहर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात एक याचिका दाखल करून, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारत बेकायदेशीर असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर, सहारनपूरच्या शहर दंडाधिकाऱ्यांनी ती वास्तू बेकायदेशीर घोषित करून ती पाडण्याचा आदेश दिला. मशीद व्यवस्थापन समितीने या आदेशाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील केले, परंतु न्यायालयाने २ सप्टेंबर रोजी ते फेटाळून लावले. ■

# इंधन टँकरच्या स्फोटात ११ जणांचा मृत्यू

**तेहरान, ६ सप्टेंबर**

पश्चिम इराणमध्ये एका इंधन टँकरचा स्फोट होऊन ११ जणांचा मृत्यू झाला व ७ जण जखमी झाले, असे सरकारी माध्यमांनी सांगितले. इराणची राजधानी तेहरानपासून पश्चिमेला सुमारे ४०० किलोमीटर (२४८ मैल) अंतरावर असलेल्या कुर्द शहर सनंदाजजवळील वाहतूक पोलिस ठाण्याजवळ, टँकरने इतर गाड्यांना धडक दिल्यानंतर त्याला आग लागली.

सदोष ब्रेक प्रणालीमुळे हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

२०१८ मध्ये, सनंदाजजवळ इंधन टँकर व आंतरशहरी प्रवासी बस यांच्यात झालेल्या अशाच एका रस्ते अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला होता व चार जण जखमी झाले होते.

इराणमध्ये दरवर्षी रस्ते आणि वाहतूक अपघातांमध्ये १७,००० हून अधिक लोकांचा मृत्यू होतो. असुरक्षित वाहने, वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष आणि अपुऱ्या आपत्कालीन सेवा ही या उच्च मृत्यूदराची कारणे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# आशेचा किरण

निबिड अंधारात दूर जंगलात कुठेतरी दिवा लुकलुकावा आणि प्रकाशाचा आशादायी किरण दृष्टिपथास पडावा, अशी थोडीशी सकारात्मक स्थिती सध्याच्या संघर्षांच्या धामधुमीत निर्माण झाली आहे. गेली पावणे पाच वर्षे लष्करीदृष्ट्या बलाढ्य असलेल्या रशिया आणि युक्रेन हा तुलनेने कमजोर देश यांच्यात युद्ध सुरू आहे. कोरोनासारख्या महामारीतून जग सावरत नाही तोच रशिया-युक्रेन यांच्यातील रक्तरंजित संघर्षाला प्रारंभ झाला. महामारीच्या काळात अनेक देशांच्या अर्थव्यवस्था बिकट परिस्थितीतून जात असताना जगाला आणखी एका दीर्घ संघर्षाचा सामना करावा लागत आहे. दोन्ही देशांची कधीही भरून न निघणारी मनुष्यहानी झाली असून, आता अमेरिकेच्या हस्तक्षेपाने हा संघर्ष संपुष्टात येण्याची आशा निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राजदूत जारेड कुश्नेर आणि स्टीव्ह विटकाफ मॉस्कोत दाखल झाल्यानंतर पुतिन यांनी ७२ तासांची युद्धबंदी जाहीर केली आहे. दोनच दिवसांपूर्वी युक्रेनने ड्रोन हल्ल्यांची मालिका सुरू करण्याची धमकी दिल्यानंतर रशियात प्रचंड खळबळ उडाली होती. अनेक विमानांची उड्डाणे रद्द केली गेली तर काही विमाने अर्ध्यातून परत बोलावली गेली. युक्रेनच्या या धमकीचा परिणाम म्हणजे रशिया चर्चेच्या टेबलावर येण्यास तयार झाला. अमेरिकेच्या राजदूतांची पुतिन यांच्याशी काय चर्चा झाली याचा तपशील बाहेर आला नसला तरी तीन दिवसांच्या युद्धबंदीनंतर युद्ध संपुष्टात येऊन शांतता निर्माण होण्याची आशा निर्माण झाली आहे. खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेऊन संघर्ष थांबविण्यासाठी शांतता कराराचा मसुदा घेऊन दोन्ही राजदूतांना मॉस्कोकडे रवाना केले. कराराच्या तपशिलाबाबत मात्र, ट्रम्प यांनी माहिती दिली नाही. करारात काय दडले आहे, हे पुढील आठवड्यात जगाला दिसून येईल, असे त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे 'अनिश्चित' स्वरूपाचे उत्तर दिले. या युद्धाचा फटका युक्रेन आणि रशियाला तर बसलाच; शिवाय अमेरिकेचेही या आगीत हात पोळले गेले आहेत. कारण, ट्रम्प यांना युक्रेन आणि इराण, अशा दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे. खरे, तर युक्रेनला नाटो संघटनेत आणण्याच्या अमेरिकेच्या हट्टामुळेच हे युद्ध सुरू झाले. युक्रेनने तटस्थ राहावे आणि आमच्या उशासी शत्रू उभा नको, अशी भूमिका पुतिन यांनी घेतली होती. मात्र, काहीही झाले तरी नाटोत जाणारच, असा हट्ट धरून झेलेन्स्की यांनी देशाचा विनाश ओढवून घेतला. मॉस्कोनंतर अमेरिकेचे दोन्ही दूत युक्रेनमध्ये असून ते झेलेन्स्की यांच्या गळी शांततेचे महत्त्व उतरविण्याचा प्रयत्न करणार आहेत. पुतिन यांच्यानंतर झेलेन्स्की यांनीही युद्धविरामाचे पालन करणार असल्याचे जाहीर केले आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या या युद्धात दोन्ही देशांचे प्रचंड मानवी आणि आर्थिक नुकसान झाले आहे. युक्रेनचे तर पार कंबरडे मोडले असून, रशियाची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली. खनिजसंपन्न असलेल्या रशियावर भारताकडून पेट्रोल, डिझेल विकत घेण्याची वेळ आली आहे. कारण, युक्रेनच्या पायाभूत सुविधांची जेवढी हानी झाली नसेल, त्यापेक्षा कितीतरी पटीने रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पांचे नुकसान झाले. खोलवर शिरून ड्रोनद्वारे रशियाच्या प्रकल्पांचे युक्रेनने अतोनात नुकसान केल्याने तेल आयात करण्याची वेळ पुतिन यांच्यावर ओढवली आहे. या दोन्ही देशांतील संघर्षाचे परिणाम केवळ युरोपपुरते मर्यादित राहिलेले नाहीत तर जागतिक अर्थव्यवस्थेवरही झाले आहेत. युद्धानंतर युक्रेनमधील कृषी उत्पादनही कमालीचे घटले आहे. गहू, मका आणि सूर्यफुलाचा उत्पादक देश असलेल्या युक्रेनची कृषी अर्थव्यवस्था ढेपाळली आहे. त्याची झळ भारतालाही बसली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून सूर्यफूल तेलाची आयात कमी झाल्याने खाद्यतेलाचे चढलेले भाव अजूनही उतरलेले नाहीत. युरोपियन देश गव्हाची आयात युक्रेनमधून करीत होते. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने महागाई वाढली.

विकास आणि वैभवाप्रत जाण्यासाठी शांततेची गरज असते, हे आता अमेरिका आणि रशियाला कळून चुकले आहे. शीतयुद्धाच्या काळात जग रशिया आणि अमेरिका या दोन देशांच्या पारड्यात जाऊन बसले असताना भारताने शांततेचा मार्ग स्वीकारत तटस्थतेचे धोरण स्वीकारले; ज्याचे फायदे आज आपल्याला दिसत आहेत. अमेरिका, चीनसारख्या महाशक्तींसह युरोपातील अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असताना भारताचा विकासदर ७.८ असल्याची आकडेवारी नुकतीच बाहेर आली आहे. हे केवळ शांतता आणि संयमाच्या धोरणामुळेच शक्य झाले आहे. आताची वेळ ही संघर्ष करण्याची नव्हे तर संघर्षस्थळे (फ्लॅशपाईंट) नष्ट करण्याची आहे. आजमितीला जगात काश्मीर, गाझा, तैवान ही धगधगती ज्वालास्थळे आहेत. गाझाचा मुद्दा इस्त्रायलने आपल्या पद्धतीने निकाली काढला असला तरी त्याच्याशी 'मुस्लिम उम्माह' भावना जुळलेल्या असल्याने तो कायमचा धगधगत राहणार आहे. आशियातील सर्वांत धोकादायक संघर्षस्थळ म्हणजे काश्मीर होय. भारत आणि पाकिस्तान यांच्यात या मुद्यावरून तीन मोठी युद्धे आणि कारगिल, 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या लढायाही झाल्या आहेत. मोदी सरकार आल्यापासून पाकिस्तानला काश्मीरच्या मुद्यावर आक्रमक नव्हे तर बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. पूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये बेधडक कारवाया करीत हल्ले करणाऱ्या पाकिस्तानला आता हजारदा विचार करावा लागत आहे.

चीनच्या पायथ्याशी असलेला तैवानचा मुद्दाही तसाच. चीनची गिधाड नजर या देशावर आहे. तथापि, अमेरिकेचे लष्करी सहकार्य आणि स्वतःची अत्याधुनिक संरक्षण यंत्रणा, यामुळे चीन तैवानवर हल्ला करण्याचे धाडस करणार नाही. जगात सध्या सुरू असलेल्या संघर्षात सतत युद्धाची खुमखुमी बाळगणारे दोन पहेलवान मात्र गार झाले आहेत. जी अमेरिका जगाला आर्थिक आणि लष्करी बळावर धाकात ठेवण्याचा प्रयत्न करीत होती, तिला इराणने घायकुतीला आणले. चार-पाच दिवसांमध्ये इराणला शरण आणू, अशा वल्गना करणारे ट्रम्प यांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे. इराण-अमेरिका संघर्ष सातव्या महिन्यांत पोहचला आहे. सध्या दोन्ही देश एकमेकांवर हल्ले करीतच आहेत. दोघांकडील शस्त्रांची भंडारे रिकामी होत असून गेल्या काही दिवसांपासून इराणचा प्रतिकार काही प्रमाणात थंडावला आहे. दुसरीकडे युक्रेन अतोनात नुकसान सहन करूनही मैदानात शड्डू ठोकून उभा आहे. अमेरिकेच्या गर्वाचे हरण केवळ रशियाच करू शकतो, असा जो समज होता, तो युक्रेनने मोडून काढला, असेच म्हणावे लागेल. मध्यपूर्व आणि युरोप-बाल्कन क्षेत्रात सुरू असलेले दोन्ही संघर्ष जेव्हा केव्हा संपुष्टात येतील, त्यानंतरच जगात दीर्घकाळ शांतता नांदण्याची शक्यता आहे. कारण, सध्या रशिया आणि अमेरिका उरलीसुरली इभ्रत वाचविण्यासाठीच धडपडत आहेत. दोन्ही देश संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असले तरी तो त्यांना अजूनतरी सापडलेला नाही. संघर्ष संपल्यानंतर 'वर्ल्ड ऑर्डर' बदललेली असेल, एवढे मात्र निश्चित. कारण, युद्धामुळे रशिया-अमेरिकेची प्रचंड हानी झाली आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी अनेक वर्षे लागतील. या युद्धाचा सर्वाधिक फायदा झाला तो दगाबाज चीनला. त्याला अमेरिका-इराण युद्धाची फारशी झळ बसली नाही. 'बळी तो कानपिळी' या म्हणीप्रमाणे त्याने होर्मुझच्या खाडीतून कच्च्या तेलाचा पुरवठा अखंडित ठेवला. चिनी तेलवाहू जहाजांवर हल्ला करण्याची हिंमत अमेरिकेची झाली नाही. भारताला या मध्यपूर्वेतील युद्धाचा फटका बसला आहे. इंधनाचा पुरवठा काही विस्कळीत झाल्याने किमती वाढवाव्या लागल्या. त्यामुळे अमेरिकेने रशिया-युक्रेनमध्ये विशेष दूत पाठवून शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने जे पाऊल टाकले त्याचे स्वागत करायला हवे. अत्यंत भीषण स्थितीत आशेचा किरण दिसला आहे, एवढाच सध्याचा दिलासा. ■

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# चर्चा एका अप्रकाशित पुस्तकाची

ऑस्कर वाईल्ड या प्रसिद्ध साहित्यिकाने म्हटले आहे, ''आपल्या स्मृती म्हणजे आपली डायरी, जी सतत आपण आपल्याजवळ बाळगतो''. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आपल्या स्मृतींची डायरी लिहून काढली असून, ती 'बिलाँगिंग : ए जर्नी ऑफ लव्ह' या नावाने पुस्तकाच्या रूपात प्रसिद्ध होणार आहे. मात्र पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्यात आलेल्या अडचणींनी या पुस्तकाची उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

प्रारंभी, सोनिया गांधी यांच्या आठवणीचे संकलन असणारे हे पुस्तक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होणार होते, पण संस्थेने त्यास नकार दिल्यानंतर पेंग्विन इंटरनॅशनलतर्फे ते प्रसिद्ध होऊ घातले आहे. पेंग्विन इंडियाने पुस्तक प्रकाशनास नकार दिल्यानंतर या पुस्तकात आहे तरी काय याची जोरदार चर्चा राजधानीत केली जात आहे.

**काही भागावर आक्षेप :** सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकाचा मसुदा सर्वप्रथम पेंग्विन रँडम हाऊसकडे पाठविला. प्रथम या प्रकाशकाने सोनिया गांधींचे पुस्तक प्रकाशित करण्यास होकार दिला होता. नंतर मात्र प्रकाशकाला पुस्तकातील काही भाग अडचणीचा वाटू लागला. त्याने सोनिया गांधींसोबत सविस्तर चर्चा केली व काही भाग वगळण्याची विनंती केली. सोनिया गांधी त्यास तयार नव्हत्या असे समजते. प्रकाशक व सोनिया गांधी यांच्यात तीन-चार भेटी झाल्याचे समजते.

पुस्तकातील कोणताही भाग गाळला - वगळला जाणार नाही हे सोनिया गांधी यांनी स्पष्ट केल्यानंतर प्रकाशकाने पुस्तक प्रकाशित करण्यास आपली असमर्थतता त्यांना कळविली. यानंतर आता दुसऱ्या एका प्रकाशकाकडे म्हणजे पेंग्विन इंटरनॅशनलकडे हे काम सोपविण्यात आले असून, सध्याच्या वेळापत्रकानुसार १० नोव्हेंबर रोजी हे पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे.

**कोणता भाग ? :** पेंग्विन इंडियाला नेमक्या कोणत्या भागावर आक्षेप होता हे मात्र समजू शकलेले नाही. याबाबतीत काही तर्क-वितर्क केले जात आहेत. पंतप्रधान मोदींबाबत सोनिया गांधींचे निरीक्षण, भारत-चीन सीमा प्रश्न हाताळताना सरकारची भूमिका हे काही वादाचे मुद्दे असल्याचे सांगितले जाते. पण, बहुतेक निरीक्षकांच्या मते हे मुद्दे तसे किरकोळ आहेत. मग, नेमक्या कोणत्या कारणांसाठी पेंग्विनने पुस्तक प्रकाशित करण्यास नकार दिला? कोणत्या बाबी पुस्तकातून वगळण्याचा सल्ला पेंग्विनने दिला होता व सोनिया गांधींनी तो का मानला नाही याबाबत उलटसुलट चर्चा केली जात आहे.

**२००४ ते २०१४ :** २००४ ते २०१४ या दहा वर्षांत काँग्रेस पक्ष केंद्रात सत्तेत होता. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असले तरी खरी सत्ता सोनिया गांधी व त्यांचे सल्लागार अहमद पटेल यांच्याच हाती होती. यातील एक योगायोग म्हणजे अहमद पटेल हे गुजरातचे होते. २००४ ते २०१४ या १० वर्षांत देशात बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या. त्या सर्वांची कल्पना सोनिया गांधी यांना होती. काही महत्त्वाचे दस्तावेज त्यांच्याजवळ होते. त्याचा वापर त्यांनी पुस्तकात केला आहे काय, असा प्रश्न विचारला जात आहे. केला असल्यास कोणत्या विषयांबाबत ते दस्तावेज आहेत याचीही चर्चा केली जात आहे. पेंग्विनने पुस्तक प्रसिद्ध करण्यास नकार दिला याचा अर्थ कोणते तरी गंभीर विषय असावेत जे प्रसिद्ध करणे पेंग्विनला शक्य नव्हते. अन्यथा एवढे महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित करण्यास पेंग्विनसारख्या नामांकित प्रकाशक संस्थेने नकार दिला नसता.

**१९९८ ते २००४ :** १९९८ ते २००४ या काळात केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. सोनिया गांधी काही व्यक्तिगत कामांसाठी वाजपेयींना भेटल्या होत्या, त्यावेळी वाजपेयींनी त्यांना त्याबाबत निश्चिंत राहण्यास सांगितले होते. सोनिया गांधींच्या उपस्थितीतच त्यांनी आपले मुख्य सचिव ब्रिजेश मिश्रा यांना बोलावून सोनिया गांधींच्या समस्यांकडे स्वतः लक्ष घालण्याचा आदेश मिश्रा यांना दिला होता. मिश्रा यांनी स्वाभाविकच अटलबिहारी वाजपेयींच्या आदेशाचे पालन केले. नंतर काही वर्षांनी जेव्हा ब्रिजेश मिश्रा यांचे निधन झाले, त्यांच्या अन्त्यसंस्कारात सोनिया गांधी स्वतः सामील झाल्या होत्या. यावरून सोनिया गांधी व ब्रिजेश मिश्रा यांच्यात किती जवळीक व विश्वास होता याचा अंदाज बांधला जातो. सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात या साऱ्याचा उल्लेख केला आहे काय, असाही प्रश्न विचारला जातो.

**तणावाचे प्रसंग :** वाजपेयींचे सरकार असताना सरकार व विरोधी पक्ष यांच्यात तणावाचे काही प्रसंग निर्माण झाले होते. याचा परिणाम म्हणजे संसदेचे कामकाज प्रभावित होत होते. हा तणाव दूर करण्यासाठी सरकारच्यावतीने काही 'दूत' १०- जनपथला पाठविण्यात आले. त्यांनी सोनिया गांधींशी चर्चा केली आणि नंतर हा तणाव निवळण्यात मदत झाली होती. म्हणजे १९९८ ते २००४ हा वाजपेयी सरकारचा कालखंड, नंतर २००४ ते २०१४ हा मनमोहनसिंह सरकारचा कालावधी व २०१४ पासून मोदी सरकार या तीन कालखंडाची चर्चा सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात केलेली असू शकते. मात्र यातील कोणता भाग पेंग्विनला खटकला हे मात्र समोर आलेले नाही. त्यासाठी पुस्तक प्रकाशित होण्याचीच प्रतीक्षा करावी लागेल.

**बोफोर्स प्रकरण :** एकेकाळी गाजलेल्या बोफोर्स दलाली प्रकरणात क्वाट्रोकी या इटालियन व्यापाऱ्याचे नाव बरेच गाजले होते. या व्यापाऱ्याचे सोनिया गांधींशी घरगुती संबंध असल्याचे मानले जात होते. बोफोर्स प्रकरणामुळे १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. तेव्हाचे संरक्षण मंत्री व्ही. पी. सिंग यांनी सरकारमधून व काँग्रेसमधून राजीनामा दिला हे तर जगजाहीर आहे. मात्र, संरक्षण राज्यमंत्री व राजीव गांधींचे जिवलग मित्र अरुण सिंग यांनी का राजीनामा दिला व नंतर ते का विजनवासात गेले याचे गूढ आजही कायम आहे. स्वतः अरुण सिंग यांनी याबाबत कोणतीही टिप्पणी केलेली नाही. त्याचप्रमाणे बोफोर्स प्रकरण उघड करण्यात स्व. अरुण नेहरू या मंत्र्यांची भूमिका होती असेही मानले जाते. या साऱ्यावर सोनिया गांधींनी काही प्रकाश टाकला आहे काय याची चर्चा केली जात आहे.

**आणखी एक पुस्तक :** राजधानीत आणखी एका पुस्तकाची चर्चा केली जात आहे. दिवंगत काँग्रेस नेते व कधीकाळी गांधी परिवाराचे विश्वासू सल्लागार कुंवर नटवरसिंग यांनी लिहिलेले हे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी मनमोहनसिंग यांची पंतप्रधानपदी कशी निवड झाली याचा उल्लेख केला आहे. एका बैठकीत स्वतः नटवरसिंग यांच्या व्यतिरिक्त सोनिया गांधी, मनमोहनसिंग व राहुल गांधी हे चारच लोक उपस्थित होते. सोनिया गांधी पंतप्रधान होण्यास तयार होत्या, पण राहुल गांधी त्यास तयार नव्हते अशी माहिती पुस्तकात देण्यात आली आली आहे.

**डॉ. कलाम यांचा विरोध ? :** तत्कालीन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या विरोधामुळे सोनिया गांधी पंतप्रधान होऊ शकल्या नाहीत असाही दावा अधूनमधून केला जातो. सोनिया गांधी पंतप्रधान न होण्याचे नेमके कारण कोणते? डॉ. कलाम यांचा विरोध की राहुल गांधींचा नकार? सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकात यावर चर्चा केली असावी असा एक तर्क दिला जात आहे.

**१० नोव्हेंबरचा मुहूर्त ? :** पुस्तक प्रकाशनासाठी १० नोव्हेंबर ही तारीख ठरविण्यात आली आहे. वास्तविक हा सोनिया गांधी, राजीव गांधी यांच्यासाठी तसा खास दिवस नाही. मग, १० नोव्हेंबरची तारीख का ठरविण्यात आली आहे? नोव्हेंबर महिन्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. या पुस्तकात काही वादाचे मुद्दे असल्यास त्याचे पडसाद अधिवेशनात उमटणार हे ठरले आहे. ■

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# 'जेन-झी'चा देवधर्म

सणांच्या भाऊगर्दीत नेहमीच तरुणवर्ग उत्साहाने सहभागी होत राहिला आहे. घरगुती सण असो किंवा सार्वजनिक, तरुणाचा उल्हास काही वेगळाच असतो. किंबहुना त्यांच्या भरवशावरच घरीदारी सणावारांची मदार असते. अजूनही चित्र फारसे बदललेले नाही, पण नवी पिढी मात्र जरा वेगळी आहे. विशीत असणारे तरुण-तरुणी आपल्याच विश्वात रमलेले असतात. फोन आणि टॅबमध्ये गुंतलेली ही पिढी घरात आणि बाहेरही सणांच्या जल्लोषात झोकून देत सहभागी होत नाही. असे असले तरी त्यांचा देवावर विश्वास नाही, हे म्हणताच येणार नाही. नवीन पिढीने आपले श्रद्धास्थान ठरवले आहे. फक्त त्यांची भक्तीची पद्धत वेगळी आहे. ते जास्तीत जास्त वेळ ऑनलाईन असतात. त्यामुळे त्यांच्या भक्तीची वाट ते समाज माध्यमांद्वारे ठरवतात आणि त्याद्वारेच त्यांची भक्ती चालते. एका सर्वेक्षणानुसार, ६८ टक्के तरुणांचे म्हणणे आहे की, त्यांचा विश्वास, धर्म किंवा आध्यात्मिक प्रवास त्यांना पटणाऱ्या गोष्टींशी निगडित असतो. त्यांना जे दैवत पटेल त्याचीच ते आराधना करतात. ज्यांना आपण अधार्मिक म्हणू अशा युवावर्गातील एक तृतीयांश मुले-मुली कोणत्या तरी सुपर पॉवरवर विश्वास ठेवतात. प्रत्येक चारपैकी एका जेन-अल्फाचे म्हणणे आहे की, ऑनलाईन शिकलेल्या गोष्टींमुळे किंवा ऑनलाईन भेटलेल्या लोकांमुळे त्यांची श्रद्धा बदलली आहे. समोरासमोरच्या संवादापेक्षा ऑनलाईन विश्वास किंवा आध्यात्मिक विषयांबद्दल अधिक शिकतात. आजची तरुणाई करीअर, शिक्षण, नातेसंबंध आणि भविष्याच्या चिंतांमध्ये सतत धावत असते. अशा वेळी काही क्षण स्वतःसाठी देणे, शांत बसणे, ध्यान करणे किंवा आवडते संगीत ऐकत मन एकाग्र करणे, यामधून त्यांना मानसिक समाधान मिळतं. अनेक तरुण योग, मेडिटेशन, माईंडफुलनेस आणि निसर्गाच्या सान्निध्याकडे आकर्षित होत आहेत. त्यांच्यासाठी अध्यात्म म्हणजे जगापासून दूर जाणे नव्हे, तर गोंधळलेल्या जगात स्वतःचा समतोल शोधणे आहे.

घरात होत असलेले सोहळे आणि सोवळे कदाचित त्यांना आवडत नाहीत, पण त्यांचा देवाला अजिबात विरोध नाही. जिथे त्यांची श्रद्धा असेल तिथे ते आवर्जून झुकतात आणि एकदा झुकले की ते कायम त्या दैवताची आराधना करतात. मात्र, संघर्ष तेव्हा होतो जेव्हा ते घरातील कुळाचारावर प्रश्न उपस्थित करतात किंवा त्यांच्या दृष्टीने बरेच कर्मकांड हे अवाजवी असतात. त्यांच्या 'प्रॅक्टिकल ॲप्रोच'मध्ये न बसणाऱ्या गोष्टी दिसल्या की त्यांना अविश्वास जाणवतो. तशा कोणत्याही गोष्टींना ते जुमानत नाही आणि मानतही नाहीत. घरच्यांना त्यांचे हे वागणे विक्षिप्त वाटत असल्याने संघर्षाची ठिणगी पडते. या ठिकाणी घरच्या मोठ्या मंडळींनी हे समजून घेतले पाहिजे की ही पिढी नेमकी कशी आहे. जेन-झी प्रश्न विचारणारी पिढी आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारण्यापेक्षा 'यामागचा अर्थ काय?' हे जाणून घेण्याची त्यांची वृत्ती आहे. धर्म आणि अध्यात्म यांच्यातील फरकही त्यांना जाणवतो. श्रद्धा असावी, पण त्यासोबत विवेकही असावा, असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे मंदिरात जाण्याबरोबरच ध्यानधारणा, सामाजिक कार्य, गरजू व्यक्तीला मदत करणे किंवा पर्यावरणाची काळजी घेणे यामध्येही त्यांना अध्यात्म जाणवते.

जेन-झी आणि जेन-अल्फा धार्मिक माहितीसाठी युट्युब, इन्स्टाग्राम, चॅटबॉट यांसारख्या साधनांवर सर्वाधिक अवलंबून आहेत. व्हिज्युअल ॲनिमेशन, थ्रीडी पौराणिक कथा आणि छोटे आध्यात्मिक उपदेश त्यांना आकर्षित करतात. तरुण आणि किशोर फक्त कथा ऐकत नाहीत, तर रोब्लॉक्ससारख्या आभासी प्लॅटफॉर्मवर डिजिटल पद्धतीने तयार केलेल्या मंदिरे आणि धार्मिक उत्सवांचा भाग बनत आहेत. ॲप-आधारित आरती, थेट मंदिर दर्शन आणि एआय चालीसा, मंत्र ॲप्सने देवाशी त्यांचे नाते सुलभ आणि वैयक्तिक बनवले आहे. मुळात, डिजिटल युगातील जेन-झी आणि जेन-अल्फा यांची श्रद्धा त्यांच्या आधीच्या पिढ्यांपेक्षा वेगळी आहे. ते प्रत्येक गोष्टीला स्वतःच्या कसोटीवर पारखून पाहतात आणि मगच विश्वास ठेवतात. या पिढ्यांसाठी श्रद्धा महत्त्वाची आहे, कारण त्यातून त्यांना शांती आणि आनंद मिळतो. आजच्या धावपळीच्या काळात बाहेरच्या जगाशी जोडलेले राहणे जितके आवश्यक आहे, तितकेच स्वतःशी जोडलेले राहणेही महत्त्वाचे आहे. हे जेन-झी हळूहळू ओळखत आहे. म्हणूनच त्यांच्या अध्यात्मात भीतीपेक्षा आशा, बंधनांपेक्षा स्वातंत्र्य आणि नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेला अधिक महत्त्व आहे. तंत्रज्ञानाच्या युगात जगाशी कनेक्ट असलेली ही पिढी आता स्वतःच्या मनाशी 'कनेक्ट' होण्याचा प्रयत्न करत आहे. कदाचित हाच जेन-झीच्या अध्यात्माचा सर्वांत सुंदर पैलू आहे. ■

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# कृष्णं वंदे जगद्गुरुम्

अर्जुनाचे नव्हे, तर केवळ संपूर्ण विश्वाचे मार्गदर्शक असलेल्या भगवान श्रीकृष्णांना सादर नमन, अभिवादन! ज्या ज्या वेळेला जन्माष्टमी येते, त्या त्या वेळेला संपूर्ण देश युगपुरुषाचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी अतिशय उत्साहित असतो; आणि त्याचे कारण सुद्धा स्वाभाविक आहे. भगवान श्रीकृष्ण हे सर्व समाजजीवनाचे आदर्श आहेत. आज व्यक्तीच्या जीवनामध्ये अनेक संकटे, हालअपेष्टा, अपमान असे प्रसंग आपल्याला दिसतात. काही लोक त्या प्रसंगाने खचून जातात, काही लोक आत्महत्येसारखा अतिशय निकृष्ट मार्ग सुद्धा स्वीकारतात. परंतु भगवान श्रीकृष्णाचे जीवन जर अशा लोकांनी बघितले, तर त्यांना असे लक्षात येईल की, भगवान श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये सुद्धा त्यांना आपल्या आई-वडिलांसोबत सुद्धा राहता आले नाही. एका सामान्य बालकाचा आपल्या आईच्या कुशीत निजण्याचा, दूध पिण्याचा जो अधिकार आहे, तो सुद्धा त्यांना मिळाला नाही. लहानपणापासूनच त्यांनी कोणाचे काहीही वाईट केलेले नसताना सुद्धा त्यांना सातत्याने आपल्या जीवाचे रक्षण करण्यासाठी संकटांचा सामना करावा लागला. परंतु हे सर्व घडत असताना त्यांची चाणाक्ष वृत्ती कायम होती. अगदी बालपणी सुद्धा प्रेमाच्या गोष्टी करणाऱ्या आणि त्यांना ममतेने दूध पाजायला आलेल्या पूतनेला सुद्धा त्यांनी ठार मारले. यावरून आपल्या असे लक्षात येते की, भगवान श्रीकृष्ण हे कपट-कारस्थान यांना लगेच ओळखणारे होते. पूतनेच्या खोट्या प्रेमाला ते बळी पडले नाहीत; या उलट, खोटं प्रेम प्रदर्शित करणाऱ्या पूतनेचा अंत त्यांनीच केला. कर्तव्य मार्गावर चालण्यासाठी त्यांनी गोप-गोपिकांचे प्रेमाचे पाश सुद्धा अलगद तोडून टाकले.

आपल्या शक्तीच्या जोरावर जनतेला भयभीत करणारा कालिया नाग यमुनेमध्ये राहत होता. त्या कालिया नागाचे सुद्धा मर्दन हे भगवान श्रीकृष्णांनी केलेले होते. आज समाजामध्ये सुद्धा असे अनेक कालिया आहेत, की जे आपल्या शक्ती, पैसा, सत्ता याच्या जोरावर जनतेला भयभीत करण्याचे काम करीत असतात. परंतु कालियाचे मर्दन हे समाजपुरुषाने करायला पाहिजे, हीच कृष्णनीती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा कृष्णनीती त्यांच्या जीवनामध्ये अंगीकारलेली होती. ज्या अफजल खानाने अनेक हिंदू राजांना बंदी बनवले होते, अनेकांना ठार मारले होते, तो अफजल खान पुन्हा एकदा ज्या वेळेला छत्रपती शिवाजी महाराजांना भेटीच्या बहाण्याने बोलावून ठार मारण्याचा विचार करीत होता; तो स्वतःला मोठा शिकारी समजत होता, परंतु प्रतापगडाच्या पायथ्याशी त्याची शिकार झाली. प्रतापगडाच्या पायथ्याशी याची साक्ष आजही उपस्थित आहे.

भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या जीवनामध्ये अनेकांना मार्गदर्शन केलेले आहे. आज अनेक विद्यार्थी हे समाजमाध्यमांच्या म्हणजे इन्स्टाग्राम, फेसबुक आणि रील्स याच्यामध्ये अडकलेले दिसून येतात. आज विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अभ्यास आणि करीअर यापेक्षाही मोठे अनेक मोहपाश दिसून येतात. त्या मोहपाशांनी बद्ध झालेला विद्यार्थी अनेक वेळा आपला मार्ग विसरतो. अशा ध्येयहीन युवकांना मार्गदर्शन करण्याचे काम कृष्णनीती आणि भगवान श्रीकृष्ण करू शकतात.

मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाला सुद्धा त्यांनी गीतेचे अमृत दिलेले आहे. आज वळणावळणावर अनेक अर्जुन उभे आहेत, त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. भगवान श्रीकृष्णांचे जीवन, त्यांनी दिलेला संदेश हा विद्यार्थ्यांना आजही मार्गदर्शक आहे. भगवान श्रीकृष्ण हे उत्तम शिक्षक होते; त्यांनी धर्म-अधर्माचे शिक्षण दिले, कर्तव्याचे शिक्षण दिले आणि म्हणूनच अर्जुन महाभारतात चांगला पराक्रम गाजवू शकला. म्हणजे केवळ ज्ञान असणे हेच पुरेसे नाही, तर त्या ज्ञानाचा योग्य उपयोग योग्य वेळेस करणे हे सुद्धा फार महत्त्वाचे आहे.

आता नुकताच शिक्षक दिवस सुद्धा साजरा करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी सुद्धा भगवान श्रीकृष्णांच्या जीवनापासून प्रेरणा आणि संदेश घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या जीवनाचे ध्येय काय असले पाहिजे? आपल्या जीवनाची सार्थकता कशाकरिता आहे? याचाही प्रत्येक शिक्षकाने विचार करणे आवश्यक आहे. शिक्षक हा जर केवळ पोटार्थी असला, तर त्याच्या जीवनाचे सार्थक होणार नाही. कारण ईश्वराच्या कृपेमुळे त्यांना असे काम मिळालेले आहे, की त्या कामातून उत्तम विद्यार्थी घडू शकतात आणि उत्तम विद्यार्थी देशाचे भविष्य घडवू शकतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे लक्ष देऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. शिक्षक दिवस हा ज्यांनी आमच्या जीवनामध्ये कुठल्या ना कुठल्या प्रकारे शिक्षा, दीक्षा, ज्ञान दिलेले आहे, अशा सर्व शिक्षकांचा स्मरण करण्याचा दिवस आहे. हे स्मरण या निमित्ताने सर्व विद्यार्थी करतात. ज्या वेळेला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना विचारले गेले की, तुम्हाला 'मिसाईल मॅन' म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल की शिक्षक म्हणून? तर त्या वेळेला त्यांनी सांगितले की, मला शिक्षक म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल. भारतात निर्माण झालेल्या अनेक महापुरुषांनी विद्यादानाचे पवित्र कार्य केलेले होते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन ज्यांनी सुद्धा इतर सर्वच त्यांच्या जबाबदारीपेक्षा शिक्षक या जबाबदारीला श्रेष्ठ स्थान दिलेले आहे.

आज देशाला चांगल्या हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे, पण त्याहीपेक्षा देशभक्त हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता अधिक आहे. शिक्षकांनी आपल्या ज्ञानदानाच्या कामामध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टिकोन देणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी ज्ञान घेतलेले विद्यार्थी हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनामध्ये सुद्धा फारसे यशस्वी होऊ शकणार नाही; परंतु कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांचा विचार करणारा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आणि समंजस बनेल. शिक्षकांनी देशासाठी कार्य करू शकणारे विद्यार्थी बनविणे हेच त्यांचे जीवितकार्य असायला हवे. भगवान श्रीकृष्णांकडून कर्ममार्गाचा, जीवनाला सार्थकता देण्याचा हा संदेश सर्वांनीच ग्रहण करणे आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## पर्यावरणपूरक उत्सवाचा संकल्प करूया

आठवडाभरात आपल्या लाडक्या गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सव म्हटला की आनंद, उत्साह आणि भक्तीचे वातावरण निर्माण होते. घराघरांत बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. बाजारपेठाही गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याने सजल्या आहेत. पण या आनंदासोबत पर्यावरणाची जबाबदारीही आपलीच आहे. गणरायाची पूजा करताना निसर्गाची पूजा विसरता कामा नये. यंदा शक्य असेल तर शाडू मातीची मूर्ती घ्यावी. मूर्तीचा आकारही गरजेपुरताच ठेवावा. प्लॅस्टिक आणि थर्माकोलचा वापर शक्य तितका टाळावा. सजावटीसाठी कागद, कापड, बांबू आणि नैसर्गिक वस्तू वापराव्या. फुलांची सजावट केली तर नंतर ती फुले वेगळी जमा करावी. नदी, नाला किंवा तलावात टाकू नये. गणेश विसर्जनामुळे पाणी प्रदूषित होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. शक्य असल्यास घरच्या घरी किंवा कृत्रिम विसर्जनस्थळी विसर्जन करावे. गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाही विचार करणे गरजेचे आहे. सार्वजनिक मंडळांनीही स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. मंडप उभारताना रस्ते आणि वाहतुकीची अडचण होणार नाही याची काळजी घ्यावी. उत्सव संपल्यानंतर परिसरात कचरा राहता कामा नये. गणराया आपल्याला चांगले विचार करण्याची शिकवण देतो. म्हणून उत्सवातून समाजालाही चांगला संदेश मिळाला पाहिजे. प्रत्येक मंडळाने एक झाड लावण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रत्येक घराने प्लॅस्टिक कमी करण्याचा निर्णय घेतला तर? प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवला तर? तर गणेशोत्सवाचा आनंद आणखी मोठा होईल. भव्य सजावट करण्यापेक्षा सुंदर विचारांची सजावट महत्त्वाची आहे. मोठा आवाज करण्यापेक्षा चांगला संदेश मोठा झाला पाहिजे. नदीत कचरा टाकण्यापेक्षा एखादे झाड जगवणे मोठे काम आहे. बाप्पाच्या स्वागताबरोबर निसर्गाचे रक्षण करण्याची शपथ घेऊया. कारण हीच धरती आपल्या पुढच्या पिढीलाही मिळणार आहे. म्हणून भक्तीही हवी आणि पर्यावरणाची काळजीही हवी. उत्सवही हवा आणि स्वच्छताही हवी. जलस्त्रोतही हवेत आणि निसर्गही हवा. यंदा गणरायाला एकच सुंदर भेट देऊया स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण!

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

## वाचक पत्रे

### 'तडजोड' एक सुवर्णमध्य...

'तडजोड' म्हणजे स्वतःला कमी लेखणे किंवा हार मानणे नव्हे, तर तो एक उच्च दर्जाचा समजूतदारपणा आहे. आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हाच मध्यम मार्ग उपयुक्त ठरतो. तडजोड अशी असावी जिथे दुःखाचा तडा दोघांनाही जाता कामा नये आणि सुखाची जोड दोघांनाही मिळाली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत सुवर्णमध्य काढता येणे हाच तडजोडीचा आत्मा आहे, कारण यामुळे दोघांनाही समसमान फायदा होतो.

संसारात आणि समाजात सलोखा राखण्यासाठी परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करून जुळवून घेणे गरजेचे असते, तर व्यावहारिक दृष्टिकोनातून स्वतःचे नुकसान न करता परिस्थितीला अनुकूल बनवणे हे प्रगतीचे एक प्रभावी साधन ठरते. तडजोड करताना आपण नक्की काय गमावत आहोत आणि काय मिळवत आहोत याचा विचार केला पाहिजे. नात्यात किंवा करारात तात्पुरती माघार घेतल्याने भविष्यात मोठा फायदा होणार असेल, तर ती तडजोड नक्कीच व्यवहार्य ठरते. उत्कृष्ट तडजोड तीच, जिथे दोन्ही पक्षांना आपला विजय झाल्यासारखे वाटते आणि सामंजस्याने सुवर्णमध्य गाठला जातो.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■■

### जन्माष्टमी-एक धार्मिक आणि सामाजिक सण

श्रीकृष्ण जन्माष्टमी म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो मानवी नात्यांचा, एकतेचा आणि आनंदाचा सोहळा आहे. श्रावण महिन्यात मध्यरात्री अंधारलेल्या कारागृहात झालेला कृष्णजन्म आपल्याला हेच शिकवतो, की परिस्थिती कितीही कठीण असली तरी सत्याचा विजय निश्चित असतो. आजच्या धावपळीच्या आणि तणावाच्या युगात श्रीकृष्णाचे विचार प्रत्येक पिढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सुदाम्यासोबत निभावलेली मैत्री आपल्याला गरीब-श्रीमंतीच्या पलीकडचे निखळ प्रेम शिकवते, तर कुरुक्षेत्रावर अर्जुनाला दिलेला गीतेचा उपदेश आपल्याला आपले कर्तव्य बजावण्याची जाणीव करू देतो. 'फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करत राहा.' हा त्यांचा सिद्धांत आजही व्यवस्थापन क्षेत्रापासून ते वैयक्तिक जीवनापर्यंत सर्वांना प्रेरणा देतो.



जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा 'गोपाळकाला' म्हणजेच दहीहंडी, आपल्याला जात-पाच विसरून एकत्र येण्याचा आणि संघभावनेचा संदेश देतो. उंचावर टांगलेली दहीहंडी फोडण्यासाठी रचले जाणारे मानवी मनोरे हे दाखवून देतात, की सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले, तर कोणतेही कठीण ध्येय गाठता येते. थोडक्यात सांगायचे तर, संकटातही हसतमुख राहून आणि बासरीच्या सुरांप्रमाणे जीवनात गोडवा टिकवून मार्ग कसा काढावा, हेच कृष्णचरित्र आपल्याला शिकवते. हाच या उत्सवाचा खरा संदेश आहे. ■

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर

# संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ६ सप्टेंबर -**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माला ७५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने राज्यभर विविध सांस्कृतिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकाराने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मवर्षानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानोबारायांचे विचार,साहित्य आणि महान जीवनकार्य जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.याच उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून आज महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'ज्ञानमाऊली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अकलूज येथे चंदनकर क्लासचे संचालक ॲड.अमोल चंदनकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हनुमंत चंदनकर,ह.भ.प. सुरेश वेदपाठक महाराज,माजी पोलीस अधिकारी बबनराव साळुंखे,हर्षवर्धन नाचणे सर उपस्थित होते.त्यांच्या शुभहस्ते विठ्ठलांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली.ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ संग्रामनगर (ता.माळशिरस) यांच्या वतीने ह.भ.प.सुरेश वेदपाठक महाराज,चित्रपट अभिनेते व संगीत शिक्षक यांनी या कार्यक्रमात किर्तनाची सेवा केली.लहान मुलांनी विविध संतांच्या वेशभूषा परिधान करून आगमन झाल्यामुळे या कार्यक्रमात रंगत आली.यामध्ये निरंजन रविंद्र बोके (निवृत्तीनाथ), विजेंदर राजाराम यादव (ज्ञानेश्वर महाराज),रोहन रविंद्र सपलगे (सोपान देव),कु.प्रियंका विनोद तेलंगण (मुक्ताबाई) यांनी संतांची भूमिका केली होती.त्यानंतर भजनाचा व किर्तनाचा कार्यक्रम पार पाडला.त्यांना हार्मोनियमची साथ प्रशांत महामुनी,पकवाज वादन मुरलीधर पंडित केले.

> संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडलेले विचार हे केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून मानवता,समता, निसर्ग, ज्ञान आणि विवेकाचा व्यापक संदेश देणारे आहेत. त्यांच्या विचारांची ओळख नव्या पिढीला व्हावी आणि ज्ञानोबारायांचे साहित्य, तत्त्वज्ञान व विचार अधिकाधिक जनसामान्यांपर्यंत पोहोचावेत.या उदात्त उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपक्रम राबविण्यात येत आहेत. ज्ञानोबारायांच्या विचारांचा प्रकाश प्रत्येकाच्या जीवनात पोहोचावा आणि त्यांच्या ज्ञान,समता व मानवतेच्या संदेशातून एक सुसंस्कृत समाज घडावा, हीच या 'ज्ञानमाऊली' कार्यक्रमामागील प्रेरणा आहे.
>
> **ॲड.अमोल चंदनकर**

# 'विमानसेवेचा खेळखंडोबा' सोलापूरच्या विकासासाठी धोक्याची घंटा!

## सोलापूर विकास मंचने व्यक्त केली भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूरच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली विमानसेवा दिवसेंदिवस अनिश्चिततेच्या गर्तेत जात असल्याचे चित्र आहे. स्टार एअरलाईन्सची सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद होणे, ९१ ची सोलापूर-गोवा आणि सोलापूर-हैदराबाद विमानसेवा अद्याप नियमितपणे पूर्ववत न होणे, तसेच सोलापूर-तिरुपती थेट विमानसेवा अद्याप सुरूही न होणे, ही सोलापूरकरांसाठी अत्यंत गंभीर बाब आहे. हा विमानसेवेचा होत असलेला खेळखंडोबा सोलापूरच्या विकासासाठी धोक्याची घंटा असल्याचे मत सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

या पत्रकात नमूद केले आहे की, सोलापूरकरांना गेल्या अनेक वर्षांपासून विमानसेवेच्या नावाखाली केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्षात विश्वासार्ह आणि नियमित हवाई कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरत असल्याची टीका सोलापूर विकास मंचाने केली आहे. विमानसेवा ही केवळ प्रवाशांच्या ये-जा करण्याची सुविधा नसून, शहराच्या औद्योगिक, व्यावसायिक, आय.टी., पर्यटन आणि आर्थिक विकासाची महत्त्वाची जीवनवाहिनी आहे. एखाद्या गुंतवणूकदाराला, उद्योजकाला किंवा मोठ्या कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सोलापूरला येण्यासाठी विमानसेवेवर विश्वास ठेवता येत नसेल, तर अशा परिस्थितीत सोलापूरमध्ये



नवीन गुंतवणूक आणणे अत्यंत कठीण होणार आहे. सोलापूरमध्ये आय.टी. पार्क उभारण्याच्या आणि नवीन उद्योग आणण्याच्या चर्चा सुरू असताना शहराची विमानसेवा मात्र अनिश्चित राहणे हा मोठा विरोधाभास आहे.


सोलापूरमध्ये आय.टी. पार्क, नवीन उद्योग, स्टार्टअप्स आणि रोजगाराच्या संधी निर्माण करायच्या असतील तर मुंबई, हैदराबाद, गोवा, तिरुपती आणि देशातील इतर महत्त्वाच्या शहरांशी नियमित व विश्वासार्ह हवाई संपर्क असणे अत्यावश्यक आहे. विमानसेवा कधी सुरू, कधी बंद आणि कधी रद्द अशा पद्धतीने चालणार असेल तर मोठा गुंतवणूकदार सोलापूरकडे का पाहील? असा सवाल सोलापूर विकास मंचाने उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे ९१कडून सोलापूर-गोवा आणि सोलापूर-हैदराबाद या मार्गांवर सेवा सुरू करण्याच्या घोषणा झाल्या; मात्र या सेवा नियमितपणे सुरू राहण्याबाबत सातत्याने अनिश्चितता निर्माण झाली आहे. दुसरीकडे सोलापूर-तिरुपती विमानसेवा सुरू करण्याबाबतही सोलापूरकरांना अनेकदा आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्ष विमानसेवा सुरू झालेली नाही. त्यामुळे आता घोषणा आणि आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष विमानसेवा कधी सुरू होणार, याचे निश्चित वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी मंचाने केली आहे. आज विमानफेऱ्या रद्द होत आहेत; उद्या गुंतवणूकदारांच्या भेटी आणि उद्योगांचे निर्णय रद्द झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार? सोलापूरच्या तरुणांना रोजगार हवा असेल तर सोलापूरला विश्वासार्ह हवाई कनेक्टिव्हिटी हवीच. विमानसेवा अस्थिर ठेवून आय.टी. पार्क आणि मोठ्या गुंतवणुकीची स्वप्ने दाखवणे म्हणजे सोलापूरकरांची दिशाभूल करण्यासारखे आहे, अशी टिकाही सोलापूर विकास मंचाने दिला आहे.

> सोलापूर विकास मंचाने स्पष्ट केले आहे की, सोलापूरला नवीन गुंतवणूक, आय.टी. पार्क, उद्योग, रोजगार आणि पर्यटन विकास हवा असेल तर सर्वप्रथम मूलभूत पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. त्यामध्ये विश्वासार्ह विमानसेवा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. स्टार एरलाईन्सची मुंबईची नियमित विमानसेवा, ९१ च्या गोवा व हैदराबाद सेवांचे सातत्य, तिरुपतीसाठी थेट विमानसेवा आणि होटगी रोड विमानतळावर नाईट लँडिंग या सर्व बाबींवर शासनाने कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. त्यानंतरच नवीन विमानतळाची आवश्यकता असल्यास त्याचा पारदर्शकपणे विचार करावा, अशी मागणी मंचाने केली आहे.

# कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरील तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूर - अचानक कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून अजित अंकुश पाटील (वय २८ रा.मंद्रूप ता.दक्षिण सोलापूर) हा तरुण जखमी झाला. तो आज रविवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास अकोले मंद्रूप ते सोलापूर येथे दुचाकी वाहनावरून जात होता. डोणगाव रोड येथील नागोबा मंदिराजवळ अचानक कुत्रा



आडवा आल्याने हा अपघात घडला. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सलगरवस्ती पोलिसात याची नोंद झाली आहे.

# झोक्यावरून पडल्याने मुलगी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

एमआयडीसी परिसरातील अविनाश नगर येथे झोक्यावरून खाली पडल्याने आद्या लक्ष्मीकांत हिप्परगी (वय ७ वर्षे) ही मुलगी जखमी झाली. आज रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ती राहत्या घरात झोका खेळत होती .त्यावेळी अचानक झोक्यावरून पडल्याने तिच्या डोकीस जखम झाली. तिला उपचारासाठी जयश्री (आई) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. एमआयडीसी पोलिसात याची नोंद झाली आहे.

# सौ.भू.म.पुल्ली कन्या प्रशालेत १६०० विद्यार्थिनींचे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, सोलापूर व शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशालेतील सुमारे १६०० विद्यार्थिनींची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ ते शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ या तीन दिवसीय नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केंद्रीय विशेष शिक्षक रुपाली केंची मॅडम यांच्या विशेष प्रयत्नातून यशस्वीपणे संपन्न झाले.या शिबिरासाठी शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर प्रियांका कांबळे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत चव्हाण, तेजस्वी गुरगुले व मोहित पठाण या ऑप्टोमेट्रिस्ट तज्ञांनी विद्यार्थिनींची नेत्र तपासणी केली. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरलेल्या या उपक्रमामुळे त्यांच्या डोळ्यांशी संबंधित समस्या वेळीच निदर्शनास आणून त्याबाबत योग्य मार्गदर्शन



मिळाले. या उपक्रमासाठी उपमुख्याध्यापक श्री.तुकाराम श्रीराम व पर्यवेक्षक श्री.परमेश्वर बाबळसुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमासाठी वेळ, सेवा आणि सहकार्य दिल्याबद्दल मुख्याध्यापिका सौ. उमा कोटा यांनी शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

या उपक्रमाबद्दल पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम ,उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी ,सचिव दशरथ गोप ,सहसचिव मलिकार्जुन सरगम ,खजिनदार गोवर्धन कमटम ,शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली व सर्व विश्वस्तांनी कौतुक केले.

# कॉलेजचे वर्ष वाया गेल्याच्या विवाहित तरुणीने पिले फरशी पुसण्याचे फिनाइल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ सप्टेंबर -**

कॉलेजचे एक वर्ष वाया गेल्याच्या रागात एका १९ वर्षीय विवाहीत तरुणीने फरशी पुसण्याचे फिनाईल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना न्यू बुधवार पेठ परिसरातील विश्वदीप चौकाजवळ आज रविवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली .

समृद्धी देवराज गायकवाड (वय १९ वर्ष, रा रा. विश्वदीप चौक सोलापूर) असे फिनाइल पिलेल्या विवाहित तरुणीचे नाव आहे. आज रविवारी दुपारच्या सुमारास घरात असताना तिने हा प्रकार केला. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात पती देवराज यांनी दुपारी दीड वाजता दाखल केले.

# अक्कलकोट तालुक्यात मोहिते-पाटलांनी वाढविल्या भेटीगाठी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर -**

माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अक्कलकोट तालुक्यातील नेते, कार्यकर्ते आणि विविध राजकीय घटकांशी संपर्क वाढविल्याचे चित्र आहे. त्यांच्या या भेटीगाठी केवळ सदिच्छा भेटी आहेत की त्यामागे आगामी राजकीय घडामोडींची पूर्वतयारी आहे, आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीच्या निमित्ताने रणजितसिंह मोहिते-पाटील सक्रिय झाल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

स्थानिक नेत्यांमधील नाराजी, गटांतर्गत मतभेद आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या राजकीय संधींचा अंदाज घेत मोहिते-पाटील आपली संघटनात्मक ताकद पुन्हा सक्रिय करत आहेत.पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्ह्यातील विविध भागांत संपर्क वाढवत स्थानिक नेत्यांना सोबत घेण्याच्या हालचाली सुरू केल्यानंतर मोहिते-पाटील गटाकडूनही राजकीय सक्रियता वाढताना दिसत आहे. मोहिते-पाटील घराण्याचा सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. मात्र, अलीकडच्या काळात पालकमंत्री गोरे यांनी विविध तालुक्यांमध्ये आपला संपर्क मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष-दिलीपभाऊ सिद्धे, जिल्हा परिषद सदस्य- प्रवीण तानवडे, आनंद तानवडे, नगरसेवक मुस्तफा बळोरगी, शेरीकर बंधू यांच्या निवासस्थानी भेट दिली.

> **स्वर्गीय प्रदीप जगताप यांच्या कुटुंबियांचे सांत्वन**
>
> रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तालुक्यातील गोगाव येथे जाऊन स्वर्गीय प्रदीप जगताप यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. एक सच्चा, निष्ठावंत कार्यकर्ता आपल्यातून निघून गेल्याची भावना रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

# सामाजिक सद्भावनेतूनच समाजातील प्रश्नांची उकल : स्वानंद कुलकर्णी




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ६ सप्टेंबर २०२६**

समाजातील विविध प्रश्न व समस्या वादातून नव्हे, तर विचारमंथन, संवाद आणि परस्पर समन्वयातून सोडविल्या जाऊ शकतात. सामाजिक सद्भाव हा केवळ विचार नसून तो व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या आचरणातून निर्माण होणारा संस्कार आहे, असे प्रतिपादन स्वानंद कुलकर्णी यांनी केले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, मंगळवेढा येथे रविवार, ६ सप्टेंबर रोजी सामाजिक सद्भाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकल हिंदू समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक सद्भाव, पंचपरिवर्तन, सांस्कृतिक जाणीव, कुटुंब प्रबोधन आणि नागरिक कर्तव्य या विषयांवर बैठकीत विचारमंथन करण्यात आले.स्वानंद कुलकर्णी म्हणाले, भारतीय संस्कृतीची ओळख विविधतेतील एकतेत आहे. रामायण, महाभारत आणि भारतीय ज्ञानपरंपरेतून समाजाला एकत्र ठेवणारे अनेक विचार मिळतात. आजच्या पिढीला आपल्या मूळ संस्कृतीपासून दूर नेण्याचे प्रयत्न होत असताना तरुणांनी वास्तव समजून घेऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. समाजातील दोष दूर करण्यासाठी वादापेक्षा संवाद आणि एकत्रीकरणाची भूमिका महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले. जिल्हा संयोजक विजय वाघमोडे म्हणाले, मजबूत राष्ट्रनिर्मितीसाठी समाजातील विविध जाती, संस्था आणि घटकांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. तालुका संयोजक दिगंबर यादव यांनी प्रास्ताविकात हिंदू धर्माचे विचार व श्रेष्ठत्व, संत-राजांची परंपरा तसेच भक्ती आणि शक्ती परंपरेचे महत्त्व विशद केले. छत्रपती संभाजी महाराज, संत जगनाडे महाराज, संत रविदास महाराज व संत गोरा कुंभार यांचे कार्य तसेच धनगर, गिसाडी, वैदू, नाथ डवरी, रामोशी, मेहतर यांसह विविध समाजघटकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान, स्त्रीचा सन्मान आणि हिंदू समाजातील विविध घटकांचे संघटन यासाठी सामाजिक सद्भावाच्या माध्यमातून कार्य करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दरम्यान सर्व उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पेरूचे रोप भेट देण्यात आले.याप्रसंगी एकात्मता मंत्र व सांघिक पद्य ओंकार चिटणीस यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर पवार तर आभार दामाजी पडवळे यांनी मानले.

# ओम शांती येथे केला गेला ६० शिक्षकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ६ सप्टेंबर -**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय माउंट आबू राजस्थान यांच्या कुर्डूवाडी येथील ओम शांतीच्या सेंटरवर शिक्षक दिना निमित्त कुर्डूवाडी शहर परिसरातील साठ शिक्षकांचा सत्कार व रक्षाबंधन आनंदाच्या वातावरणात संपन्न झाले.

ओम शांती सेंटरच्या वतीने नेहमीच सामाजिक उपक्रम राबवले जातात नुकतेच देशभर दहा कोटी नशा मुक्त अभियान भारतभर राबवण्यात आले होते यावेळी कुर्डूवाडी सेंटरच्या वतीने ही अनेकांना नशा मुक्त बाबत शपथ दिली होती यावेळी शिक्षक दिन व रक्षाबंधनाचे औचत्य साधून हा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला यावेळी सर्वांचा सत्कार करून ईश्वरीय ज्ञानाची पुस्तके भेट म्हणून देण्यात आली

यावेळी ओम शांती बार्शी सेंटरच्या ब्रह्माकुमारी अनिता दीदी अकलूज सेंटरच्या ब्रह्मकुमारी शिवरात्री दीदी कुर्डूवाडी सेंटरच्या ब्रह्मकुमारी गोदावरी दीदी यांनी उपस्थित शिक्षकांना अध्यात्म व शालेय जीवनातील विद्यार्थ्या सोबत वागण्या बाबतचे गुढ ज्ञान दिले यावेळी शिक्षकांना राजयोग व त्याबद्दलची माहिती देण्यात आली यावेळी माजी आ विनायकराव पाटील व शाळेतील शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# विकासकामांबरोबरच मतदानाचाही हक्क बजावण्याची आवश्यकता

## आमदार देवेंद्र कोठे : एसआयआर यादीत नाव नसल्यास अद्यापही नाव नोंदणीची मुदत असल्याने नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

नागरिकांनी विकासकामांबरोबरच मतदानाचाही पवित्र हक्क बजावण्याकरिता जागरूक असले पाहिजे. त्यामुळे ज्या नागरिकांचे नाव एसआयआर यादीत आलेले नाही त्यांना नाव नोंदणीसाठी अद्यापही मुदत असून अशा नागरिकांनी यंत्रणेतील संबंधितांशी संपर्क साधून आपले नाव नोंदवावे, असे आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. अंत्रोळीकर नगर परिसरातील राजेश कुमार नगर येथे असलेल्या श्री गणेश मंदिर आणि श्री हनुमान मंदिरासमोरील सभामंडपाचे भूमिपूजन शुक्रवारी आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेविका संगीता जाधव, नगरसेवक अक्षय अंजीखाने, माजी नगरसेवक आणि एसआयआरचे शहर मध्यचे बीएलए गुरुशांत धुत्तरगावकर, भारतीय जनता पार्टी एससी मोर्चाचे राजाभाऊ माने, रविकांत कोळेकर, भाजपचे मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महेश बनसोडे, धनराज आनंदाणी उपस्थित होते.



यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते श्री गणरायाची आणि श्री हनुमंताची आरती करण्यात आली तसेच आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक आणि परिसरातील नागरिकांच्या हस्ते कुदळ मारून सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानातून करण्यात येणाऱ्या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन झाले. या सभा मंडपासाठी ३६ लाख ५८ हजार रुपयांचा विकासनिधी मंजूर करण्यात आला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांची वसाहत असलेल्या राजेश कुमार नगर येथे भव्य सभा मंडप बांधण्याबरोबरच बाग, मैदान, पार्किंग आदी सोयी देण्यात येणार आहेत. तसेच येथील घरांच्या खरेदी खताच्या रखडलेल्या कामाबाबत पुढील दोन दिवसात जिल्हाधिकाऱ्यांना भेटून याबाबत तोडगा काढण्यात येईल.

यावेळी माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेविका संगीता जाधव, अक्षय अंजिखाने, रविकांत कोळेकर, मंडल अध्यक्ष नागेश सरगम यांनी सूत्रसंचालन तर नगरसेवक सात्विक बडवे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास निशिकांत खेडकर, सुवर्णा दास, शक्ती केंद्रप्रमुख राघवेंद्र सावळगी, बूथ प्रमुख संतोष हलकुडे, राहुल म्हेत्रे, नितीन भिसे आदी उपस्थित होते. सभा मंडप भूमिपूजनाच्या कार्यक्रमानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी राजाभाऊ माने, सुवर्णा तोटुंगल(दास), धनराज आनंदानी, मिलिंद माईणकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन संवाद साधला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नशामुक्त भारत घडविण्याचा संकल्प

**सुरत :** केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्या नेतृत्वाखाली ‘विकसित भारतासाठी नशामुक्त युवा’ या संकल्पनेवर आधारित ‘फिट इंडिया संडेज ऑन सायकल’च्या ८९ व्या आवृत्तीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे अधिक आरोग्यदायी, सुरक्षित आणि नशामुक्त भारत घडवण्याचा सामूहिक संकल्प पुन्हा एकदा दृढ करण्यात आला. या कार्यक्रमात खेळाडू, विद्यार्थी, फिटनेस प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी सायकलिंग आणि फिटनेस उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवला तसेच नशामुक्त भारत घडवण्याच्या दिशेने योगदान देण्याची शपथ घेतली. या शपथविधीमुळे ‘नशामुक्ती संकल्प अभियानाअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सामूहिक संकल्पाचा संदेश अधिक बळकट झाला. या उपक्रमाने नागरिकांना, विशेषतः तरुणांना, अंमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहण्यास आणि ‘नशामुक्त भारत’च्या स्वप्नपूर्तीसाठी योगदान देण्यास प्रेरित केले. सुरतमधील या कार्यक्रमाची सुरुवात मंगध चौकातील सरदार पटेल यांच्या पुतळ्याजवळ झाली. येथे सहभागींनी सायकलिंगला सुरुवात करण्यापूर्वी योग, झुंबा, फिटनेस उपक्रम आणि विविध आव्हानांमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी सारथाना प्राणीसंग्रहालयापर्यंत ६ किमीची सायकल रॅली पूर्ण केली.

### श्रीराम-इव्हान दुसऱ्या फेरीत

**न्यू यॉर्क :** अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत एन. श्रीराम बालाजी व त्याचा अमेरिकन जोडीदार इव्हान किंगने पहिल्या फेरीत नेदरलँड्सच्या जोडीवर विजय नोंदवून पुढील फेरीत प्रवेश केला. श्रीराम-इव्हानने नाट्यमय लढतीत नेदरलँड्सच्या जोडीविरुद्ध सहा मॅच पॉइंट्स वाचविले व दुसऱ्या फेरीत स्थान मिळविले. सामन्यात जेव्हा निर्णायक क्षण आला, तेव्हा बालाजीने गेल्या वर्षीच्या निराशाजनक अनुभवातून धडा घेत संयम राखला. गत वर्षी याच स्पर्धेत मॅच पॉइंट्स हाती असूनही बालाजीला पहिल्या फेरीतच वेदनादायी पराभवाचा सामना करावा लागला होता. बारा महिन्यांनंतर, परिस्थिती अगदी उलट होती; यावेळी प्रतिस्पर्धी विजयाच्या अगदी जवळ पोहोचले असतानाही, या भारतीय-अमेरिकन जोडीने हार मानली नाही आणि आपली पकड कायम ठेवली. बालाजीसाठी या विजयामुळे नक्कीच समाधानाची भावना निर्माण झाली. आम्ही हे साध्य करू शकलो याचा मला खूप आनंद आहे. मी गत वर्षीही इथे होतो आणि माझ्याकडे मॅच पॉइंट्स होते, पण मी पहिल्या फेरीतच हरलो होतो; त्यामुळे आता त्या पराभवाचा वचपा काढल्यासारखे वाटत आहे, मला याचा खूप आनंद आहे, असे श्रीराम बालाजी म्हणाला.

### मायकल शूमाकर यांना वेटेलकडून श्रद्धांजली

**मोंझा :** रविवारी मोंझा ग्रँड प्रिक्सपूर्वी, सात वेळा जगज्जेता राहिलेल्या मायकल शूमाकर यांच्या प्रतिष्ठित २००२ फेरारी गाडीचे सारथ्य करत सेबॅस्टियन वेटेलने या एफ वन दिग्गजाला श्रद्धांजली वाहिली. वेटेलने एफ २०२२ गाडीतून काही फेऱ्या पूर्ण केल्या आणि फेरारीचे होम-ग्राउंड असलेल्या ‘ऑटोड्रोमो नॅझिओनाले मोंझा’ ट्रॅकवरून धावताना प्रेक्षकांना हात उंचावून अभिवादन केले. ‘टिफोसी’ (फेरारीचे चाहते) यांनी चार वेळा चॅम्पियन राहिलेल्या आणि रेड बुलच्या माजी चालकाचे जोरदार स्वागत केले. ट्रॅकवरील त्या अविस्मरणीय क्षणांमध्ये शूमाकर यांची आठवण ताजी झाली; प्रतिष्ठित एफ २०२२चे दृश्य आणि त्या गाडीचा जबरदस्त आवाज यांनी उपस्थितांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. वेटेलने परिधान केलेल्या रेस-सूटवर शूमाकर यांच्यासाठी एक संदेश होताः ‘माझ्या मित्र मायकलसाठी, अजून एक शर्यत जिंकायची शिल्लक आहे.’ त्याने गाडी गोल फिरवण्याचे काही कसब केले आणि मुख्य शर्यत व चालकांच्या परेडपूर्वी मोंझा ट्रॅकवरील या कामगिरीने चाहत्यांना मंत्रमुग्ध केले.

# ईशान किशनचे नाबाद शतक

## दुलिप करंडक क्रिकेट ● अभिमन्यू, शिखर, कुमार कुशाग्राची अर्धशतके ● पूर्व विभाग ४ बाद ३८५ धावा



समन्वय साधत धाव घेताना कर्णधार ईशान किशन व कुमार कुशाग्रा (उजवीकडे

**चेन्नई, ६ सप्टेंबर**

रविवारपासून येथे प्रतिष्ठेच्या दुलिप करंडकासाठी सुरू झालेल्या अंतिम क्रिकेट सामन्यात कर्णधार ईशान किशनचे (नाबाद १११) शतक आणि अभिमन्यू ईश्वरन (७२), शिखर मोहन (८५) व कुमार कुशाग्राच्या ( नाबाद ६३) दमदार अर्धशतकांच्या बळावर पूर्व विभागाने तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभागाविरुद्ध दिवस अखेर पहिल्या डावात ७९ षटकांत ४ बाद ३८५ धावा उभारल्या. पूर्व विभाग संघाचा कर्णधार ईशान किशनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अभिमन्यू ईश्वरन व वैभव सूर्यवंशीने कर्णधाराच्या अपेक्षानुरूप ८८ चेंडूंत १०० धावांची सलामी भागीदारी करून पूर्व विभागाच्या डावाची झकास सुरुवात केली. सूर्यवंशी अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असतानाच डावखुरा मध्यम गती गोलंदाज चामा मिलिंदने त्याला बदली खेळाडू टी. त्यागराजनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सूर्यवंशीने ३७ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ४४ धावांचे योगदान दिले. त्यानंतर शिखर मोहनच्या साथीने खेळताना १३ धावांची भर पडली असताना अभिमन्यू ईश्वरन धावबाद झाला. अभिमन्यूने ८६ चेंडूंत ७२ धावांची आकर्षक खेळी केली, यात त्याने १० चौकार व एक षट्कार खेचला. आंध्र प्रदेशच्या त्रिपुरान विजयने सुदीप कुमार घरामीला (६) खेळपट्टीवर रमण्याआधीच तंबूत परत पाठविले, मात्र तिकडे शिखर मोहनची फटकेबाजी सुरूच होती, मात्र चामा मिलिंदने एका आखुड टप्प्याच्या चेंडूवर शिखरची घोडदौड रोखली. राँचीच्या शिखर मोहनने १२० चेंडूंचा सामना करत ९ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ८५ धावांची खेळी केली.

नंतर कर्णधार ईशान किशन व कुमार कुशाग्रा या जोडीने दक्षिण विभागाच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. दिवस अखेरपर्यंत चौफेर फलंदाजी करीत ईशानने नाबाद शतक, तर कुमार कुशाग्राने नाबाद अर्धशतक साजरे केले. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी नाबाद १४४ धावांची भागीदारी करीत पूर्व विभागाला पहिल्या डावांत दिवस अखेर ७९ षटकांत ४ बाद ३८५ धावांचा टप्पा गाठून दिला.

दक्षिण विभागाकडून चामा मिलिंदने ५६ धावांत २ बळी टिपले, तर त्रिपुरन विजयने ११४ धावा देत एक बळी मिळविला. (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिराग ‘चॅम्पियन’




विजयाचा आनंद साजरा करताना चिराग शेट्टी व सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी

**शेन्झेन, ६ सप्टेंबर**

भारताच्या सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीने रविवारी येथे झालेल्या बीडब्ल्यूएफ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेतील ‘चायना मास्टर्स’मध्ये पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकले. हे त्यांचे दहावे बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद ठरले.

जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेल्या या भारतीय जोडीने चीनच्या जी टिंग वुन- रेन शियांग यू या जोडीवर ११-२१, २१-१३, २१-१७ असा विजय नोंदविला. सात्त्विक-चिराग ही जोडी २०२३ व २०२५ मध्ये उपविजेती ठरली होती आणि २०२४ मध्ये उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली होती.

गत महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत बाहेर पडल्यामुळे बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील तिसरे पदक हुकलेल्या सात्त्विक-चिरागने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरमधील आपल्या कारकिर्दीतील १० वे विजेतेपद मिळविले. हे त्यांचे या वर्षातील दुसरे व एकूण चौथे ‘सुपर ७५०’ विजेतेपद आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष दुहेरीचे विद्यमान विजेते असलेल्या या भारतीय जोडीने, २००५ मध्ये ही स्पर्धा सुरू झाल्यापासून ती जिंकणारे पहिले भारतीय ठरण्याचा मान मिळविला. सात्त्विक व चिराग यांची २०२६ मधील ही तिसरी बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर अंतिम फेरी होती. मे महिन्यात ‘थायलंड ओपन’मध्ये उपविजेतेपद मिळविल्यानंतर त्यांनी त्याच महिन्यात ‘सिंगापूर ओपन’चे विजेतेपद पटकावले होते.

चिनी जोडीने खेळावर नियंत्रण ठेवत १८ मिनिटांत पहिला गेम २१-११ असा जिंकला, परंतु भारतीय जोडीने झुंजार खेळ करीत सामन्यावर नियंत्रण मिळविले व दुसरा गेम २१-१३ असा जिंकून सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. निर्णायक गेममध्ये भारतीय जोडीने जोरदार मुसंडी मारीत अंतिम विश्रांतीपर्यंत ११-९ अशी आघाडी कायम राखली व नंतर त्यांनी संयम राखत सलग चार गुण जिंकले व ७० मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या लढतीत २१-१७ असा विजय मिळवून विजेतेपद पटकावले. (वृत्तसंस्था)

# निवृत्ती नंतर मेस्सीचा पहिला सामना

**फ्लोरिडा, ६ सप्टेंबर**

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरच्या पहिल्याच सामन्यात लिओनेल मेस्सीने फ्लोरिडा येथे अटलांटा युनायटेडविरुद्ध इंटर मियामीच्या २-२ अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यात एका गोलसाठी मदत करणारा पास दिला.

२०२२ मध्ये अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद आणि २०२६ मध्ये उपविजेतेपद मिळवून देण्यात कर्णधारपद भूषविणाऱ्या मेस्सीने मियामीसाठी या सामन्यात सुरुवात केली. मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे हा सामना नियोजित वेळेपेक्षा ९० मिनिटे उशिरा सुरू झाला.

३९ वर्षीय मेस्सीने घेतलेल्या कॉर्नर किकवर मिडफील्डर कॅसेमिरोने हेडरद्वारे चेंडू अटलांटाचा गोलरक्षक लुकास होयोसच्या पलीकडे धाडला आणि ३२ व्या मिनिटाला मियामीला आघाडी मिळवून दिली.

मात्र, मियामीची ही आघाडी केवळ तीन मिनिटेच टिकली. कॅसेमिरोने एक ‘क्रॉस’ रोखण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या गोलरक्षक डेन सेंट क्लेअरला लागून अटलांटाच्या मिगुएल अल्मिरॉनच्या पायाशी आला; अल्मिरॉनने चेंडू जाळीत धाडून सामना बरोबरीत आणला. मध्यंतराच्या अगदी आधी लुईस सुआरेझने मियामीला पुन्हा आघाडी मिळवून दिली, परंतु ८७ व्या मिनिटाला ब्रिल एम्बोलोने पेनॉल्टीवर गोल करीत अटलांटाला एक गुण मिळवून दिला.

गत आठवड्यात सीएफ मॉण्ट्रियलविरुद्धच्या ७-१ अशा दणदणीत विजयात चार गोल आणि एक ‘सहाय’ करणाऱ्या मेस्सीच्या नावावर या हंगामात १८ गोल जमा आहेत आणि तो मेजर लीग फुटबॉल (एमएलएस) मधील सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत संयुक्तपणे अव्वल स्थानावर आहे.

८ ऑगस्ट रोजी वडील जॉर्ज यांच्या निधनानंतर त्याने आपली खेळाडू म्हणून कारकीर्द पुढे चालू ठेवण्याबाबत शंका व्यक्त केली होती. (वृत्तसंस्था)

### मेस्सी, रोनाल्डो पहिल्यांदाच एकत्र खेळणार ?

**ब्युनस आयर्स :** लिओनेल मेस्सी व ख्रिस्टियानो रोनाल्डो या डिसेंबरमध्ये एका अभूतपूर्व पुनर्मिलनासाठी एकत्र येऊ शकतात; फुटबॉलमधील या दोन आधुनिक काळातील दिग्गजांना कार्लोस तेव्हेझ त्याच्या बहुप्रतिक्षित निरोप समारंभाच्या सामन्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे. तेव्हेझ ‘बोका ज्युनियर्स’ या अर्जेंटिनी क्लबमध्ये व्यावसायिक फुटबॉलला अंतिम निरोप देण्याची तयारी करीत आहे; याच क्लबमधून त्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती आणि अखेरच्या टप्प्यासाठी तो तिथे परतला होता. ४२ वर्षीय तेव्हेझने गेल्या तीन वर्षांपासून व्यावसायिक फुटबॉल खेळलेले नाही, परंतु आता तो बोकाचे प्रतिष्ठित मैदान ‘ला बॉम्बोनेरा’ येथे अनेक दिग्गज खेळाडूंच्या सहभागासह एक विशेष सामना आयोजित करण्याचे नियोजन करीत आहे.

सुमारे ६० दिग्गज फुटबॉलपटूंचा सहभाग अपेक्षित असलेला हा सामना डिसेंबरच्या मध्यावर खेळविला जाईल. तेव्हेझने तारखांबाबत बोका क्लबशी चर्चाही केली आहे. आम्ही त्यांना एकत्र आणू, असे तेव्हेझने सांगितले. यामुळे अशा पुनर्मिलनाची शक्यता निर्माण झाली आहे. हे साध्य करण्याची आपल्याला वास्तववादी संधी आहे, असा विश्वास तेव्हेझला वाटतो.

# आन से यंगला तिसऱ्यांदा जेतेपद

**शेन्झेन :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या दक्षिण कोरियाच्या आन से यंगने टोमोका मियाझाकीचा २१-१७, २१-६ असा पराभव करून सलग तिसऱ्या वर्षी ‘चायना मास्टर्स’ स्पर्धा जिंकली आणि या हंगामातील आपले सातवे वैयक्तिक विजेतेपद नावावर केले. ‘चायना मास्टर्स’चे विजेतेपद जिंकण्याची हॅट ट्रिक साधणारी आन ही पहिली खेळाडू ठरली आहे, तसेच मियाझाकीविरुद्धचा तिचा अपराजित विक्रम तिने ८-० असा कायम राखला. ऑलिम्पिक आणि जागतिक विजेती असलेल्या आनने ही संपूर्ण स्पर्धा एकही गेम न गमावता जिंकली; या स्पर्धेत कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला तिच्याविरुद्ध एका सामन्यात २८ पेक्षा जास्त गुण मिळवता आले नाहीत. मला माझ्या कामगिरीचा खूप अभिमान वाटतो. या निकालामुळे मी खरोखरच आनंदी आहे, असे आन म्हणाली. आनने गेल्या हंगामात ११ विजेतेपदे जिंकून एका हंगामातील सर्वाधिक विजेतेपदांच्या विक्रमाशी बरोबरी केली होती आणि आता ती तो विक्रम मोडण्याच्या मार्गावर आहे. गत महिन्यात नवी दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत यामागुचीचा अंतिम सामन्यात २१-१७, २१-१४ असा पराभव करून आपले जागतिक विजेतेपद यशस्वीपणे राखल्यानंतर आनने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पुन्हा मिळविले होते.

# मानसी सिंगची रौप्यपदकावर मोहर

**इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन**



**पोंटियानक, ६ सप्टेंबर**

रविवारी येथील ‘जीओआर तेरपाडू अहमद यानी स्टेडियमवर झालेल्या ‘इंडोनेशिया मास्टर्स सुपर १००’ बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात, चीनच्या शू वेन जिंग हिच्याकडून पराभव पत्करावा लागल्याने भारताच्या युवा बॅडमिंटनपटू मानसी सिंगला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. उत्तर प्रदेशच्या २१ वर्षीय मानसीचा, जागतिक क्रमवारीत ८१ व्या स्थानावर असलेल्या चिनी खेळाडूविरुद्ध १६-२१, ८-२१ असा पराभव झाला. जागतिक क्रमवारीत ७६ व्या स्थानावर असलेल्या मानसीने कॅनडाच्या रॅचेल चॅनचा पराभव केला होता, तर शूने उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित अनमोल खरबवर मात केली होती. या आठवड्यात चॅनवर विजय मिळवण्यापूर्वी, मानसीने हाँगकाँगची लो सिन यान हॅपी, सहकारी भारतीय व दुसरी मानांकित रक्षित रामराज आणि हाँगकाँगची सलोनी समीरभाई मेहता यांचा पराभव केला होता. उल्लेखनीय म्हणजे, मानसी या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या ‘युगांडा इंटरनॅशनल चॅलेंज’ स्पर्धेतही उपविजेती ठरली होती. (वृत्तसंस्था)

# भारताचा मलेशियावर ११-१ ने विजय

## एएचएफ आशिया चषक कनिष्ठ महिला हॉकी स्पर्धा



सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार स्वीकारताना भारतीय खेळाडू

**मोकी, ६ सप्टेंबर**

एएचएफ कनिष्ठ महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताच्या कनिष्ठ महिला संघाने सलग दुसरा विजय नोंदविला. रविवारी झालेल्या ‘एलिट पूल’मधील दुसऱ्या सामन्यात भारताने मलेशियाचा ११-१ असा धुव्वा उडवित आपण गतविजेते असल्याचे सिद्ध केले.

दक्षिण कोरियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यातील ४-१ अशा विजयानंतर, मलेशियाविरुद्ध भारताने अधिक प्रभावी आणि लयबद्ध खेळ केला. सुरुवातीपासूनच त्यांचा आक्रमक खेळ बहरला; सात खेळाडूंनी गोल नोंदविले आणि संघाने ‘फील्ड गोल्स’ तसेच पेनॉल्टी कॉर्नर व स्ट्रोकचा उत्कृष्ट वापर केला. सामना सुरू झाल्याच्या पहिल्याच मिनिटाला पूजा साहूने पेनॉल्टी स्ट्रोकवर गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. चौथ्या मिनिटाला पौर्णिमा यादवने आघाडी दुप्पट केली, तर आठव्या मिनिटाला बिनिमा धानने पेनॉल्टी कॉर्नरवर आणखी एक गोल केला. १४ व्या मिनिटाला कृष्णा शर्माने आघाडी वाढविली.

दुसऱ्या सत्रात १७ व्या मिनिटाला पौर्णिमा यादवने पेनॉल्टी कॉर्नरवर आपला दुसरा गोल केला; त्यानंतर सुखवीर कौर व गीता यादवने अनुक्रमे २१ व्या आणि २८ व्या मिनिटाला गोल नोंदविले.

मलेशियाला भारताचा आक्रमक दबाव रोखता आला नाही व भारताने मध्यंतरापर्यंत ७-० अशी आघाडी घेतली. ३८ व्या मिनिटाला नूर मोहम्मदने मलेशियासाठी एक गोल केला. ४२ व्या मिनिटाला पूजाने आणखी एक पेनॉल्टी स्ट्रोक गोलमध्ये रूपांतरित करून आपला दुसरा गोल पूर्ण केला. त्यानंतर सानिका चंद्रकांत मानेने गोल करत भारताची धावसंख्या ९-१ वर नेली. ५३ व्या मिनिटाला गीताने पेनॉल्टी कॉर्नरवर आपला दुसरा गोल केला. सामना संपण्यापूर्वी दोन मिनिटे शिल्लक असताना सानिकानेही आपला दुसरा गोल पूर्ण करत संघाचा ११-१ असा विजय निश्चित केला.

या विजयामुळे दोन सामन्यांत सहा गुणांसह भारत ‘एलिट पूल’मध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. चीन आणि जपान प्रत्येकी तीन गुणांसह त्यानंतरच्या स्थानांवर आहेत, तर दक्षिण कोरिया आणि मलेशिया अजूनही विजयाच्या प्रतीक्षेत आहेत. (वृत्तसंस्था)

# रायबाकिनाची प्रथम विश्वमानांकडे वाटचाल

**न्यू यॉर्क, ६ सप्टेंबर**

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या एलेना रायबाकिनाने युलिया स्टारोडुबत्सेवाविरुद्धच्या फ्रेंच ओपनमधील पराभवाचा बदला घेतला. तिने मानांकन नसलेल्या या युक्रेनियन खेळाडूचा ७-६ (८/६), ६-३ असा पराभव करून अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम सोळाच्या फेरीत धडक मारली.

तिचा पुढचा सामना चार वेळा ग्रँड स्लॅम विजेती ठरलेल्या नाओमी ओसाका हिच्याशी होणार आहे, ओसाकाने बेल्जियमच्या एलिस मर्टेन्सचा ६-३, ३-६, ७-५ असा पराभव केला.

जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये दुसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या या कझाकिस्तानच्या या टेनिसपटूचा फ्रेंच ओपनमध्ये स्टारोडुबत्सेवाकडून दुसऱ्या फेरीत पराभव झाला होता. पहिल्या सेटमध्ये आपली लय शोधताना तिला कदाचित त्या पराभवाची आठवण होत असावी, त्यामुळे तिला सुरुवातीला संघर्ष करावा लागला. रायबाकिनाच्या ‘फोरहँड’ फटक्यांमधील त्रुटींचा स्टारोडुबत्सेवा हिने पुरेपूर फायदा घेतला आणि तिची सर्व्हिस तोडून ५-४ अशी आघाडी घेतली. मात्र, रायबाकिनाने स्वतःला सावरले आणि बरोबरी साधली. तिने पहिला सेट जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये आत्मविश्वासाने आक्रमक खेळ केला. तिने आपली आघाडी कायम राखत दोन तासांपेक्षा कमी वेळेत सामना जिंकला.

हा एक कठीण सामना होता, मला वाटते की हा माझा सर्वोत्तम खेळ नव्हता, पण युलिया एक उत्कृष्ट खेळाडू आहे. गेल्या वेळीही आमची चुरशीची लढत झाली होती आणि मला आनंद आहे की मी सरळ सेटमध्ये विजय मिळवू शकले, असे रायबाकिना म्हणाली.

जागतिक क्रमवारीत आर्यना सबालेन्काची जागा घेऊन अव्वल स्थान मिळवण्यासाठी रायबाकिनाला आता केवळ दोन विजयांची (उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी) गरज आहे - मग सबालेन्काने सलग तिसरे अमेरिकन ओपन विजेतेपद जिंकले तरीही रायबाकिना अव्वल स्थानी पोहोचू शकेल. (वृत्तसंस्था)

# भारतीय पॅरा-तिरंदाजांची पदके निश्चित

## जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिज

**अहमदाबाद, ६ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिजमध्ये भारतीय पॅरा-तिरंदाजांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवित विविध प्रकारांमध्ये अनेक पदके निश्चित केली आहे. यात ‘व्हिज्युअली इम्पेअर्ड १’ (दृष्टीहीन खेळाडूंचा गट १) या प्रकाराचाही समावेश आहे.



शीतल देवी


‘व्हिज्युअली इम्पेअर्ड १’ गटात युगल गर्ग, पवन कुमार व तन्वी इंगळेने उपांत्य फेरीत धडक मारल्यामुळे भारताची किमान दोन पदके निश्चित झाली. या प्रकारातील या दमदार कामगिरीसोबतच, भारताच्या कम्पाऊंड तिरंदाजांनी पात्रता फेरीत वर्चस्व गाजवले; यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली आणि विद्यमान विश्वविजेती शीतल देवी महिलांच्या गटात अव्वल स्थानावर राहिली, तर भारतीय पुरुष आणि महिला संघांनी अव्वल मानांकन मिळविले.

जम्मूची रहिवासी असलेली आणि हातांशिवाय तिरंदाजी करणारी भारतीय पॅरा-तिरंदाज शीतल देवी हिने महिलांच्या कम्पाऊंड पात्रता फेरीत ७२० पैकी ६९८ गुण मिळवून अव्वल मानांकन पटकावले. चार भारतीय खेळाडू पुढील फेरीत पोहोचले; यात लालपती ११ व्या, सरिता १२ व्या आणि पायल नाग १४ व्या स्थानावर होत्या. (वृत्तसंस्था)

# झेंगची आगेकूच; ओसाका, झ्वेरेव्ह चौथ्या फेरीत



विजयाचा आनंद साजरा करताना झेंग किनवेन



ॲलेक्झांडर झ्वेरेव्ह

**न्यू यॉर्क, ६ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत महिला विभागात ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या झेंग किनवेनने पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारीत सलग सात गेम्स जिंकले व २२ व्या मानांकित मॅडिसन कीजचा १-६, ७-६ (३), ७-५ असा पराभव केला आणि आपली मोहीम शानदाररीत्या पुढे चालू ठेवली.

एकीकडे मॅडिसनला अश्रू आवरणे कठीण जात होते, मात्र तिकडे पराभवाच्या छायेत व स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या मार्गावर असतानाही झेंगने हा आश्चर्यजनक विजय मिळविल्याने भावूक झाली होती. तिने कोर्टवर झोपून आपल्या विजयाचा आनंद साजरा केला.

काही तासांनंतर, १३ व्या मानांकित नाओमी ओसाकाने एलिस मर्टन्सचा ६-३, ३-६, ७-५ असा पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. जपानच्या या दोन वेळच्या विजेत्या खेळाडूने अंतिम गुण जिंकल्यानंतर आपले डोके रॅकेटवर टेकवले; या विजयाने तिलाही आश्चर्यचकित केले होते.

पुरुष विभागात अव्वल मानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव्हने दुसऱ्या सेटमध्ये काहीसा तोल गमावला असला तरी, नंतर खेळावर पुन्हा नियंत्रण मिळवित ॲलेजांद्रो ताबिलोचा ६-२, ७-६(२), ६-२ असा पराभव केला आणि स्पर्धेच्या चौथ्या फेरीत धडक मारली.

फ्रेंच ओपनमध्ये पहिले ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या व विम्बल्डनमध्ये उपविजेतेपद मिळवणाऱ्या या २९ वर्षीय झ्वेरेव्हने सामन्याची दमदार सुरुवात केली. त्याने २५ व्या मानांकित ताबिलोची सर्व्हिस दोनदा ‘ब्रेक’ केली आणि प्रतिस्पर्ध्याला एकही गुण न देता पहिला सेट जिंकला.

तिसऱ्या सेटमध्ये झ्वेरेव्हने ५-२ अशी आघाडी घेतल्यावर ताबिलोचा पराभव निश्चित झाला होता. या विजयासह झ्वेरेव्हने चौथ्या फेरीत आपले स्थान पक्के केले, आता त्याचा सामना २१ व्या मानांकित इटालियन खेळाडू लुसियानो डार्डेरीशी होणार आहे. (वृत्तसंस्था)

# दुष्काळ जाहीर करा; शेतकरी उतरले रस्त्यावर

## बार्शी तालुक्यात शेतकरी संघटनेकडून रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

राज्यासह जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी जामगाव (आ) ता. बार्शी येथे,शेतकरी संघटनेतर्फे सुमारे एक तास बार्शी-लातूर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

दुष्काळ जाहीर करुन मागील वर्षी वगळलेले महत्त्वाचे ट्रिगर पुन्हा लागू



करा, स्मार्ट मीटर बसवणे बंद करा अन्यथा शेतातील विद्युत खांब व डीपीचे आजपर्यंतचे भाडे द्या, उजनी कॅनॉलच्या पाण्याने अर्धा किलोमीटर अंतरातील तीन धरणे भरा, बायपासपासून पुढे फक्त सात मीटर संपादन असल्यामुळे मोबदला वाढवून द्या, पीक विमा कंपन्यांची त्यांच्या स्थापनेपासून तर राज्य प्रमुख विनयकुमार आवटे आणि आजपर्यंतच्या सर्व कृषी आयुक्तांची यांच्या संपत्तीची न्यायालयीन चौकशी करा, चालू खरिपाची नुकसान भरपाई व मागील आणि चालूचा पीक विमा द्या इत्यादी मागण्यासाठी हे आंदोलन केले. मागण्याची पूर्तता लवकरच न झाल्यास संबंधित मंत्र्याच्या घरावर आंदोलन करणार असल्याचा इशारा गायकवाड यांनी यावेळी दिला.

त्यावेळी यशवंत गडदे, भाऊसाहेब आवटे, बिभीषण जोडवे, श्रीहरी यादव, विजय आवटे, अशोक ठोंबरे, संजय गात, पंकज आवटे, विलास लुंगसे, उमेश काळे, बालाजी कागदे, सर्वदमन आवटे आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. आंदोलकांचे निवेदन तहसीलचे प्रतिनिधी औदुंबर शिंदे यांनी स्वीकारले. आंदोलनासाठी बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे पीएसआय सदाशिव गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता.

## महत्वाचे...

### शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

**माढा, दि. ६ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत व पीक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या सोलापूर (ग्रामीण) जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. पेरणीसाठी बियाणे, खते, औषधे आदींसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, शहर अध्यक्ष महेश गादेकर, महिला जिल्हाध्यक्ष पल्लवी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र मस्के,महिला शहर अध्यक्ष सुनीता रोटे, युवती प्रदेश उपाध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, पंढरपूर शहर अध्यक्ष सुनंदा उमाटे, पंढरपूर तालुकाध्यक्ष रुपाली पवार, प्रदेश उपाध्यक्ष लता ढेरे, गौरा कोरे, व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### शेकडो महिलांनी सुरज देशमुख यांना बांधली राखी

**टेंभुर्णी, दि. ६ सप्टेंबर -**

महामानव प्रतिष्ठान, टेंभुर्णी - यशपाल लोंढे व मित्र परिवाराच्या वतीने यंदाही रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला. यावेळी सिद्धार्थनगर, टेंभुर्णी येथील २०० हून अधिक महिलांनी एकत्र येत सुरज देशमुख यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. महिलांनी सुरज देशमुख यांना राखी बांधून औक्षण केले. सुरज देशमुख यांनी बहिणींचे मनापासून आभार मानले. महामानव प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले जात आहे. रक्षाबंधनाचा हा उपक्रमही महिला-भगिनींशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करणारा ठरला. कार्यक्रमासाठी यशपाल लोंढे व मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले.





### अशपाक मोमीन यांचे उपोषण स्थगित

**माढा, दि. ६ सप्टेंबर -**

माढा वैराग रस्त्यालगतची अतिक्रमणे हटवण्याबाबत अशपाक मोमीन यांनी माढा तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी आश्वासन दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी स्थगित करण्यात आले. माढा-वैराग रस्त्यावरील अतिक्रमणे, रस्त्यालगतच्या साइडपट्ट्यांचा वापर तसेच पादचारी मार्गास अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांबाबत यापूर्वी प्रशासनाकडे निवेदने दिली होती. मात्र, ठोस कारवाई न झाल्यास १ सप्टेंबरपासून तहसील कार्यालयासमोर शांततामय आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार मोमीन यांनी उपोषण सुरू केले. उपोषण सोडताना तहसीलदार संजय भोसले, नायब तहसीलदार विजय कवडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एम एच सय्यद उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेबाबत अभाविपचे कुलगुरूंना निवेदन

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांच्या स्वीकार व सुरक्षिततेबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर महानगरच्या वतीने कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांना निवेदन देण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची कागदपत्रे अधिकृत कार्यालयात जमा न करता शिक्षकांकडे ठेवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. विद्यार्थ्यांची कागदपत्रे ही अत्यंत संवेदनशील स्वरूपाची असल्याने त्यांच्या सुरक्षिततेबाबत तडजोड होऊ नये, अशी मागणी अभाविपने केली आहे. यावेळी अभाविप सोलापूर महानगर मंत्री रविकांत चांभार, पश्चिम भाग नगर मंत्री राहुल बोरगाव, विद्यापीठ अध्यक्ष ओम गुरव तसेच अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सुखदेव रणदिवे



**पंढरपूर,दि.६ सप्टेंबर -**

तुंगत (ता.पंढरपूर) येथील सुखदेव दिगांबर रणदिवे (वय८६) यांचे रविवार दि.६ सप्टेंबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी सुना ,नातवंडे,परतंवडे असा परिवार आहे.पत्रकार संजय रणदिवे यांचे वडील, माजी सरपंच महादेव रणदिवे यांचे बंधू तर मजी सरपंच आगतराव रणदिवे यांचे चुलते होत.

## चाटे शिक्षण समूहाचे संचालक पांडुरंग घाडगे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

### लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

येथील शैक्षणिक क्षेत्रात आपल्या उल्लेखनीय कार्याने वेगळा ठसा उमटवणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा गौरव करण्यासाठी लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने एका विशेष सोहळ्याचे आयोजन केले होते. सोहळ्यात चाटे शिक्षण समूह बार्शीचे संचालक श्री. पांडुरंग घाडगे यांना यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय शिक्षक दिनाचे औचित्य साधून बार्शी येथील रामकृष्ण हॉटेलमध्ये हा दिमाखदार सोहळा पार पडला. कार्यक्रमाची



सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लायन्स क्लबच्या झोन चेअरमन ॲड. अमिता कारंडे यांची होती. त्यांनी आपल्या भाषणात लायन्स क्लबच्यावतीने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केल्या जाणाऱ्या सेवाकार्याचा गौरव केला.

कार्यक्रमासाठी लायन्स क्लब बार्शी रॉयलचे अध्यक्ष ला. मंगेश बागुल, सेक्रेटरी ला. दयानंद रेवडकर आणि खजिनदार ला. उमेश जाधव यांच्यासह क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व हितचिंतकांनी परिश्रम घेतले. पांडुरंग घाडगे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल बार्शीतील शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सोलापूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा : रासप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूर जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच अक्कलकोट तालुक्यातील २०२५ सालाचे पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना त्वरित मिळावी याबाबतचे निवेदन सोलापूरचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य भिवाजी वावरे, अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, सोलापूर जिल्हा युवक आघाडी अध्यक्ष साहिल बंडगर, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष तात्यासाहेब व्हनमाने, तमण्णा घोडके, नरेंद्र लोभे आदी उपस्थित होते. दुष्काळग्रस्त भागात जनावरासाठी पुरेसा चारा व पिण्याचे पाणी यासह चारा छावण्या सुरू कराव्यात. आर्थिक व प्रशासकीय उपायोजना करून द्याव्यात . शेतकऱ्यांना पिक विमा त्वरित मंजूर करून घ्यावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

## १७ रिव्हॉल्व्हर, ४७ जिवंत काडतूस प्रकरणातील आरोपींना जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ६ सप्टेंबर -**

अकलूज पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आलेल्या अवैध अग्निशस्त्र प्रकरणात मुख्य आरोपी म्हणून नमूद असलेले विकास कैलास वजाळे (वय ३१, रा. परिते, ता. माढा, जि. सोलापूर) यांना माळशिरस येथील न्यायालयाने आज २५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

या प्रकरणात पोलिसांनी विकास वजाळे याच्याकडून तपासादरम्यान तब्बल १७ रिव्हॉल्व्हर आणि ४७ जिवंत काडतुसे विक्री केल्याबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे. त्यानुसार पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करून अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे जप्त केल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, आज माळशिरस येथील न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान आरोपीच्या जामीन अर्जावर युक्तिवाद करण्यात आला. न्यायालयाने आरोपी विकास कैलास वजाळेला २५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड. अजिंक्य संगीतराव यांनी काम पाहिले.

## ग्रामीणमधील रेशन दुकाने आज बंद

**अकलूज, दि. ६ सप्टेंबर -**

रेशन दुकानांमधून ई-पॉस मशीनद्वारे धान्य वितरण करताना गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने निर्माण होणाऱ्या गंभीर तांत्रिक अडचणींच्या निषेधार्थ सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकाने आज, सोमवार दि. ७ रोजी एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहेत. अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, सोलापूर ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने हा आंदोलनात्मक निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी दिली. ई-पॉस मशीनमध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत.



## सव्वा ६ लाखांचे गहाळ मोबाईल मूळ मालकांना सुपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.६ सप्टेंबर -**

करमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सन २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये गहाळ झालेले तब्बल २८ मोबाईल शोधण्यात करमाळा पोलिसांना यश आले आहे.

तांत्रिक विश्लेषण आणि पोर्टलच्या मदतीने सुमारे ६ लाख ३० हजार रुपये किमतीचे हे मोबाईल शोधून ते मूळ तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत.

सायबर पोलीस ठाण्याच्या मदतीने करमाळा पोलिसांनी गहाळ मोबाईलचा शोध घेण्याची ही धडक कारवाई केली.

यापुढे कोणत्याही नागरिकाचा मोबाईल गहाळ झाल्यास त्यांनी आपल्या हद्दीतील पोलीस स्टेशनमध्ये मोबाईलच्या संपूर्ण कागदपत्रांसह रीतसर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करमाळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी केले आहे.

## पंढरपूर सिंहगडमध्ये 'मेंटॉरबाइट' उपक्रमातून गुरुजनांप्रती कृतज्ञता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ सप्टेंबर-**

एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी, पंढरपूर येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग व आय.ई.टी.ई. क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'मेंटॉरबाइट अ बाइट ऑफ ग्रॅटिट्यूड फॉर अवर मेंटॉर्स' या विशेष उपक्रमाचे आयोजन शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

'मार्गदर्शकांचा सन्मान, गुरुजनांचा गौरव आणि उज्वल भविष्याची प्रेरणा' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी शिक्षकांसाठी स्मरणशक्ती चाचणी, तर्कशक्ती व आठवण आव्हाने, बुद्धिकौशल्य चाचणी आणि मनोरंजक



उपक्रमांवर आधारित तांत्रिक स्पर्धेचे आयोजन केले. गुरुजनांना विशेष भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. अल्ताफ मुलाणी यांनी अशा उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, आदर आणि आत्मीयतेची भावना निर्माण करण्यास उपयुक्त ठरते, असे सांगितले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. उपक्रमासाठी डॉ. अल्ताफ. मुलाणी, प्रा. वैभव गोडसे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, श्रावणी हुंडेकरी, श्रुती बजाज आदींचे सहकार्य लाभले.

## ध्वनिमुद्रिकांपासून रुग्णसेवेच्या वारशाच्या पाऊलखुणांतून इतिहासाशी संवाद

### 'इंटॅक'च्या हेरिटेज वॉकमधून सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत सोलापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाची ओळख नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने इंटॅकच्या वतीने विशेष 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले.

भुईकोट किल्ल्यावर पुरातत्त्व विभागाच्या वतीने आयोजित ध्वजारोहण सोहळ्याने प्रारंभ झाला. इंटॅक सोलापूरचे पदाधिकारी विशेष निमंत्रित होते. या वारसा फेरीची संकल्पना डॉ. सीमंतिनी चाफळकर यांनी सांगितली. या प्रसंगी इंटॅक सोलापूरचे समन्वयक प्रा.



डॉ. नरेंद्र काटीकर, सहसमन्वयिका श्वेता कोठावळे आणि डॉ. सीमंतिनी चाफळकर यांच्या हस्ते संग्रहक जयंत राळेरासकर आणि मोहन सोहनी यांचा सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष सत्यनारायण गुंडला, सेक्रेटरी विनायक पालमुरे, सल्लागार शंभूसिंह चौहान, विश्वस्त सुनील माढेकर व श्री करपे आदींनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. उपक्रमासाठी श्वेता कोठावळे, पुष्पांजली काटीकर, नितीन अनवेकर, अच्युत काटीकर आदी उपस्थित होते.

# जामगावातील खून-घरफोडी प्रकरणाचा तीन दिवसांत उलगडा

### वाडी रेल्वे पोलिसांच्या मदतीने कर्नाटकातून आरोपी ताब्यात

## सीसीटीव्हीच्या आधारे गुन्ह्याचा छडा, आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ सप्टेंबर -**

माढा तालुक्यातील जामगाव येथे घरफोडी करून चोरी करण्याच्या उद्देशाने घरात शिरलेल्या चोरट्याने ६१ वर्षीय वृद्धाचा हातोड्याने डोक्यात प्रहार करून खून केला होता. प्रकरणाचा माढा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन दिवसांत छडा लावत आरोपीला कर्नाटकातील कलबुर्गी भागातून ताब्यात घेतले आहे.

मयत अशोक मुळे (वय ६१) यांच्या डोक्यात घातक हत्याराने जबर मारहाण करून खून केला होता. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटातून सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची फिर्याद त्यांचे पुत्र विजयकुमार मुळे यांनी माढा पोलिस ठाण्यात दिली होती. घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व अंमलदारांची स्वतंत्र चार पथके तयार केली. सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे यांच्या पथकाने जामगाव येथे ३ दिवस तळ ठोकून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली.

पोलिसांनी तब्बल २०० सीसीटीव्ही फुटेजचा माग काढला. त्यामध्ये संशयित आरोपी गावात ये-जा करताना दिसून आला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याचा माग काढत तो कर्नाटकातील कलबुर्गी भागात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर वाडी रेल्वे पोलिसांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीला माढा न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास माढा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे करत आहेत.

### शेअर मार्केटमध्ये मोठा आर्थिक फटका

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार आरोपी अजयकुमार गौतम चव्हाण (वय ३१, रा. जामगाव, सध्या लऊळ) हा बेरोजगार असून त्याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सुमारे १५ ते २० लाख रुपये उसने घेतले होते. शेअर मार्केटमध्ये मोठा आर्थिक फटका बसल्याने तो कर्जबाजारी झाला होता. त्यातूनच चोरी करण्याचा मार्ग त्याने स्वीकारल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

### सोशल मीडियावरील व्हिडिओची पद्धत वापरली

चोरी करण्यासाठी आरोपीने सोशल मीडियावर पाहिलेल्या व्हिडिओमधील पद्धतीचा वापर केल्याचे तपासात समोर आले आहे. घरात प्रवेश केल्यानंतर त्याने लोखंडी कपाटाचे कुलूप उघडून चोरीचा प्रयत्न केला. यावेळी अशोक मुळे यांनी आरडाओरड सुरू केल्याने आरोपीने हातातील हातोड्याने त्यांच्या डोक्यात प्रहार करून त्यांचा खून केला आणि त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शिक्षणातून समाज घडविण्याऐवजी पैसा कमावणाऱ्या लाचारांच्या फौजा तयार

## महत्वाचे...

### शेजाऱ्यासोबत तक्रार झाल्याच्या रागात वृध्द महिलेने पिले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शेजाऱ्यासोबत तक्रार झाल्याच्या रागात एका वृध्द महिलेने पिकावर फवारणी करण्याचे औषध पिल्याची घटना बार्शी तालुक्यातील वैराग येथे रविवार, दि.६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. महानंदा बाबू माने (वय-६६) असे त्या महिलेचे नाव आहे. शेजाऱ्याबरोबर तक्रार झाल्याच्या रागात त्यांनी घरामध्ये असताना पिकावर फवारणी करण्याचे औषधे पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना वैरागच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन मुलगी शुभांगी हिने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील वृध्द दाम्पत्य जखमी

**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील वृध्द दाम्पत्य जखमी झाल्याची घटना धाराशिव-नळदुर्ग रस्त्यावरील देवसिंगा पाटी टोलनाक्याजवळ घडली. खतिजा जब्बार शेख (वय-६०), जब्बार अब्दुल शेख (वय-६६, दोघेही रा.धाराशिव) अशी जखमी दाम्पत्यांचे नाव आहे. ते दोघे दुचाकीवरुन धाराशिवहून नळदुर्गकडे निघाले असता देवसिंगा पाटी टोलनक्याजवळ मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन मुलगा सत्तार शेख याने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या

**मंगळवेढा, दि.६ सप्टेंबर-**

कर्जबाजारीपणाला कंटाळून एकाने लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवेढा शहरातील खोमनाळ रोडजवळील प्रविण वाकडे यांच्या शेतात घडली. दत्तात्रय नामदेव पाटोळे (वय-४२, रा.मेडशिंगी, ता.सांगोला, जि.सोलापूर, हल्ली रा मुंबई) असे त्यांचे नाव आहे. प्रकाश आवताडे (रा.दातपूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर) याने दत्तात्रय पाटोळे यांना पैसे देण्यासाठी लावलेल्या तगाद्यास व वारंवार दिलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून ही आत्महत्या केली, असे दयानंद नामदेव पाटोळे (वय-३८, रा.मेडशिंगी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## प्रा.डॉ.राजन गवस यांचे परखड मत

### लोकमंगल शिक्षकरत्न, आदर्श शाळा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शिक्षणातून समाज घडविण्याऐवजी आपण जणू पैसा कमावणाऱ्या लाचारांच्या फौजा तयार केल्या आहेत, असे परखड मत नामवंत लेखक तथा परिवर्तनवादी विचारवंत प्रा.डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल सहकारी पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षकरत्न व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख होते.

शिक्षणाचा प्रसार व्हावा, समाज घडावा, चांगली पिढी निर्माण व्हावी, यासाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या महापुरुषांचे शिक्षणविषयक स्वप्न भंगले, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

आपला मुलगा किंवा मुलगी शिक्षणातून चांगला माणूस म्हणून घडावा, अशी अपेक्षा पालकांना नसते असे नाही; मात्र अनेक पालकांचे लक्ष मुलाने किंवा मुलीने शिक्षणातून किती पैसा कमवावा, याकडे अधिक लागलेले असते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी दोन जिल्हा परिषद शाळा, नऊ शिक्षकांचा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. पाच हजार रुपये रोख, पुस्तके आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. 'लोकमंगल फाउंडेशनच्या लोटस' योजनेतून हुशार विद्यार्थ्यांना मदतीचे धनादेशही प्रदान करण्यात आले. डॉ.ह.ना. जगताप यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अरविंद जोशी आणि नागनाथ येवले यांनी पुरस्कार विजेत्यांची माहिती दिली. अॅड. गजानन भाकरे यांनी प्रास्ताविक केले. राजकिरण चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. तानाजी माने यांनी आभार मानले. यावेळी प्रा.देवानंद चिलवंत, डॉ. आशालता जगताप, पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांच्यासह पुरस्कार निवड समितीचे सदस्य, अन्य मान्यवर उपस्थित होते.



#### यांचा झाला सन्मान

प्राथमिक विभागातून हनुमंत सिध्दराम बनसोडे (उपरी, ता.पंढरपूर), गौरीशंकर खोबरे (सिंदखेड, ता.दक्षिण सोलापूर). माध्यमिक विभागातून श्रुती बागेवाडी (सोलापूर), संजय भस्मे (सोलापूर). कनिष्ठ महाविद्यालय विभागातून प्रसन्न नाझरे (सोलापूर), गणेश मुडेगावकर (सोलापूर). वरिष्ठ महाविद्यालय विभागातून प्रा.डॉ.श्रीनिवास मेतन, डॉ.बाळकृष्ण लोखंडे यांना पुरस्कार देण्यात आला.

#### यांचा झाला गौरव

सोलापूरचे नाव मोठे करणारे आणि लंडनमध्ये स्वतःचा उद्योग सुरू करणारे युवा उद्योजक तेजस संजीव कुसूरकर यांचे शिक्षक कौस्तुभ गोडबोले यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम पुरस्कार, सांगोला तालुक्यातील शिवणे गावच्या शेळकेवाडी येथील जि.प.प्राथमिक शाळा आणि दक्षिण तालुक्यातील कारकल येथील जिल्हा परिषद शाळेला आदर्श शाळा म्हणून गौरविण्यात आले.

#### पुढील आठवड्यात 'त्या' मुलीचा विवाह

लोकमंगल फाउंडेशनच्या सामूहिक विवाह सोहळ्याला १८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या उपक्रमातील पहिल्या विवाह सोहळ्यात विवाह झालेल्या जोडप्यांना पहिली मुलगी झाल्यास तिच्या नावावर काही रक्कम ठेवण्यात आली होती. आता या उपक्रमाला १८ वर्षे पूर्ण झाल्याने व्याजासह जमा झालेली रक्कम संबंधित मुलीला देण्यात आली. संबंधित मुलीचा विवाह पुढील आठवड्यात होणार असल्याने तिच्या विवाहासाठी ही रक्कम देण्यात आली.

## रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोच्या अध्यक्षपदी काटकर, सचिवपदी गुरव




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोच्या अध्यक्षपदी दिनेश काटकर तर सचिवपदी कल्लप्पा गुरव यांची निवड करण्यात आली.

प्रांतपाल जयेश पटेल, सहाय्यक प्रांतपाल चार्वाक बुर्गुल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी पदग्रहण केले. ही निवड २०२६-२७ या वर्षासाठी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी डॉ.अभिजीत जगताप, डॉ.श्रीकांत अंजुटगी, विश्वनाथ कोळी, गौरी गुरव, महेश नक्का यांच्यासह रोटेरियन्स उपस्थित होते.

## 'गोकुळ'च्या थकीत ऊस बिलांसाठी आज ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.६ सप्टेंबर-**

ऊसाचे दोन हंगाम उलटूनही ऊस बिलाची थकीत रक्कम हातात न पडल्याने गोकुळ साखर कारखान्याविरोधात सोमवार, दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयवर धडकणार, त्याठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

ऊस गाळप करुनही 'एफआरपी'ची रक्कम वेळेत न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक अडचणींचा भार वाढला आहे. शेतीसाठी घेतलेली कर्जे, पुढील हंगामाचा खर्च, मजुरी, खते-बियाणे यासाठी पैशांची गरज असताना कारखान्याकडून थकीत बिलांचा प्रश्न प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.



दरम्यान, या प्रश्नाबाबत 'दक्षिण'चे तहसीलदार किरण जमदाडे यांनी गोकुळ साखर कारखान्याला पत्र पाठविले आहे. शेतकऱ्यांची देणी देण्याबाबत प्रशासनाने कारखान्याकडे पाठपुरावा केला आहे. तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दोन हंगामांची बिले थकीत असून शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस दिल्यानंतरही त्यांच्या हक्काची रक्कम मिळालेली नाही. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नाही. त्यामुळे आता बिले मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे आंदोलनकर्ते शेतकरी अॅड.अमोल पाटील यांनी सांगितले.

## ५१ शिक्षक-कर्मचाऱ्यांसह १२ शाळांचा होणार गौरव

### दि.13 सप्टेंबरला पंढरपुरात होणार पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थिकेंद्रित प्रयोग आणि शैक्षणिक विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेत जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर केले आहेत. यंदा १२ आदर्श शाळांसह एकूण ५१ शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंढरपूरस्थित इसबावी येथील संतराज पॅलेस येथे आमदार जयंत आसगावकर, पुणे विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ.गणपत मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येतील. सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर.डी. पवार यांना 'मुख्याध्यापक जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

यावेळी नागेश बंडे, लक्ष्मीबाई पारधे, नागेश लोंगोटे, दत्तात्रय बिराजदार, हेमंत गुंड, भारत गायकवाड, अंकुश कांबळे, दशरथ गुरव, सावता घाडगे या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (सोलापूर) न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (वडाळा), देवमाता प्रशाला (सादेपूर), एच.जी. प्रचंडे प्रशाला (नागणसूर), के.शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय (बैरागवाडी), शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालय (कुंभारगाव), शरणबसवेश्वर विद्यामंदिर (नंदूर), श्री हनुमान विद्यामंदिर प्रशाला (तोंडले), सहकारमहर्षी गणपतराव साठे प्रशाला (माढा), यशवंत हायस्कूल (शिरभावी), आदर्श प्रशाला व न्यू कॉलेज (करकंब), हनुमान विद्यामंदिर (कव्हे) या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे.

## गणेशोत्सव मंडळात दररोज किमान दोन कार्यकर्ते उपस्थित ठेवावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

डीजे-डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याबरोबरच उत्सव काळात मुर्तीच्या सुरक्षेसाठी मंडळात दररोज दोन कार्यकर्ते उपलब्ध ठेवावेत.विसर्जनाच्या दिवशी पोलिसांनी दिलेल्या वेळेचे व सूचनांचे पालन करावे, असे आवाहन सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत करण्यात आले.

सोलापूर तालुका पोलिस ठाण्याचे पोनि कुंदन गावडे हे अध्यक्षस्थानी होते. प्रत्येक गणेश मंडळाने पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, समाजोपयोगी उपक्रम राबवावेत. उत्कृष्ट गणेश मंडळांना बक्षिसे देण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रवीण जर्दे, स्नेहलता सुपे, सीमा डोंगरीतोट आदी उपस्थित होते.



## 'भाजपा'च्या नगरसेवकांनी घेतले महापालिका कारभाराचे धडे




### सभागृहापासून विकासकामांपर्यंत नेत्यांचा कारभाराचा कानमंत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

महापालिकेचा कारभार प्रभावीपणे हाताळण्यापासून नागरिकांचे प्रश्न सोडविण्यापर्यंतचे धडे भाजपच्या नगरसेवकांना देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरसह चार महापालिकांतील नगरसेवकांचे मुंबईस्थित भाईंदर येथे प्रशिक्षण सुरू आहे. भाजपच्या नगरसेवकांना महापालिका कारभाराचे धडे देण्यात आले. सभागृहापासून विकासकामांपर्यंत अनुभवी नेत्यांनी कारभाराचा कानमंत्र दिला.

महापालिका सभागृहातील प्रभावी कामकाज, प्रशासनाशी समन्वय, नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक आणि विकासकामांचे नियोजन कसे करावे, याचे धडे भाजपच्या नगरसेवकांना देण्यात येत आहेत. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली महानगरपालिकांतील भाजपच्या नगरसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राजेश पांडे, चंद्रकांत पाटील, डॉ. विनय सहस्रबुद्धे, सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणाच्या माध्यमातून नगरसेवकांना पक्षाची रणनीती, संघटनात्मक कार्यपद्धती आणि महापालिकेचे प्रभावी कामकाज याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिकेतील आपल्या अनुभवांचा दाखला देत नगरसेवकांनी सभागृहात प्रभावीपणे काम कसे करावे, नागरिकांचे प्रश्न प्रशासनाकडून कसे सोडवून घ्यावेत आणि विकासकामांचे नियोजन कोणत्या पद्धतीने करावे, याबाबत मार्गदर्शन केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी, पक्षाची भूमिका आणि संघटनात्मक शिस्त यावर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणामध्ये महासभा, स्थायी समिती आणि प्रभाग समितीचे कामकाज, सभागृहाचे नियम, प्रश्न उपस्थित करण्याची पद्धत, तारांकित व अतारांकित प्रश्न, प्रभावी भाषण, प्रशासनाशी समन्वय आणि नागरिकांच्या प्रश्नांवर काम करण्याची कार्यपद्धती या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा महापालिका क्षेत्रात प्रभावी वापर, प्रभाग विकास आराखडा, पायाभूत सुविधा, स्वच्छ भारत अभियान, अमृत २.०, प्रधानमंत्री आवास योजना, पीएम स्वनिधी, डिजिटल सुशासन आणि नागरिकाभिमुख प्रशासन आदी विषयांचाही प्रशिक्षणात समावेश आहे.

#### नव्या नगरसेवकांना प्रश्न मांडण्याची संधी

नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना महापालिका कामकाजासंदर्भातील प्रश्न थेट मांडण्याची संधी या प्रशिक्षणात मिळणार आहे. प्रशासनाशी समन्वय, नागरिकांच्या अपेक्षा, प्रभाग विकासाचे नियोजन आणि उपलब्ध निधीचा प्रभावी वापर यावरही चर्चा करण्यात येणार आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर **तरुण भारत**
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


# आडोशाच्या ठिकाणी रंगताहेत ‘नशा पार्ट्या’

## पालक नोकरी, व्यवसायात ‘व्यस्त’

## युवा, तरुण पिढी मोबाईलमध्ये ‘गर्क’

तभा वृत्तसेवा । संजय पाटील
पिलीव, दि.६ सप्टेंबर-

आजची युवा पिढी व तरुणाई मोबाईल अर्थात सोशल मिडीयाबरोबर नशेच्या विळख्यात सापडली आहे. इतकेच नव्हे तर निर्जन ठिकाणे, घाट, बंद इमारती यांसह आडोशाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात 'नशा पार्ट्या' रंगत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही बाब भावी पिढीच्या दृष्टीने चिंताजनक बनली असल्याचे वडीलधारी मंडळींकडून सांगण्यात येते

शहरात सर्रास सुरु असलेला हा प्रकार आता ग्रामीण भागातही रुढ होवू लागला आहे. आजची युवा पिढी व तरुणाई वेगवेगळी इंजेक्शन, व्हायटनर, अंमली पदार्थ, मद्य, गुटखा, मावा, गांजा, सिगारेट, दारु, स्टींगचे सेवन यांसारख्या व्यसनांच्या आहारी जात आहे. याला आवर घालणे पालकांच्या दृष्टीने जणू मोठे आव्हान ठरत आहे.

सुरुवातीला केवळ मौजमजेसाठी किंवा मित्रांच्या आग्रहाखातर केलेला प्रयोग नंतर व्यसनाच्या आहारी जाण्यापर्यंत पोहचतात. याच्या अतिप्रमाणामुळे शिक्षण, करिअर, व्यवसाय, मानसिक, सामाजिक, कौटुंबिक जीवन यावर गंभीर परिणाम होत असल्याची अनेकानेक उदाहरणे समोर येत आहेत.सोशल मिडीया आणि व्यसनांच्या आहारी गेलेल्या युवा व तरुण पिढीच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. पालक वर्ग नोकरी-व्यवसायात व्यस्त तर युवा वा तरुण पिढी 'मोबाईल'मध्ये गर्क असे चित्र अनेक कुटुंबात दिसून येतो. मित्र-मैत्रिणींबरोबर तासन्तास चॅटिंग करणे वा मोबाईलवर बोलणे यांसारखे प्रकार नित्याचेच बनले आहेत.

विविध व्यसने आणि मोबाईलच्या आहारी गेलेल्या युवा व तरुण पिढीला वेळीच यातून बाहेर काढणे काळाची गरज आहे. यासाठी पालक, शिक्षक यांच्यासह सामाजिक स्तरावर संस्कार, संवाद, विश्वास यांसारख्या गोष्टींचा आधार घेणे महत्वाचे आहे, असे मानसशास्त्रज्ज्ञांकडून सांगण्यात येते.



### प्रेमप्रकरणे आणि गुन्हेगारी प्रवृत्ती

सोशल मिडीयाचा अमर्याद वापर, व्यसनाधीनता यामुळे शाळा, कॉलेजमधील मुले-मुली, युवा-तरुण पिढी यांच्यात जवळीकता वाढत चालली आहे. सोशल मिडीया व नशा यामुळे प्रेमप्रकरणे व गुन्हेगारी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे सांगण्यात येते.

### पोलिसांचे गस्त, समाजाची भूमिका

नशेचे पदार्थ विकणारे, नशेच्या विळख्यात ओढणारे यांच्यावर कठोर कारवाई करणे यांसह नशा पार्टी होत असलेल्या ठिकाणी पोलीसांनी गस्त घालणे आवश्यक आहे. याकामी समाजाची भूमिकाही महत्वाची ठरणार आहे, असे एका ज्येष्ठ नागरिकाने सांगितले.

# ‘महावितरण’च्या अधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांनी दिली ‘तंबी’

## पूर्वसूचना दिल्याशिवाय भारनियमन नको

## ‘पंढरी’त एका अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-

वीजपुरवठा खंडित झाल्याबाबतग्राहकांनीदूरध्वनीवरुन अथवा प्रत्यक्ष कार्यालयात विचारणा केल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सौहार्दपूर्ण आणि समाधानकारक उत्तरे द्यावीत. नागरिकांशी उध्दटपणे अथवा चुकीच्या पध्दतीने संवाद साधू नये. ग्राहकांना भारनियमनाचा कालावधी, कारणे आणि वीजपुरवठा सुरळीत होण्याबाबतची उपलब्ध माहिती स्पष्टपणे द्यावी, अशी तंबी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.




जिल्ह्यातील विद्युत भारनियमनाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत बोलताना ते पुढे म्हणाले, विद्युत भारनियमनामुळे नागरिकांसह कृषी पंपधारक शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही बाब लक्षात घेता पूर्वसूचना दिल्याशिवाय भारनियमन करता कामा नये. आपत्कालीन भारनियमन टाळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना कराव्यात.

भारनियमन करणे अपरिहार्य असल्यास त्याबाबतची पूर्वसूचना ग्राहकांना देण्यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करावी. भारनियमनाचा कालावधी आणि त्यामागील कारणांची माहिती नागरिकांना स्पष्टपणे मिळेल; याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी केले. दरम्यान, पंढरपूर विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंत्याने केलेल्या आक्षेपार्ह विधानाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावून त्याच्याकडून खुलासा घ्यावे, असे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांना उद्देशून सांगितले.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना, अधीक्षक अभियंत्यांची माहिती

सर्व विद्युत अधिकाऱ्यांनी ग्राहकांच्या भावना लक्षात घेऊन जबाबदारीने, संयमाने आणि सौहार्दपूर्ण पध्दतीने संवाद साधावेत. वीजपुरवठ्याबाबत नागरिकांना शक्य तेवढी मदत करावी आणि त्यांच्या तक्रारींचे समाधानकारक निराकरण करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी अधिकारी-कर्मचारी यांना दिल्या. मागील दोन दिवसांत अनुक्रमे चार आणि सहा तास आपत्कालीन भारनियमन करण्यात आले, अशी माहिती अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी दिली.

# ७२३ ग्रामपंचायतींचा कारभार वाऱ्यावर ?

## विकासकामांसह दाखल्यांची कामेही रखडली

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. ६ सप्टेंबर

सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ७२३ ग्राम पंचायतींची मुदत २३ ऑगस्ट रोजी संपली. मात्र, त्यानंतर अद्याप ना नवीन सरपंच निवड झाली, ना ग्रामपंचायतींवर प्रशासकाची नियुक्ती झाली. त्यामुळे जिल्ह्यातील शेकडो गावांचा कारभार अक्षरशः 'वालीविना' झाला असून विकासकामांपासून नागरिकांच्या दैनंदिन कामांपर्यंत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रामपंचायतींच्या खात्यावर १५व्या वित्त आयोगासह विविध योजनांचा निधी उपलब्ध असला, तरी अधिकृत मंजुरी आणि डिजिटल स्वाक्षरीअभावी त्याचा वापर करण्यात अडचणी येत आहेत. परिणामी रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, गटार, पथदिवे आणि स्वच्छतेची कामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एखाद्या गावातील पाणीपुरवठा योजनेची मोटार नादुरुस्त झाल्यास तिच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी मंजूर करण्याची प्रक्रियाही अडखळत आहे.याचा थेट फटका ग्राम स्थांना बसत आहे. विविध शासकीय योजनांसाठी लागणारे दाखले, ना हरकत प्रमाणपत्र, बांधकाम परवानगी यांसारख्या कामांसाठी नागरिकांना ग्राम पंचायतीकडे जावे लागते. मात्र निर्णय घेणारा सक्षम पदाधिकारी नसल्याने अनेक कामे प्रलंबित राहत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती तसेच इतर योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविताना‌ही अडचणी येत आहेत. दरम्यान, प्रशासक म्हणून विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची जिल्हा प्रशासनाची तयारी होती. मात्र शासनस्तरावरून प्रशासक नियुक्त करण्याचा निर्णय असल्याने ही प्रक्रिया रखडली आहे.




# ट्रकमध्ये बसल्याठिकाणी चालकाचा मृत्यू

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणी फाटा येथील भारत गॅसच्या पार्किंगमध्ये रांगेत वाहन घेऊन थांबलेल्या एका ट्रकचालकाचा बसल्याठिकाणी मृत्यू झाल्याची घटना घडली. रुस्तुम हैदर शेख (वय-४४, रा.गोलाई सावली, खेडा, जि.अमरावती) असे त्या ट्रकचालकाचे नाव आहे. रविवार, दि.६ सप्टेंबर २०२६ रोजी भारत गॅस पार्किंगमध्ये कंपनीचे टँकर रिकामे करण्यासाठी ट्रक घेऊन थांबलेले होते. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ते स्टेरिंगजवळ बेशुध्दावस्थेत आढळून आले. त्यांना मित्र बापूराव तरांडे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# लाईट कनेक्शन कट केल्याच्या कारणावरुन मारहाण

सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

घराचे लाईट कनेक्शन का कट केले असे म्हणत एकाला दुधाची ट्रे व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना माढा तालुक्यातील कुर्डु येथे घडली. दत्ता बापू गायकवाड (वय-४४) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते रविवारी पहाटे गावातील एका हॉटेलजवळ थांबलेले असताना तू माझ्या घराची लाईट कनेक्शन का कट केले? असे म्हणत स्वराज गायकवाड याने मारहाण केली. कुर्डुवाडी येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## महत्वाचे...

### ‘एचएनसीसी’मध्ये आरोग्याचा जागर

सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

हिरकणी महिला सशक्तीकरण केंद्र, राष्ट्रीय विकास परिषद, डॉ.हेडगेवार रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने 'एचएनसीसी' अर्थात हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये आरोग्याचा जागर हा उपक्रम घेण्यात आला. याअंतर्गत २८० विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तर ९४ विद्यार्थी-विद्यार्थिनींची थॅलेसेमिया तपासणी करण्यात आली. यावेळी हिरकणी महिला सशक्तीकरण केंद्राच्या समन्वयिका प्रा.संध्या कटकम, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कुर्रा, आयुर्वेद कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ.गायत्री देशपांडे, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे संचालक डॉ.किरण सारडा, सचिव मिलिंद फडके, कॉलेजचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांच्यासह डॉ.प्रीतम कोठारी, डॉ. श्रीनिवास जगताप, श्वेता होटकर, निहार गाडगे प्रा.संगीता माळी आदी उपस्थित होते.

### १०० आरोग्य केंद्रांना ‘एनक्यूएएस’चे लक्ष्य

सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

सोलापूर जिल्ह्यातील आतापर्यंत ३५ आरोग्य केंद्रांना 'एनक्यूएएस'चे प्रमाणपत्र मिळाले असून, ही संख्या १०० पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक दर्जेदार पध्दतीने उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य आणि घरकुल या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### पोक्सो, रॅगिंगसंदर्भात जनजागृती

सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंहगड इन्स्टिट्युट यांच्या संयुक्त विद्यमाने केगाव येथील एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे पोक्सो, ड्रग्ज, रॅगिंगसंदर्भातच्या कायद्याविषयी जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'सिंहगड'चे कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले हे अध्यक्षस्थानी होते.न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे, अॅड.श्रेया साप्टनेकर, रामचंद्र वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ.शंकर नवले, अॅड.बसवराज सलगर, अॅड. सुजय साप्टनेकर, प्रा.यशपाल खेडकर, प्रियांका गायकवाड आदी उपस्थित होते.

# लेखा संवर्गाची पदसंख्या कमी होऊ देणार नाही!

## जिल्हा परिषदांच्या आकृतीबंधावर लेखा कर्मचाऱ्यांचा आक्रमक पवित्रा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि.६ सप्टेंबर-

जिल्हा परिषदांच्या नव्या आकृतीबंधात लेखा संवर्गातील पदसंख्या कमी करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याविरोधात राज्यभर संघटित लढा उभारण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आला. लेखा संवर्ग संख्येने लहान असला तरी जिल्हा परिषदांच्या आर्थिक कारभाराचा कणा असल्याने पदसंख्या कमी करून या संवर्गाच्या भवितव्यावर परिणाम होऊ देणार नाही, असा आक्रमक पवित्रा संघटनेने घेतला.

जुळे सोलापुरातील शिवशंकर मंगल कार्यालय येथे पार पडलेल्या संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. राज्याध्यक्ष मिलिंद कांबळे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी 'म्हाडा'चे सहसंचालक अजयसिंह पवार, राज्य सरचिटणीस प्रशांत सुतार, राज्य कोषाध्यक्ष चंद्रशेखर फसाले, कार्याध्यक्ष पवन तलवारे, राधेश्याम सपकाळे, गोवर्धन मंदे यांच्यासह राज्य व जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदांच्या नव्या आकृतीबंधामुळे विविध संवर्गातील पदांची फेररचना होत आहे. या प्रक्रियेत लेखा संवर्गातील पदे कमी झाल्यास त्याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या संधी आणि भविष्यातील मनुष्यबळावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लेखा संवर्गाची सध्याची पदसंख्या कायम ठेवण्यासाठी शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.



लेखा कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रश्नही सभेत केंद्रस्थानी राहिला. कनिष्ठ लेखाधिकारी पदे पदोन्नतीने भरणे, पदोन्नतीतील विविध अडथळे दूर करणे आणि लेखा कर्मचाऱ्यांचा स्पष्ट जॉब चार्ट निश्चित करणे, या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच १०, २० आणि ३० वर्षांच्या आश्वासित प्रगती योजनेचा सुधारित लाभ कर्मचाऱ्यांना मिळावा, यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दीर्घकाळ सेवा करूनही पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नसतील तर त्याचा आर्थिक आणि सेवाविषयक परिणाम कर्मचाऱ्यांवर होतो. त्यामुळे या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका संघटनेने घेतली. कनिष्ठ लेखाधिकारी पदावरून सहाय्यक लेखाधिकारी पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ परीक्षेच्या प्रश्नावर सभेत विशेष चर्चा झाली.

सन २०१३ नंतर ही परीक्षा नियमितपणे न झाल्याने अनेक कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या संधी रखडल्या आहेत. परीक्षा वेळेत न होणे ही कर्मचाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरील बाब आहे. त्याचा फटका कर्मचाऱ्यांना बसू नये, अशी भूमिका सभेत मांडण्यात आली. बदललेल्या अभ्यासक्रमानुसार जुन्या कर्मचाऱ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची सक्ती करणे कितपत न्याय्य आहे, यावरही चर्चा झाली.

दरम्यान, उमाकांत राजगुरू राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सभेच्या आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष आनंद जाधव, जिल्हा सचिव प्रकाश शेंडगे, कार्याध्यक्ष सूर्यकांत तोडकरी, कोषाध्यक्ष मंगेश शिंदे यांच्यासह योगेश हब्बू, उमेश खंडागळे, विजय लिंगराज, विजय अडलींगे, मनोज साठे, अमित सलगर, अनिल बिराजदार, गोपीचंद नारायणकर, रफिक मुल्ला, दत्ता घोडके, योगेश काटकर्धोंड, सिकंदर फकीर, वैजनाथ गायकवाड, गुंडराज कारंडे, प्रफुल रणदिवे, रोहित धुले, अश्विनी घोडके, वाघमोडे मॅडम, प्रतीक्षा कांबळे, पोगुल मॅडम आदींनी परिश्रम घेतले.

## मुलीला फोनवर बोलण्यास वा भेटण्यास न दिल्याने घरात घुसुन आईला मारहाण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

मुलीला फोनवर बोलण्यास आणि भेटण्यास न दिल्याने घरात घुसुन त्या मुलीच्या आईला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आल्याप्रकरणी तीन महिलांविरुद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शाहीन शेख, रुक्सार, सोनाली (सर्वजण रा.ठोकळ नगर, बाळे) अशी त्यांची नावे आहेत.

याबाबत अनिता शिवानंद हिरेमठ (वय-४०, रा.कळके वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, घरासमोर काम करणारा सोहेल शेख हा त्यांच्या मुलीशी वारंवार फोनवर बोलत होता. त्यामुळे त्यांच्या मुलीला सोहेलशी न बोलण्याचा आणि न भेटण्याचा सल्ला दिला होता.

दरम्यान, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरी नातेवाईक आलेले होते. त्यावेळी सोहेल शेखची आई शाहीन शेख आणि त्याच्या दोन बहिणी रुक्सार व सोनाली या तिघी जबरदस्तीने फिर्यादीच्या घरात घुसल्या.

तुम्ही तुमच्या मुलीला सोहेलशी बोलण्यास का विरोध करता? असे म्हणत त्यांनी अनिता हिरेमठ यांच्याशी वाद घातला. अनिता आणि त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, तिन्ही महिलांनी अर्वाच्य शिवीगाळ केली. तसेच आलेल्या पाहुण्यांना आणि फिर्यादींना आरोपींनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार बावणे हे गुन्हाचा पुढील तपास करत आहेत.

# तुटलेल्या दागिन्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने पुन्हा नवलाई

## सोलापुरातील तरुण सोनार व्यावसायिकाची हातोटी

तभा वृत्तसेवा । विकास चाटी
सोलापूर, दि.६ सप्टेंबर-

नाजूक दागिना जेव्हा तुटतो तेव्हा त्याला पुन्हा जोडून पूर्ववत करण्यासाठी खूप वेळ लागायचा. दागिन्यांवर डागही पडायचा. मात्र सोलापुरातील एका तरुणाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही समस्या मिटवली आहे. वैष्णव धाराशिवकर असे त्या तरुणाचे नाव आहे. शिवसेना 'उबाठा'चे माजी नगरसेवक महेश धाराशिवकर यांचे ते चिरंजीव आहेत.

पारंपरिक सोनारकीचा व्यवसाय असल्यामुळे त्यांच्याकडे दागिन्यांची निर्मिती केली जाते. जेव्हा नाजूक दागिने तुटतात त्यांना पुन्हा जोडले जाते. मात्र आधी अशाप्रकारे तुटलेल्या दागिन्यांची जोडणी करताना खूप वेळ लागायचा. काही दिवस ही लागायचे. दागिन्याला जोडल्यानंतर त्या ठिकाणी डागही पडायचा. परिणामी त्या दागिन्याचे सौंदर्य काहीसे कमी व्हायचे.



वैष्णव धाराशिवकर हे उच्चशिक्षित आहेत. त्यांनी आधुनिक ज्ञानाने अधिक माहिती घेऊन इटालियन मेक लेझर सोल्डर मशीन आणले. या मशीनच्या सहाय्याने लेझर तंत्रज्ञान वापरुन नाजूक दागिना जसे की चैन, गंठण, अंगठी तसेच अन्य दागिनेही बिना डाग जोडले जातात. विशेष म्हणजे, दागिन्याची पुन्हा जोडणी करण्यासाठी काही मिनिटांचा वेळ लागतो.

या मशीनच्या सहाय्याने नाजूक दागिने जोडण्यात वैष्णव धाराशिवकर यांनी हातोटी मिळवली आहे. कमी वेळेत दर्जेदार सेवा मिळत असल्यामुळे सोलापूर शहर व परिसरातील अनेक सुवर्णकार वैष्णव यांच्याकडे त्यांच्या गिऱ्हाईकांनी आणलेले सोन्याचे तुटलेले दागिने घेऊन येतात. परिणामी वैष्णव यांना या व्यवसायात चांगला लाभही होत आहे.दागिने तुटल्यानंतर हाताने जोडले जात किंवा या लेसर मशीनच्या सहाय्याने दागिने पूर्ववत करण्यासाठी पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते. त्यात सुवर्णकारांचा मोठा वेळ व पैसा जात होता. हीच उणीव हेरुन वैष्णव धाराशिवकर यांनी हे यंत्र सोलापुरात आणले. एकूणच, काय तर सोलापुरातच रोजगार निर्माण करत इतरांनाही रोजगार द्यावा हा संदेश यातून समोर येतो.



### पुणे, मुंबईला जाणे ही जणू फॅशन

चांगले शिकल्यावर रोजगारासाठी पुणे किंवा मुंबईला निघून जाणे, अशी जणू फॅशनच सोलापूरमध्ये निर्माण झाली आहे. मात्र वैष्णव धाराशिवकर यांच्यासारखा एखादा अवलिया तरुण मात्र आपल्या नवीन तंत्रज्ञानाचा वेध घेण्याची वृत्ती आणि व्यावसायिकतेने सोलापूर शहरातच चांगला व्यवसाय करुन जम बसवता येतो हे दाखवून देतो.

### सर्व प्रकारच्या दागिनवर काम शक्य

आम्ही या लेझर मशीनच्या सहाय्याने सोन्या-चांदीसह अन्य प्रकारचेही तुटलेले दागिने काही मिनिटात पूर्ववत करुन देतो. लेझर तंत्रज्ञाने ते जोडल्यामुळे त्याला वेळही लागत नाही आणि दागिन्यावर कोणता डागही पडत नाही. सोलापूरच्या लोकांसाठी व्यवसायकांसाठी आमची सेवा कायम उपलब्ध आहे, असे वैष्णव धाराशिवकर यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्रीमद् भागवत कथामृत- २४

### गोपाळकाल्याची देवांनाही गोडी

श्रीमद्भागवत कथामृतातील एकूण बारा स्कंधांपैकी ९ व्या स्कंधापर्यंत आपण असंख्य विषयावर चर्चा करीत त्या मागील तत्त्वज्ञानाचाही विचार करीत आलो. यातील १० व्या स्कंधाला या सर्व स्कंधांचा आत्मा मानले जाते. कारण त्यामध्ये भगवंताने घेतलेल्या अनंत अवतारांपैकी श्रीकृष्ण चरित्राचे चिंतन आहे. श्रीकृष्ण चरित्राचे चिंतन का करायचे? कारण श्रीकृष्ण चरित्रात माणसाच्या त्रासलेल्या तप्त जीवनाला शांत करण्याचे सामर्थ्य आहे. ते विद्वान पंडितांनी गायिले आहे, ऐकले आहे. ते सर्व मंगलमय असून ऐश्वर्य संपन्न आणि विपुल प्रमाणात आहे म्हणून.श्रीकृष्ण जन्माचा अवघ्या सृष्टीला आनंद झाला खरा पण कंसाला कळल्यावर त्याची बाळावर वक्रदृष्टी पडण्याच्या भीतीमुळे देवकी मात्र चिंताक्रांत झाली. जगजेठी असतो तो बाळ नसतो आणि बाळ असतो तो जगजेठी नसतो. ज्याला कळतं त्याला जाणता म्हटलं जातं आणि ज्याला कळत नाही त्याला नेणता म्हटलं जातं. बाळ म्हणजे मायेचे आवरण आणि जगजेठी म्हणजे आवरणरहित. सर्वव्यापी परिछिन्न. जगजेठी परमात्म्याला लपवता येत नसतानाही देवकी बाळाला लपवा लपवा म्हणू लागली. चतुर्भुज अवतारातील श्रीकृष्णाला पाहून वसुदेव देवकी दोघेही घाबरले. खरे तर हे बालक सामान्य नव्हते. अद्भुत, आश्चर्यकारक होते. त्याच्या रोम रोमात ब्रम्हांड सामावलेले होते. साक्षात ब्रह्मदेवच त्याचे पालक. त्याच्यामध्ये परब्रम्ह सामावलेले होते. म्हणून ते अद्भुत होते. त्याचे नेत्र कमलाप्रमाणे होते. चारही वेद, चारही अवस्था, शुशुंभी, सूर्यावस्था, चारही पुरुषार्थ, चारी मुक्त्या, पितांबर धारी श्रीकृष्ण चतुर्भुजावस्थेत अवतार घेतात.



निरुपणकार डॉ. जयवंत बोधले महाराज

दरम्यान मला उचला डोक्यावर घ्या आणि नंदाघरी गोकुळी न्या अशी आकाशवाणी होताच साखळदंड आपोआप तुटले. बंध मुक्ती झाली. तत्त्वज्ञानाच्या अर्थाने बंधन आणि मोक्षाला कारण मन. मन राममय झाले की प्रवृत्तीच्या जागी निवृत्ती येते. मन बंधमुक्त होते. परमार्थाला वयाचे बंधन नसते. वसुदेवाने डोक्यावर घेतले याचा अर्थ मनामध्ये बुद्धीमध्ये धारण केले. मथुरेहून निघाले ते यमुनेच्या काठावर आले. यमुनेला महापूर. भगवंताचे दर्शन घेण्यासाठी पाणी वाढू लागले. पाय बाहेर काढून यमुनेला स्पर्श दिला. पण तोंड दाखवलं नाही. नंद बाबाच्या घरी आले. श्रीकृष्ण बाळाला खाली ठेवून मायेला डोक्यावर घेतले. बाळकृष्ण हसायला लागले. माया डोक्यावर होती म्हणून यमुनेने रस्ता करुन दिला. नंद बाबाच्या घरी व्रजभूमीत आनंदी आनंद झाला. गोप-गोपिका धावल्या भगवंताला पाहण्यासाठी. भगवान निघाले तेव्हा लक्ष्मीही निघाली. पण मी तिथल्या मातीमध्ये राहणार. कारण मला भगवंताचे पाय सोडायचे नाहीत, असे म्हणून लक्ष्मीने त्या मातीमध्येच राहणार असल्याचे सांगितले. गोकुळातील सुखा समाधानाला अंत राहिला नाही. बाळ श्रीकृष्णाला पाहण्यासाठी ते दिसते कसे राजस्व सुकुमार या उत्सुकतेपोटी झुंबड उडाली. श्रीकृष्ण बाळाला पाहून बळीराजाची मुलगी रत्नमालेच्या मनात मातृभाव तयार होतो. रामावतारातील पुतना मावशी असे अनेक कथासार आहेत. भगवान शंकर स्वतः कैलासाहून निघाले. पार्वतीच्या सांगण्यावरुन महादेवी बनून गोकुळात आले. बाळ श्रीकृष्ण झोपलेला असल्याने महादेवीच्या भेटीवर यशोदेला प्रश्न पडला पण बाळ श्रीकृष्णाने ओळखले आणि त्यांनी रडायला सुरुवात केली. हरिहराची भेट होते. बाळ श्रीकृष्ण हळूहळू रांगता रांगता बाहेर पडले. मित्र परिवारामध्ये रमू लागले. त्यांच्या मदतीने दुधा दह्याची चोरी करु लागले. हरीने माझे हरिले रुपचित्त नंदाच्या पोरे केली चोरी, अशा तक्रारी वाढू लागल्या. श्रीकृष्णलीला वाढू लागल्या. गाई राखता राखता मोठे झाले. भक्ती, ज्ञान, कर्म, तत्व संबंधाने प्रारब्धरुपी शिदोरी मिसळली आणि काला तयार झाला. सर्व देव विचार करु लागले चला काला खायला. ब्रह्मदेवालाही काला खाण्याची इच्छा झाली. काला गावोगावी होऊ लागला. जन्माष्टमी बरोबरच दहीहंडीचे उत्सव सुरु झाल्याचे ह.भ.प. जयवंत बोधले महाराजांनी दैनंदिन निरुपणाचे शेवटी स्पष्ट केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार,
दि. ७ सप्टेंबर २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - श्रावण
तिथी - कृ. एकादशी
ऋतु - वर्षा (दक्षिणायन)
नक्षत्र- पुनर्वसू (०६.१४)
योग - व्यतीपात (०६.४१)
करण - बालव (०५.०३)
राहू काल : सोमवार
स. ०७:३६ ते ०९:१०

दिनविशेष :
* १९०६: बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली.
* १९२१: अटलांटिक सिटी, न्यू जर्सी येथे पहिली 'मिस अमेरिका' सौंदर्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.
* १९४०: दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मनीने लंडनवर सतत ५७ दिवस चाललेल्या बॉम्बफेकीची ('द ब्लिट्झ') सुरुवात केली.
* १९९८: लॅरी पेज आणि सर्गेई ब्रिन यांनी 'गुगल' या सर्च इंजिनची अधिकृतपणे स्थापना केली.

# 'सीपीआर'मुळे रुग्णाला मिळाले जीवदान!

### डॉ. आसिफ मुजावर यांचा केला जाहीर सत्कार

### डॉ. युसूफ नाज हॉस्पिटलमधील घटना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

अचानक आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्युच्या दारात उभ्या असलेल्या रुग्णावर तातडीने 'सीपीआर' उपचार करून डॉ. आसिफ मुजावर त्याचे प्राण वाचवले. त्याबद्दल डॉ. आसिफ मुजावर यांच्या तत्परतेची दखल घेत बनसोडे कुटुंबीयांच्या वतीने त्यांचा फेटा, शाल व श्रीफळ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. काटी (ता. तुळजापूर) येथील डॉ. युसूफ नाज हॉस्पिटलमध्ये घडलेल्या या घटनेत वैद्यकीय क्षेत्रातील प्रसंगावधान आणि माणुसकीचे दर्शन झाले.

काटी येथील दिलीप बनसोडे हे अंगाला खाज येत असल्याने येथील डॉ. युसूफ नाज हॉस्पिटलमध्ये मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी उपचारासाठी गेले होते. तपासणीदरम्यान रक्तदाब तपासत असतानाच त्यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली कोसळून बेशुद्ध पडले. डॉ. मुजावर यांनी क्षणाचाही विलंब न लावता तातडीने सीपीआर देऊन प्रथमोपचार सुरू केले.योग्य वेळी मिळालेल्या या सीपीआरमुळे रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. त्यानंतर पुढील हृदयरोग तपासणी व अत्याधुनिक उपचारांसाठी रुग्णाला कार्डियाक ॲम्ब्युलन्सने उच्चस्तरीय रुग्णालयात सोलापूरला पाठवण्यात आले. तेथील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रमोद पवार यांनी डॉ. मुजावर यांच्या तत्परतेचे कौतूक केले.

#### 'देवदूता'चा बनसोडे परिवाराकडून कृतज्ञता सोहळा

दिलीप बनसोडे यांना सुखरूप डिस्चार्ज मिळाल्यानंतर, बनसोडे परिवाराने डॉ. आसिफ मुजावर यांच्या दवाखान्यात जाऊन त्यांचा फेटा, शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि पुस्तक भेट देऊन कृतज्ञता सोहळा पार पाडला. डॉक्टर साहेब, तुमच्या तत्परतेमुळेच आमच्या कुटुंबातील सदस्याला पुनर्जन्म मिळाला, अशा भावना व्यक्त करत बनसोडे कुटुंबीयांनी डॉक्टरांचे आभार मानले. या कृतज्ञता सोहळ्याला डॉ. समरीन आसिफ मुजावर यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

#### वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक बांधीलकी

काटी व परिसरात कै. डॉ. युसूफ मुजावर यांनी रुजवलेला रुग्णसेवेचा वारसा त्यांची मुले समर्थपणे पुढे चालवत आहेत. डॉ. आसिफ मुजावर हे वैद्यकीय पेशाला व्यवसाय न मानता सामाजिक कर्तव्य मानतात. अत्यंत नाममात्र शुल्कात उपचार करणे आणि गरीब रुग्णांना बरे झाल्यावर पैसे द्या, असा दिलासा देतात. इतकेच नाहीतर गावातील रुग्ण सोलापूर किंवा इतर शहरांत पुढील उपचारासाठी दाखल असल्यास, स्वतः जाऊन त्यांची भेट घेणे आणि नातेवाईकांना मानसिक आधार देवून ते सामाजिक सेवाही करतात.

## मुंबई सहकारी बोर्डावर मनसेच्या तीन संचालकांची बिनविरोध निवड

### दिलीप धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली यश



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ सप्टेंबर -**

मुंबई सहकारी बोर्डच्या संचालक मंडळावर मुंबई बँकेचे चेअरमन अमदार प्रवीण दरेकर यांच्या सहकार पॅनेलने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेना प्रदेशाध्यक्ष दिलीप धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुकीत सहकार पॅनेलचे तीन संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

नवनिर्वाचित संचालक श्रीधर जगताप, विजय जाधव आणि अनिषा माजगावकर यांनी शुक्रवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुंबई येथील शिवतीर्थ निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. राज ठाकरे यांचे आशीर्वाद घेतले. सहकार सेना प्रदेशाध्यक्ष दिलीप धोत्रे यांच्या म ार्गदर्शनाखाली सबंध महाराष्ट्र भर सहकार क्षेत्रात मनसेने संघटनात्मक पातळीवर आपली पकड मजबूत केली आहे. मुंबई सहकारी बोर्डाच्या निवडणुकीतही आपला दबदबा कायम ठेवत तीन संचालकांची बिनविरोध निवड केली आहे. हि निवड पक्षाच्या सहकार सेनेसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. निवडणुकीत सहकार पॅनेलने केलेल्या प्रभावी संघटनात्मक बांधणीमुळे तीनही उमेदवारांना बिनविरोध विजय मिळाला.

राज ठाकरे यांची भेट प्रसंगी दिलीप धोत्रे यांच्यासह सहकारसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सहकार चळवळ अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दिलीप धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार सेनेने मुंबईसह राज्यातील सहकार क्षेत्रात संघटन विस्तारावर भर दिला आहे. मुंबई सहकारी बोर्डावरील बिनविरोध निवड ही त्याच प्रयत्नांची फलश्रुती असल्याचे मानले जात आहे. आगामी काळात सहकार क्षेत्रातील विविध निवडणुकांम ध्ये मनसेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

## मुलांना रेडीमेड जीवन देऊ नका




मुलांकडून नाहक अपेक्षा बाळगू नका. प्रथम त्यांची क्षमता ओळखायला शिका. त्यांचे अवास्तव लाड करू नका. पूर्वी घरात जेवण काय बनवायचे, हे मोठ्यांना विचारून बनवत असत. आज लहान मुलांना विचारले जाते. अशाने आपली मुले ही बॉस बनतात असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले. बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात बोलत होत्या. यावेळी पेन-पेपर या विषयावर बोलताना त्या म्हणाल्या, आपल्या मुलांचे आयुष्य म्हणजे एक कोरा कागद. त्यावर आपण संस्काररूपी पेनने काय लिहितो, हे महत्त्वाचे असते. थोडी जरी त्या कागदावर शाई सांडली तर कागद खराब होतो. आजकालची मुले ही स्मार्ट आहेत. मुलांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्या, नाहीतर नाहक डॉक्टरांचे बिल भरावे लागते. नवनवे आजार मार्केटमध्ये येत आहेत. मुलांना विचारून जेवण बनवू नका. आपण स्वतः अन्नपूर्णा आहात हे विसरू नका. कोणत्या ऋतूत कोणता आहार घ्यावे, याचा अभ्यास आपल्याला असतो, मुलांना नसतो. अन्नपूर्णा बनून सशक्त परिवार बनवा. मुलांना नाहक महत्व दिला तर ते स्वतःला शहाणे समजायला लागतात, जिद्दी बनतात.नंतर मुले ऐकत नाहीत, अशी तक्रार पालक करतात. आजकालचे युवक आणि मुलांच्या वागण्याच्या पद्धतीविषयी वर्तमानपत्रात वाचले तर मन सुन्न होते. आपल्या स्वार्थासाठी मुलाच्या हातात मोबाईल देऊ नका. टीव्ही, मोबाईल आता तर होम थिएटर घरी बसवले जाते. त्यामुळे घराचे घरपण न राहता घर हे थिएटर बनते. मुलांना स्वातंत्र्य देऊ नका. लग्नाविषयी तर बिलकुल नको. आपण समाजात वावरतो. समाजातील उतार चढाव आपण पाहिलेलो असतो. लग्नाचे स्वातंत्र्य मुलांना दिल्यामुळे, आज घटस्फोटाचे प्रमाण समाजात वाढलेले दिसत आहे. तुमच्या मुलाच्या आयुष्याच्या पेपरवर उत्तम दर्जाची प्रश्नपत्रिका तुम्ही टाका. तो जरूर सोडवेल. पण आपल्यालाच चिंता असते त्याला जमेल की नाही?मुलांना सक्षम बनवा. लाड करा, सोबत शिस्त हवी. मुलांच्या मार्गावर तुम्ही फुले पसरता. त्यामुळे त्याला काट्याची किंमत समजत नाही. एखादा काटा टोचला तर त्याला चालणे मुश्किल होते. मुलांना रेडीमेड जीवन देऊ नका. त्यांना त्यांच्या पायावर उभे राहू द्या. त्यांचे विश्व त्यांना उभे करू द्या. रेडीमेड पेक्षा स्वतः उभे केलेले विश्व त्यांना जास्त आनंद देईल.

**- मल्लेश पुरवंत**



## वालचंद महाविद्यालयात शिक्षक दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर -**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी व १२वी कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. वर्गशिक्षक, विषय शिक्षक, यांनी शिक्षक दिनाचे औचित्य सांगून, विद्यार्थ्यांना सदिच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, यांनी मार्गदर्शन केले.

## माळशिरस तालुक्यात फळबाग लागवडीविषयी आंतरराष्ट्रीय कंपनीकडून प्रात्यक्षिक प्रकल्प

### माजी खासदार रणजितसिंह मोहिते- पाटील यांचे सहकार्य




**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ सप्टेंबर -**

माळशिरस तालुक्यात रणजीतसिंह मोहिते-पाटील यांच्या सहकार्याने शंभर एकरावर डाळिंब,ऊस आणि केळी पिकांवर संशोधन करून एकरी उत्पादन वाढीच्या दृष्टीने शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दाखवणेत येणार आहेत व तालुक्यातील विविध भागात हे प्रात्यक्षिक प्रकल्प राबवण्यात येणार आहेत असे आंतरराष्ट्रीय कंपनीचे मालक वरूण श्रॉफ यांनी सांगितले


माजी खासदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकारातून अकलूज येथे शेतीच्या विविध किडी व समस्यांबद्दल परिसंवाद व चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते , त्यावेळी ते बोलत होते. यावेळी हर्षल सोनपले, जितेंद्र गोरडे, अमोल अधाळे यांनी मार्गदर्शन केले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी खासदार रणजितसिंह मोहिते-पाटील, जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते -पाटील, सभापती दत्ता मगर यांच्यासह कृषी खात्याचे अधिकारी व विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .


लोणीकंद या ठिकाणी कंपनीचे प्रशिक्षण केंद्र असून त्या ठिकाणी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात आज अखेर पाऊस नसल्यातच जमा आहे. त्यामुळे मकेवर आढळणारी कीड आता उसावर परावर्तित होत आहे. त्याशिवाय शेंडेकीड, कांडिकिड, खोडकीड, हुमनी आदी किडींचा उद्रेक व्हायला लागला आहे. अशा परिस्थितीत ऊस शेतीचे त्याशिवाय केळी आणि डाळिंब शेतीचे व्यवस्थापन करण्यासंदर्भात या चर्चासत्रात विचारांची सविस्तर देवाणघेवाण झाली. चर्चा सत्राआधी परिसरातील केळी, डाळिंब, ऊस शेतीच्या शिवारात पाहणी दौराही झाला.

## 'पाऊस' रुसल्याने खरिपात 'करोडों'ची हानी?

सोलापूरसह राज्यात पावसाने ओढ दिल्याने (पावसाच्या खंडामुळे) खरीप पिकांचे प्रचंड नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या सुरुवातीलाही पावसाने प्रदीर्घ दडी मारल्यामुळे म्हणजेच पाऊस यंदा बळीराजावर रूसल्याने राज्यातील कापूस, सोयाबीन, मका, मूग, उडीद आणि बाजरी यांसारखी प्रमुख खरीप पिके वाळून आणि करपून चालली आहेत. यामुळे जिल्हानिहाय करोडोंची हानी होणार असल्याची भीती राज्यातील जाणकार कृषी तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

पावसाचा मोठा खंड पडल्याने यंदा राज्याच्या अनेक भागांत उत्पादनात ३० ते ५० टक्क्यांपर्यंत किंवा त्याहून अधिक घट होण्याचा कृषी विभागाकडून प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. तर सोलापुरातही ३० टक्के खरिपाची पेरणी झालेल्या साडेतीन लाख हेक्टरमधील ६० ते ७० टक्के पीक वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. यामध्ये सव्वालाख हेक्टरपर्यंत सोयाबीन असून, या पिकाला सर्वाधीक फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पाऊसच येत नसल्याने अनेकजण उभ्या पिकात



**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

आता रोटर फिरवित असल्याचीही वृत्ते येत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात उजनी धरण भरल्याने ऊस व बागायत क्षेत्र मोठे आहे. इतकेच नाहीतर या धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा नदीकाठच्या बहुतांश शेतकऱ्यांना खरिपासाठीही फायदा होतो. मात्र ज्यांच्या भागातून या पाण्याचा स्त्रोत वाहत नाही; त्यांना मात्र यंदा दुष्काळाशी दोन हात करण्याची पाळी आली आहे. आता जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शेतकऱ्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी आता दुष्काळी उपाययोजना चालू कराव्यात, अशीही मागणी जोर धरत आहे. परवाच सोलापुरात आपत्कालीन विद्युत भारनियमन झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी वैतागाने पालकमंत्री गोरे यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर पालकमंत्री गोरे यांनी वीज कंपनी अधिकाऱ्यांची तातडीने एक ऑनलाईन बैठक घेवून महावितरण अधिकाऱ्यांची चांगलीच हजेरी घेतली आहे. इतकेच नव्हेतर पंढरपूर येथील एका वीज कंपनी अधिकाऱ्यांना कारणे दाखवाची नोटीसही बजावण्याचे आदेश दिले आहेत. सध्या पाऊस नसल्याने शेतकरीवर्ग जाम वैतागला आहे; यातच नदीकाठी सोडलेल्या पाण्यावर आहे त्या पिकांना वाचविण्याचा प्रयत्न शेतकरीदादा करीत आहे आणि अशात वीज भारनियमन वाढले की, त्यांची पिके वाळूनच जाणार आहेत. यामुळे वीज कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचे शक्य तो भारनियमन कमी करावे किंवा करूच नये अशी मागणी शेतकरी आणि शेतकरी संघटना करताना दिसत आहेत.

राज्यभर कृषी कर्मचारी-अधिकारी त्यांच्या आकृतिबंध आणि इतर काही मागण्यांसाठी संप, आंदोलन करत आहेत; म्हणजेच या आंदोलनाचा फटकाही शेतकऱ्यांना सध्या बसणार आहे. कारण शेतकऱ्यांची प्रलंबित कामे अजून पुढेच जाणार आहेत. पावसाच्या खंडामुळे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याच्या काही जिल्ह्यातील पिकांची वाढ खुंटली आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये महिनाभर पावसाचा खंड पडल्यामुळे जमिनीला भेगा पडल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सोयाबीनची पिके पाणी न मिळाल्याने सध्या पिवळी पडून वाळू लागली आहेत. यामुळे आता कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे. परिस्थिती गंभीर असल्यामुळे शेतकऱ्यांकडून आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडून संबंधित भागांत कोरडा दुष्काळ जाहीर करून शासनाकडून मदत देण्याची मागणी शेतकरीवर्ग करू लागला आहे. मका, मूग आणि उडीद या पिकांच्या उत्पादनातही यंदा मोठी घट होणार आहे. पाऊस नसल्याने बाजरी आणि कडधान्ये वाचवण्याचे संकट उभे राहिले आहे.

विहिरी आणि कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत घट झाल्याने पिकांना पाणी देणे अशक्य झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, ज्या भागात पेरण्या लवकर झाल्या होत्या तिथे पावसाच्या ताणामुळे ३०% ते ४०% पिके हातची गेली आहेत. यामुळे शेतकरी बांधवांकडून तातडीने पंचनाम्यांची मागणी होत आहे. पिकांची वाढ खुंटल्याने आणि पिके करपल्याने शासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे सुरू करून पीक विमा आणि आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. केंद्रीय आणि राज्य कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी नुकताच काही बाधित जिल्ह्यांचा दौरा करून परिस्थितीची पाहणी केली आहे. येत्या काही दिवसांत पाऊस न झाल्यास नुकसानीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. यामुळे आता दुष्काळी उपाययोजना चालू करण्याची नितांत गरज आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने महिला दहीहंडी उत्साहात

### खासदार ज्योती वाघमारे यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने आयोजित महिला दहीहंडी उत्सव जुळे सोलापूर येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. महिला गोविंदा पथकांनी तीन थर रचून दहीहंडी फोडली. विशेष म्हणजे कार्यक्रमास खासदार ज्योती वाघमारे यांचीही उपस्थिती होती.

दहीहंडी फोडण्याचा मान साक्षी ठेंगील हिने मिळवला विजेतीला संभाजी ब्रिगेडच्या वतीने मानाची ट्रॉफी यावेळी प्रदान केली. खासदार ज्योती वाघमारे या प्रमुख अतिथी म्हणून तर यावेळी जुळे सोलापूर पोलीस चौकीच्या पीआय मोरे पाटील, नगरसेवक प्रियदर्शन साठे हेही उपस्थित होते.

यावेळी खासदार ज्योती वाघमारे यांनी संभाजी ब्रिगेडने महिलांना पुरुषाच्या बरोबर समान संधी देण्याचे काम केल्याचे मनोगत व्यक्त केले. सोलापुरातील प्रांजल पवार आणि अविनाश रस्ते यांच्या नेतृत्वाखालील शिवज्ञा ढोल-ताशांचा गजराने महिलांचा उत्साह आणि उपस्थित नागरिकांचा जल्लोष यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. यावेळी या दहीहंडीचे आयोजक संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, रील स्टार प्रीती वराडे, शहराध्यक्ष वैभव गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अरविंद शेळके, महिला शहराध्यक्ष सुनीता घंटे, जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्ष प्रीती कदम आदींसह बहुसंख्येने महिला उपस्थित होत्या.

# शहर, जिल्ह्यात शिक्षक दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांकडून अध्यापन, शिक्षकांप्रती कृतज्ञता व सन्मान सोहळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -

सोलापूर शहर व जिल्ह्यात शनिवारी दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला. शिक्षकांना सुटी देत विद्यार्थ्यांनीच शाळेत अध्यापनाचे काम केले. विविध कार्यक्रमात शिक्षकांप्रती कृतज्ञता, गुलाबपुष्प देवून सन्मान करण्यात आला. काही ठिकाणी पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सत्कारही विविध संस्थेतर्फे करण्यात आला. ज्ञानार्जन करणाऱ्या गुरुजनांना प्रती समाजाकडून ऋण व्यक्त करण्यात आले.




### शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ कराव्यात : मल्लिकार्जुन मसुती



## कल्याणशेट्टी महाविद्यालय

**अक्कलकोट :** महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा झाला.

मल्लिकार्जुन मसुती यांनी संबोधित केले. व्यासपीठावर प्राचार्य एस. आर. लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा. सौरभ भस्मे उपस्थित होते.

मलकप्पा भरमशेट्टी यांनी शिक्षकांचा कार्याचा आणि योगदानाचा सदैव आदर केला पाहिजे, असे सांगितले. प्रारंभी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. शितल झिंगाडे भस्मे यांनी तर आभार प्रा. मधुबाला लोणारी यांनी मानले. शिक्षक ज्ञानी असतो तो विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतो, असे प्रा. सौरभ भस्मे यांनी सांगितले.



## म.न.पा. कॅम्प आवार

**सोलापूर :** म.न.पा. मुलांची उर्दू केंद्र शाळा कॅम्प, लष्कर येथे प्रमुख पाहुणे फैय्याज शेख यांनी संबोधित केले. नियोजन मुख्याध्यापिका महेजबीन मुल्ला यांनी केले.

प्रास्ताविक मंचाचे कार्यवाह अरुण धुमाळ यांनी केले. रामकृष्ण अघोर, प्रा.धनंजय शहा, महेजबिन मुल्ला यांनी मनोगत व्यक्त केले. मनपा मुलींची मराठी केंद्र शाळा कॅम्प व मनपा मुलींची उर्दू केंद्र शाळा कॅम्प येथील शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापिका रेहाना नदाफ, मुख्याध्यापिका नाजनींन कोरबू व शिक्षका आरिफा शेख, रेहाना शेख, जिनत पटेल, फरहीन चौधरी, रिजवान दौलताबाद, रेश्मा पठाण ,रिजवान बेरिया ,सुनिता यादव, नईम मुच्छाले यांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमास मंचाचे सदस्य प्रेमचंद मेने, प्रांजली मोहीकर, अशोक खानापुरे, मल्लिनाथ किणगी उपस्थित होते. आभारप्रदर्शन प्रा. अशोक म्हमाणे यांनी केले.




## सुयश विद्यालय

**बार्शी :** सुयश विद्यालयात शिक्षक दिन विविधांगी कार्यक्रमांनी साजरा झाला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयीचा आदर, कृतज्ञता आणि प्रेम आपल्या कलागुणांच्या माध्यमातून व्यक्त केले.

शिक्षक दिनानिमित्त विद्यालयात इयत्ता चौथी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी विशेष बालसभा सादर केली. बालसभेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध महापुरुषांची वेशभूषा करुन त्यांच्या जीवनकार्याची माहिती सादर केली. कार्यक्रमामध्ये विविध बालनाट्ये, नृत्याविष्कार तसेच प्रभावी भाषणे सादर केली.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. सुयश संकुलाचे सर्वेसर्वा शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे आणि सचिव प्रियांका नलवडे यांच्या हस्ते शिक्षकांचा विशेष सन्मान केला. त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका अलका जगताप आणि उपमुख्याध्यापक संदीप येवले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

## श्री शहाजी प्रशाला




**अक्कलकोट :** येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत शिक्षकदिनानिमित्त मुख्याध्यापक वाय.पी.कबाडे यांनी संबोधित केले. व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक एम. बी. मुन्नोळी, ए.एस.कोरे, एस. व्ही. गोडसे, आर. एम. इंगळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख जे. एस. बगले, ए. बी.शिंदे आदीसह विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक मनस्वी कुलकर्णी, उपमुख्याध्यापक भगवंती देसाई, पर्यवेक्षक समीक्षा भांगरे, संस्कृती पगुडवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इयत्ता सातवी व इयत्ता दहावीमधील विद्यार्थिनी विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून शाळा चालवली. उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थी शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. सर्व शिक्षक वृंदाला पुष्प गुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



## नॅब शिक्षण संकुल

**सोलापूर :** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब), जिल्हा शाखा सोलापूरच्या शिक्षण संकुलातील विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन साजरा झाला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील पहिले दिव्यांग शिक्षणाधिकारी सुजित शिंदे यांनी संबोधित केले. त्यांच्या हस्ते संस्थेतील शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे खजिनदार चंद्रकांत कुलकर्णी होते. उपाध्यक्ष अनुगीता पवार, जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार, सहसेक्रेटरी सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार तसेच सदस्य देवेंद्र भंडारे, बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुजित शिंदे यांच्यासह डॉ. चंद्रकांत कुलकर्णी, अनुगीता पवार, डॉ. बंडोपंत पाटील आणि मेधा जोशी यांनी संबोधित केले. सौरभ शिंगाडे, मुख्याध्यापक संतोष माशाळे, मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर, संगीता गायकवाड, रामचंद्र कुलकर्णी, मुख्याध्यापिका सविता गुंडे, विशाल शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.जोतिबा काटे यांनी तर आभार देवेंद्र भंडारे यांनी मानले.

## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ




**सोलापूर :** नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस महानगरपालिका लेखा अधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण अर्पण केला. प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांची प्रमुख उपस्थित होती. मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, लेखापाल महेश वालावलकर, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, तरंगिणी कोंडा, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, अविनाश शिंदे, रियाज आतार, सचिन जाधवर आदी उपस्थित होते.



## संभाजीराव शिंदे विद्यामंदिर

**सोलापूर :** कार्यक्रमाची सुरुवात विष्णुपंत कोठे, माता सरस्वती व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमापूजनाने झाली.

कार्यक्रमास संस्था सदस्या डॉ.राधिका चिलका यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा.नवनाथ व्हटकर यांनी केले. डॉ.राधिका चिलका यांच्या हस्ते नागेश बंडे, प्रदिप खराडे, लता बाटगिरी, वैशाली गवळी, गीता गोटिपामुल आदींना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

सर्वेश स्वामी याला व सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शिका तनुजा मारपल्ली, नवनाथ व्हटकर, शैलजा लंगोटे, यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. नयना भोसले यांनी तर आभार दिप्ती राठोड यांनी मानले.

## 'एल.बी.पी.एम.' महाविद्यालय



**सोलापूर :** मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात 'वन डे टीचर अँड प्रिन्सिपल' हा अभिनव उपक्रम राबविला. महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रशासनाचीही सूत्रे विद्यार्थिनींकडे सोपविण्यात आली. ज्ञानदा येऊलकर यांनी एक दिवसाच्या प्राचार्य, तर शारदा बुक्या यांनी उपप्राचार्य म्हणून जबाबदारी पार पाडली. विद्यार्थिनींनी प्राचार्य, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. यावेळी अश्विनी मुळे, शारदा राठोड, साक्षी जवळकोटे, राजेश्वरी नुला, पद्मश्री व्हनमाने, सविता जाधव, अपर्णा देशमुख, पायल शिंदे, साक्षी काळे, भावना शेळके आणि अक्षरा कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक वैष्णवी गुल्लोली यांनी केले.




## अध्यापिका विद्यालय

**बार्शी :** अध्यापिका विद्यालय, बार्शी प्राचार्य बजरंग वाघमोडे यांनी शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष संबोधित केले. त्यांनी शिक्षक दिनामागील पार्श्वभुमी सांगितली. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सोमनाथ देंडे होते.

प्रथम सरस्वती व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर मधुरा बेले, अमृता धुमाळ, अमृता जाधवर, सीमा सोनवणे, पुनम पोतदार व सिनम पटेल यांनी स्वागतगीत सादर केले. प्रास्ताविक नेहा कांबळे हीने केले. यानंतर प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींकडून प्राध्यापक वृंदांचा सन्मान करण्यात आला. पुनम पोतदार व अमृता धुमाळ यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रा. सोमनाथ देंडे , प्रा. सुभाष माळी, प्रा. अशोक घुले, प्रा. प्रमोद मांडे, प्रा. रातिकांत हामणे यांनी विचार व्यक्त केले. आभार वैष्णवी अंधारे हिने मानले. सूत्रसंचालन प्रगती सुदामे व अंकिता इदगे यांनी केले.

# विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन

### अन् अथक परिश्रमाची जोड असते

### भरतकुमार शालगर यांचे प्रतिपादन

### शिक्षक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा घटक असून, शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देऊन त्यांच्यामध्ये संस्कार, शिस्त, आत्मविश्वास व जबाबदारीची जाणीव निर्माण करतात. बदलत्या शैक्षणिक वातावरणात शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबरोबरच चांगला नागरिक घडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे सदस्य भरतकुमार शालगर यांनी केले.



भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलात भारताचे माजी राष्ट्रपती व आदर्श शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांचे योगदान अधोरेखित करणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य भरतकुमार शालगर होते. प्रमुख अतिथी म्हणून सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व संकुलाचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावसा भुमकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, वालचंद आर्ट अँड सायन्स महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य सुरेशसा बिद्री, गणेशसा दामजी, शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकारामसा पवार, संजीवसा रंगरेज आदिसह प्रशालेचे मुख्याध्यापक मोरेश्वर काटवे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने व इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार आदि उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन डॉ. उज्वल मलजी यांनी तर आभार सिमा शिमगे यांनी मानले.



## सम्राट अशोक युवक मंडळ

**सोलापूर :** सम्राट अशोक युवक मंडळ २२संचलित सम्राट अशोक बालक मंदिर, सम्राट अशोक मराठी विद्यालय, यशोधरा प्रशाला व यशोधरा ज्युनियर कॉलेज, यशोधरा शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थापक रमेश सुतकर, प्रमुख पाहूणे राजा सरवदे, ॲड. सिराज अब्दुल, रजाक शेख, के. डी कांबळे, सुबोध वाघमोडे,आदींच्या हस्ते सावित्रीबाई फुले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष- रमेश सुतकर, राजाभाऊ सरवदे, डॉ. पंकज सुतकर यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुबोध सुतकर यांनी तर सुत्रसंचालन धनश्री कस्तुरे व सुभद्रा अंकुशराव यांनी केले. आभार प्रदर्शन सुधीर वाघ यांनी केले. अध्यक्ष रमेश सुतकर, सचिवा विमल सुतकर यांनी शुभेच्छा दिल्या.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सकळेश्वर देवाला धान्याची पूजा बांधण्याची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

मंद्रुपचे ग्रामदैवत श्री सकळेश्वर देवस्थान येथे श्रावण महिन्यात दर सोमवारी भक्तांकडून अकी (तांदूळ) पूजा व पानपूजा बांधली जाते. अनेक वर्षांपासून मंद्रुपमधील भक्तांकडून प्राचीन काळातील सकळेश्वर देवाची पूजा बांधण्याची परंपरा आजही अखंडीत सुरू आहे.

मंद्रुपमध्ये पुरातन सकळेश्वर मंदिर आहे. मंद्रुपच्या पश्चिम दिशेला सकळेश्वर मंदिर असून या मंदिरात सकळेश्वर देवाशिवाय कुलगुरू तीर्थाचार्य यांची समाधी आहे. डाव्या बाजूस श्री सर्वमंगळागौरी माता शक्तीदेवता आहे. याशिवाय विष्णूदेवता, अष्टभुजादेवी, नागोबा, गणपती, हनुमान अशा देवतांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या शेजारीच श्री शिवयोगेश्वर देवस्थान व मठ आहे. श्रावण समाप्ती अमावस्या दिवशी रात्रभर भजन व शिवआराधना करून जागरण करण्यात येते. मंद्रुपच्या मुख्य रस्त्यांवरून श्रीच्या मूर्तीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येते. महाप्रसाद वाटप करून श्रवण समाप्त व महिन्याच्या पूजेचा समारोप करण्यात येतो.





### महत्त्वाचे...





## गोकुळ अष्टमी उत्सवानिमित्त श्री विठ्ठलास सुवर्ण अलंकार परिधान

**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर -**

गोकुळ अष्टमी उत्सवानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठलास आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकारांनी अलंकृत करण्यात आले. श्री विठ्ठलाचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती. गोकुळ अष्टमी उत्सवानिमित्त श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभमणी, मोठा दंडपेठ्या जोड, हिऱ्याची कंगन जोड, बालाजी नाम एकपदरी कंठी, मोत्याचा तुरा, लहान शिरपेच, मत्स्य जोड, बाजीराव कंठी, सूर्यकळ्यांचा हार, तुळशीची माळ, तोडे जोड आदी पारंपरिक व मौल्यवान अलंकार परिधान करण्यात आले. गोकुळ अष्टमीच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठलाचे हे मनोहारी रूप भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले असून, भाविकांनी भक्तिभावाने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतल्याची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.



## अन्नछत्र मंडळाचे धार्मिक सेवा कार्य अलौकिक : महापौर तावडे

**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष-जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे स्वामी कार्य सातासमुद्रापार गेल्याचे मनोगत बृहन्मुंबईच्या महापौर-रितु तावडे यांनी व्यक्त केले. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत घाटकोपर (पूर्व) येथील गोकुळ अष्टमी कार्यक्रमानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. या प्रसंगी घाटकोपर (मुंबई) चे आमदार पराग शहा, गुजराती जैन समाजाचे अध्यक्ष-हरेन मर्चंट मुंबई, नगरसेवक धर्मेश गिरी घाटकोपर हे प्रमुख उपस्थित होते. महापौर तावडे यांचा सत्कार जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, छत्रपती शिवाजी महाराजांची सुबक, रेखीव प्रतिमा देऊन करण्यात आला. या बरोबरच जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचा सत्कार गुजराती समाजाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त संतोष भोसले, योगेश वाघमारे (मुंबई), शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, सर्फराज शेख, प्रशांत साठे, महांतेश स्वामी, श्रीशैल कुंभार, कुणाल भालेकर (मुंबई), आदीजण उपस्थित होते.



## श्री शिवपार्वती मंदिर शंकरनगर येथे आज महाआरतीचे आयोजन

**अकलूज, दि. ६ सप्टेंबर -**

शंकरनगर येथील महाशिवरात्री यात्रा समिती चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने श्रावण मासाच्या समाप्ती निमित्त सोमवार दि. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता शंकरनगर- अकलूज ता. माळशिरस येथील श्री शिवपार्वती मंदिरात महाआरती आयोजन केल्याची माहिती समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी दिली. श्रावण महिन्यात मंदिरात अखंड नामजप सोहळा सुरू आहे. श्रावणाच्या दर सोमवारी मंदिरात रुद्राभिषेक, आरती, धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप केले जाते. श्रावण महिन्यानिमित्त दोन दिवस नागपंचमीच उत्सव व खेळ तसेच शिवलीलामृत या ग्रंथाचे सामुदायिक वाचन करण्यात आले . यामध्ये एक हजार महिलांनी सहभाग घेतला होता. मंदिराचा भव्य परिसर व आकर्षक विद्युत रोषणाई यामुळे मंदिर अतिशय सुंदर दिसत आहे. महाआरतीसाठी भाविकांनी सहकुटुंब उपस्थित रहावे असे आवाहन ट्रस्टच्या सदस्य स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी केले आहे.

# सकल मराठा समाजाचा रास्ता रोको

### अक्कलकोटजवळ वाहनांच्या लांबच्या लांब रांगा; वाहनचालकांची कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनासाठी अक्कलकोट सोलापूर राजमार्गावर सकल म राठा संयोजक अमोल राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी सोलापूर, कर्नाटक आणि



मराठवाड्याकडे जाणाऱ्या वाहनाच्या तीन किलोमीटर पर्यंत लांबच लांब रांगा लागल्या.

मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे या आग्रही मागणीसाठी उड्डाणपूलासह पाच प्रमुख मार्ग एकाच वेळी रोखण्यात आले होते. युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर महिलांचा सहभाग देखील लक्षणीय होता. नगरसेवक संजय मोरे (मैंदर्गी), शहर शिवसेनाप्रमुख योगेश पवार, शिवप्रतिष्ठानचे वरूण शेळके, गोपीचंद लोंढे, वंदना टोणपे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी सकल मराठा समाज संयोजक अम ोल राजे भोसले, सुरेश सूर्यवंशी, बाबासाहेब निंबाळकर, प्रवीण घाटगे, तम्मा शेळके, मनोज निकम, अण्णासाहेब सुरवसे, सुधाकर गोंडाळ,प्रथमेश पवार, बालाजी पाटील,आतिष पवार, महेश दणके ,योगेश पवार आदींसह शहर आणि ग्रामीण भागातील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नायब तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

### आज मोडनिंब बंदची हाक

**मोडनिंब :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मोडनिंब (ता. माढा) येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने आज सोमवार (दि.७) रोजी मोडनिंब शहर बंदची हाक देण्यात आली आहे. नागरिकांनी बंदमध्ये सहभागी होऊन एकजुटीचे दर्शन घडवावे, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## वेळापुरात एक तास रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ सप्टेंबर -**

मराठा आरक्षण व त्याअनुषंगिक मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ माळशिरस तालुका अखंड मराठा समाजाच्या वतीने वेळापूर येथे एक तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

माळशिरस तालुका अखंड म राठा समाजाच्या वतीने समर्थनार्थ ६ दिवसांचा एल्गार पुकारण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत वेळापूर येथे हे आंदोलन करण्यात आले. वेळापूर येथील पालखी चौकात, आळंदी-पंढरपूर पालखी मार्गावरील ओव्हरब्रिजवर व त्याखालील चौकात हे आंदोलन झाले. यामुळे पंढरपूर, इंदापूर, अकलूज व सांगोला मार्गावरील वाहतूक तासभर ठप्प झाली होती.

खांद्यावर भगवी उपरणी व हातात भगवे ध्वज घेऊन आलेल्या आंदोलकांनी पुलावर आणि पुलाखाली चारही बाजूंनी येणाऱ्या रस्त्यांवर ठिय्या मारला. यावेळी जय भवानी, जय शिवराय, एक म राठा, कोटी मराठा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलकांनी ठरलेल्या वेळेत शांततेत आंदोलन आटोपते घेतले. यावेळी निवासी नायब तहसीलदार सिद्धार्थ जावीर, मंडल अधिकारी संदीप चव्हाण, तलाठी सावता गोरे, तसेच वेळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे उपस्थित होते. आंदोलकांनी वेळापूर येथील एका दोन वर्षीय मुलीच्या हस्ते प्रशासनाला आपले निवेदन दिले.

## कृषी अधिकाऱ्यांचे आज राज्यस्तरीय धरणे आंदोलन

### आकृतीबंद रद्द करण्याची मागणी;कृषी विभागातील कामकाजाचा खोळंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

राज्यातील कृषी विभागाने मंजूर केलेल्या त्रुटीपूर्ण आणि अपारदर्शक आकृतीबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषिसेवा महासंघ आणि विविध संलग्न संघटनांनी राज्यस्तरीय आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आकृती बंधामुळे तांत्रिक संवर्गातील सुमारे ५,००० पदे कमी होणार असून, थेट शेतकरी सेवा आणि कृषी विस्तारावर त्याचा अत्यंत विपरीत परिणाम होईल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. यामुळे त्यांनी आज राज्यस्तरीय धरणे आंदोलन पुकारले आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याने कृषी विभागातील कामकाजावर त्याचा परिणाम होणार आहे.

कृषी अधिकाऱ्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार ७ सप्टेंबर रोजी पुणे येथील कृषी आयुक्तालयावर सामूहिक रजा घेऊन राज्यस्तरीय धरणे आंदोलन केले जात आहे. या आंदोलनाची मुख्य कारणे मुख्य कारणे पाहिली तर नव्या आकृतीबंधातून तांत्रिक आणि क्षेत्रीय स्तरावरील महत्त्वाची पदे कमी करण्यात आली आहेत, तर अतांत्रिक संवर्गांना झुकते माप देण्यात आले असल्याचा त्यांचा आरोप आहे. सध्याचा वादग्रस्त आकृतीबंध तातडीने रद्द करावा आणि सर्व संघटनांना विश्वासात घेऊन उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीमार्फत नवीन पारदर्शक आकृतीबंध तयार करावा अशी मागणी ते करीत आहेत. कृषी आयुक्तालयासमोर कृषी विद्यापीठ पदवीधर संघाचे अध्यक्ष ॲड. अनंत चोंदे पाटील व इतर पदाधिकाऱ्यांचे बेमुदत उपोषण आधीच सुरू झाले आहे.

या आंदोलनासाठी पुढील टप्पे कृषी अधिकाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी जाहीर केले आहेत. यामध्ये ३ ते ६ सप्टेंबर: संपूर्ण राज्यात 'लेखणी बंद' आंदोलन यशस्वीरीत्या करण्यात आले, ज्यामध्ये अहवाल आणि संगणकीय कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला. तर आज ७ सप्टेंबर रोजी कृषी आयुक्तालय, पुणे येथे राज्यातील सर्व अधिकाऱ्यांचे सामूहिक रजा आंदोलन आणि धरणे प्रदर्शन होणार आहे. तर ९ सप्टेंबरपासून शासनाच्या सर्व प्रकारच्या ऑनलाइन ॲप्लिकेशन्स आणि संगणकीय प्रणालींवर पूर्ण बहिष्कार ते टाकणार आहेत. ११ सप्टेंबर: शासकीय लॅपटॉप प्रशासनाकडे जमा करण्याचे आंदोलन. तर योग्य निर्णय न झाल्यास २१ सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन ठेवण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांसाठी दुष्काळाला तेरावा महिनाच म्हणावा लागेल.

## शिक्षक वडिलांच्या संस्कारांची पावती; तिन्ही मुलं सरकारी सेवेत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ६ सप्टेंबर**



शिक्षणाला आयुष्याचे ध्येय मानून तब्बल ३४ वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजावणाऱ्या वडिलांच्या संस्कारातून घडलेल्या हजरत वजीर फकीर यांनी आपल्या कुटुंबाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. जून २०२५ मध्ये पवित्र पोर्टलअंतर्गत झालेल्या परीक्षेत १६८ गुण मिळवत यश संपादन केल्यानंतर त्यांची जिल्हा परिषद सोलापूर येथे प्राथमिक शिक्षकपदासाठी निवड झाली आहे.

हजरत फकीर यांनी बीए, डीएड आणि बीएड शिक्षण पूर्ण केले असून, शिक्षक होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली. अखेर त्यांच्या जिद्दीला आणि परिश्रमाला यश मिळाले. यशाची सर्वात अभिमानाची बाब म्हणजे त्यांच्या कुटुंबातील तिन्हीही मुलं सरकारी सेवेत कार्यरत आहेत. त्यांच्या बहिणी इप्तसाम मुजावर या सिव्हिल हॉस्पिटल, लातूर येथे नर्सिंग ऑफिसर म्हणून, तर आयेशा काझी या ग्रामीण रुग्णालय, कुर्डुवाडी येथे नर्सिंग ऑफिसर म्हणून सेवा बजावत आहेत.

त्यांचे वडील वजीर इस्माईल फकीर यांनी ३४ वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजावली. आई सुलताना फकीर यांनीही मुलांना घडवण्यासाठी मेहनत घेतली. हजरत वजीर फकीर यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून अभिनंदन होत असून आहे.

## विनयभंगाच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपी सुरज मोहन कांबळे, रा.सिद्धार्थ नगर, बार्शी याची बार्शी येथील प्रथम वर्ग न्यायदिंडाधिकारी न्यायाधीश पी. व्ही. राऊत यांनी निर्दोष मुक्तता केली.

सदरील प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथम वर्ग न्यायदिंडाधिकारी न्यायाधीश श्रीमती पी. व्ही. राऊत यांच्यासमोर झाली. आरोपीच्यावतीने ॲड. विवेक गजशिव यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. सरकारी पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याच्या चौकशी दरम्यान सरकारी पक्षातर्फे तपासलेले साक्षीदारांचा पुरावा आरोपींना शिक्षा देणे इतपत पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याचा अभाव असल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकील यांनी केला. यावेळी ॲड. गजशिव यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत बार्शी येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी आरोपी सुरज कांबळे याची निर्दोष मुक्तता केली.

## माळी महासंघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी वाघमारे

### निशिगंधा माळी महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

नागपूर येथील माळी महासंघाच्या कार्यालयातून माळी महासंघाची राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर झाली आहे. राष्ट्रीय उपाध्यक्षपदी जिल्हा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय निवड समितीचे प्रमुख रवींद्र अंबाडकर यांनी ही निवड केली. सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निशिगंधा माळी यांची माळी महासंघाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे.





भारत माळी यांच्यावर राष्ट्रीय सचिव पदाची जबाबदारी सोपवली आहे. माळीनगर साखर कारखान्यांचे चेअरमन रंजन गिरमे आणि सांगोलाचे माजी नगराध्यक्ष डॉ. प्रभाकर माळी यांची म हासंघाच्या सल्लागारपदी निवड केली आहे. जिल्ह्यातील माळी समाजातील प्रमुख मान्यवरांना माळी महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत महत्त्वपूर्ण स्थान मिळाल्याने समाजात आनंदाचे वातावरण आहे. समाज बांधवांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## यमाई देवी ट्रस्टतर्फे महिलांसाठी तीर्थक्षेत्र देवदर्शन यात्रा

**मोडनिंब, दि. ६ सप्टेंबर -**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री यमाई देवी ट्रस्टच्या वतीने श्रावण मासानिमित्त महिलांसाठी तीर्थक्षेत्र देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले. या तीर्थाटन यात्रेचे यंदाचे चौथे वर्षअसून १५१ महिलांनी यात सहभाग नोंदवला. या तीर्थयात्रेत महिलांना श्री क्षेत्र गोंदवले, औंध येथील श्री यमाई देवी मंदिर, श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर तसेच वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वर मंदिराचे दर्शन घडविण्यात आले.तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेतल्यानंतर महिलांनी आध्यात्मिक अनुभूती मिळाल्याचे सांगत ट्रस्टच्या या उपक्रमाचे सहभागी महिलांनी कौतुक केले.

# 'कृष्णा'तून बार्शी तालुक्याला ५ टीएमसी पाण्याची शिफारस

### कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक धुमाळ यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

कृष्णेचे पाणी भीमेच्या खोरेत आणण्याच्या १७ हजार कोटी रुपयांच्या महत्वाकांक्षी योजनेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूरी दिली आहे. या योजनेच्या सर्वेक्षणाचे काम सुरु झाले आहे. या योजनेतून बार्शी तालुक्यासाठी आपण ५ टीएमसी पाण्याची शिफारस केल्याची माहिती कृष्णाखोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांनी दिली.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीत झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, बाजार समितीचे सभापती विजय गरड आदी उपस्थित होते.

> **लक्ष्याची वाडीतून बार्शी पालिकेला ९० लाख लिटर पाणी द्या**
>
> सध्या बार्शीची पिण्याची पाण्याची अडचण असल्याने ज्यावेळी बार्शी उपसा सिंचनचे पाणी सोडले जाईल, त्यावेळी लक्ष्याचीवाडी येथील टप्पा २ येथून न.पा. ला प्रतिदिन ९० लाख लिटर्स पाणी दोन वर्षाकरिता मिळावे.
>
> **- आमदार राजेंद्र राऊत**

योजनेमुळे सोलापूर जिल्हा व मराठवाड्याला अतिरिक्त पाणी मिळणार आहे. त्यातील पाणी सोलापूर जिल्हयातील पाणीवाटपात कमी असलेल्या बार्शी तालुक्याला देण्याबाबत आपण सकारात्म क आहोत. आमदार चिकाटीने ते मंजूर करुन घेतील असा विश्वास व्यक्त केला. बार्शी नगरपालिकेने बार्शी उपसा सिंचन टप्पा २ येथून पिण्याचे पाणी बार्शीला नेण्याबाबत दिलेल्या प्रस्तावालाही म ान्यता देवून बार्शीसाठी पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था करु, अशी ग्वाहीही डॉ. धुमाळ यांनी दिली. आमदार राऊत यांनी बार्शी उपसा सिंचन योजनेच्या प्रलंबित कामाबाबत चिकाटीने पाठपुरावा केला. आ.राऊत हे मुख्यमंत्री व मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा करत असल्याने या योजनेला निधी निर्माण होणे, टेंडर निघून वर्कऑर्डर व प्रत्यक्ष काम अशी गती येवून या कामाला यश आले असे म्हणता येईल. गेली २० वर्ष प्रलंबित असलेली ही योजना ८० टक्के पूर्ण केली आहे, असे धुमाळ म्हणाले.

तावडी तलावात पाणी सोडण्यास निधी व सुप्रमाची अडचण होती. ती आता दूर झाली आहे. संबंधित ठेकेदारांना पुढील आठवड्यात निधी देत असून काम पूर्ण करण्यास सांगितले आहे. या योजनेच्या टप्पा ३ ज्यामध्ये पिंपळगांव ढाळे धरणात पाणी टाकायचे आहे. यातील अडचण दूर करण्यासाठी मंत्र्यांची वेळ घेतली जाईल. तोपर्यंत नियोजन करुन सर्वेक्षणाचे काम घ्यावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, कृष्णेचे पाणी आणण्याची मुख्यमंत्र्यांची जी महत्वाकांक्षी योजना आहे, यात सोलापूर जिल्हयाला ४० ते ५० टीएमसी व मराठवाड्याला १५ टीएमसी पाणी मिळणार आहे.

सोलापूर जिल्हयातील पाणी वाटपात पूर्वी बार्शी तालुक्याला कमी पाणी मिळाले आहे. त्यामुळे पाणीवाटपची बैठक घेवून पूर्वीच्या वाटपात कमी पाणी मिळालेल्या बार्शीला आता या योजनेतून किमान ५ टीएमसी पाणी द्यावे. आमच्या अवर्षणग्रस्त दुष्काळी भागाला न्याय दयावा, अशी भावना व्यक्त केली. आ. राऊत यांनी कार्यकारी संचालक हेमंत धुमाळ यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. तत्पूर्वी, धुमाळ यांनी उपसा सिंचनच्या कामांची पाहणी केली.